
नियती
प्रतिक म्हात्रे

# नियती

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# नियती

लेखक

## प्रतिक प्रवीण म्हात्रे

# नियती

## लेखक: प्रतिक प्रवीण म्हात्रे

आगाशी, म्हात्रेवाडी, 'साईप्रतिक निवास',
विरार पश्चिम, तालुका/जिल्हा – पालघर, ४०१३०१
मोबाईल – 8888198850
ईमेल - infopratikmhatre@gmail.com
पर्सनलब्लॉग - https://pratikpravinmhatre.com/

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : ९ जुलै २०२०**

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य- प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

# ओळख

या पुस्तकाचे लेखक प्रतिक प्रवीण म्हात्रे म्हणजे विरारचा छोरा.. अवघा पंचवीस वर्षाचा इंजिनिअर. डिप्लोमा प्लस डिग्री. आणि तरीही आवड मराठी साहित्याची. त्याचे बालपण आणि शाळा विरार येथील आगाशीचे. त्यानंतर त्याने श्री भगूभाई मफतलाल पॉलिटेक्निक विलेपार्ले येथून इलेक्ट्रॉनिकचा डिप्लोमा आणि मग विद्यालांकर इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी येथून इले्ट्रॉनिक्स अँड टेलीकॉमुनिकेशनची डिग्री प्राप्त केली आहे. सध्या तो टाटा कंसल्टेंसी सर्विसेस मध्ये संगणक अभियंता म्हणून कार्यरत आहे.

लहानपणापासूनच त्याला वाचनाची आवड आहे. त्यातही ऐतिहासिक कथा आणि कादंबऱ्या त्याला विशेष प्रिय आहेत. आतापर्यंत त्याने श्रीमान योगी, पावनखिंड, स्वामी, ज्ञानेश्वरी, छावा, रामायण, महाभारत, युगंधर, माझी जन्मठेप, मृत्युजंय अशी अनेक पुस्तके वाचली आहेत. अशा वाचनाने त्याची चिंतनशीलता वाढली आहे. आपल्या मनात निर्माण होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे तो स्वतःच्या चिंतनातून शोधण्याचा प्रयत्न करतो

त्यातूनच त्याचे 'पर्सनल से सवाल' हे पुस्तक जन्माला आले आणि ई साहित्य प्रतिष्ठानने प्रकाशित केलेल्या त्याच्या त्या पुस्तकाला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

त्यानंतर ई साहित्य प्रतिष्ठानने त्याची 'प्रेम हे असंच असतं...'ही कादंबरी प्रकाशित केली, तीसुद्धा वाचकांच्या पसंतीस उतरली.

प्रतिक हा सातत्यपूर्ण लेखक असून तो त्याचे लेखन त्याच्या ब्लॉग वर तसेच इन्स्टाग्राम, फेसबुक अशा सोशल मीडिया माध्यमांवर नेहमीच प्रकाशित करत असतो.

https://pratikpravinmhatre.com/
https://instagram.com/pratilikhit?igshid=14iomcvpib07k
http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/personal_se_sawaal_pratik_mhatre.pdf
http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/prem_pratik_mhatre.pdf






# अर्पणपत्रिका

ज्यांनी मला माझे विचार शब्दांत मांडण्यासाठी, मला व्यक्त होण्यासाठी प्रवृत्त केले; वेळोवेळी प्रतिक्रिया देऊन माझ्या लेखनाचा हुरूप वाढवला त्या माझ्या हितचिंतकांना अर्पण..

- प्रतिक प्रवीण म्हात्रे



# मनोगत

माझे तृतीय पुस्तक, '**नियती**' ही कादंबरी वाचकांना अर्पण करताना मला फार आनंद होत आहे.

हल्लीची तरुण पिढी मराठी कथा कादंबऱ्या वाचण्यापेक्षा इंग्रजी कादंबऱ्या वाचण्यावर जास्त भर देते. लहानपणापासून इंग्रजी माध्यमात शिकल्यामुळे त्यांना मराठी वाचण्यात अनेक अडचणी येतात. त्यामुळे जर आपण आपल्या डोळ्यासमोर घडणाऱ्या, आपण अनुभवलेल्या अशा गोष्टी ज्या माझ्या वयाच्या इतर मुलामुलींनी अनुभवलेल्या असतील त्या गोष्टी एखाद्या आर्टिकलच्या रुपात किंवा एखाद्या कवितेच्या रुपात जर सर्वांसमोर मांडल्या तर त्या वाचण्यासाठी आताची पिढी नक्कीच इंटरेस्ट घेईल हा विचार करून मी लेखनास प्रारंभ केला. माझे लेखन वाचल्यावर काही जणांनी मला माझा ब्लॉग चालू करण्यासाठी सुचवले. ब्लॉगमुळे माझे लेखन अनेक जणांपर्यंत पोहोचले आणि त्यांच्याकडून येणाऱ्या प्रतिसादाचा, सल्ल्याचा मला नेहमीच उपयोग झाला.

असं म्हणतात की कोणतंही नातं टिकण्यासाठी सहवास अत्यंत महत्वाचा असतो. जर आपण एखाद्या व्यक्तीच्या जास्त सहवासात राहिलो तर आपल्याला त्या व्यक्तीची सवय होते. काही कारणास्तव आपण त्या व्यक्तीपासून दुरावलो आणि त्या नात्याला योग्य न्याय देऊ शकलो नाही तर ते नातंच दुरावतं. कारण निसर्ग नियमानुसार घरट्यातून बाहेर पडणाऱ्या एकट्या पिल्लाला जगण्यासाठी कोणत्या ना कोणत्या आधाराची गरज असतेच. या कादंबरीतील अनेक घटना ह्या आपल्या जीवनात घडलेल्या असू शकतात. काय होतं जेव्हा आपण नकळत कुणाकडे तरी आकर्षित होतो आणि मग काही काळाने त्या नात्यात दुरावा येतो?? हे पाहण्यासाठी तुम्हाला ही कादंबरी वाचावी लागेल. कादंबरी वाचताना कुठेतरी तुम्ही त्या पात्रांशी स्वतःला नक्कीच रिलेट कराल. ती पात्र तुम्हाला तुमच्यातलीच वाटतील आणि ही कादंबरी तुम्हाला नक्कीच आवडेल.

-प्रतिक प्रवीण म्हात्रे

"The course of
true love
never did run
smooth."

*William Shakespeare*

# १

"अरे यार ! ह्या पावसाला सुद्धा आत्ताच यायचं होतं. काल रात्री इतका पडला, तरी ह्याच मन नाही भरलं अजुन. आधीच मी इंटरव्ह्यू साठी लेट झालीये आणि त्यात हा."

"ऑटो..."तिने समोरून येणाऱ्या रिक्षाकडे बघून जोरात हाक मारली. पण तो सुद्धा मोठ्या तोऱ्यात तिच्या समोरून वेगाने निघून गेला. मनामध्ये शिव्या देत असतानाच तिला समोरच्या रस्त्यावर एक रिक्षा थांबलेली दिसली. ती घाईघाईतच आजूबाजूला न बघता रस्ता ओलांडू लागली आणि अचानक समोरून जोरात येणाऱ्या बाईकच्या एकदम पुढ्यातच जाऊन उभी राहिली. तिला पाहून प्रसंगावधान राखून त्या बाईकवाल्याने करकचून ब्रेक दाबला.

“ओह हॅलो, दिसत नाही का? हा काय रेसिंग करायचा रस्ता आहे?” ती अक्षरशः किंचाळलीच.

”एक मिनिट. एक तर तू आजूबाजूला न बघता रस्ता क्रॉस करतेय आणि वर मलाच दोष देतेय. नशीब समज मी वेळेवर ब्रेक मारला नाही तर...”

“नाही तर काय? बाईक हातात आली म्हणजे तुम्हाला वाटतं की जसं काय विमानच चालवतोय आम्ही.”

”हे बघ. आधीच मला उशीर झालाय आणि मला एवढ्या पावसात थांबून तुझ्याशी भांडण्यात अजिबात इंटरेस्ट नाहीये.”

“मलातरी कुठे इंटरेस्ट आहे. अशा फालतू गोष्टींसाठी वेळ नाहीये माझ्याकडे.”

“नाहीये ना. मग जा ना. कशाला उगाच..”

त्याचं बोलणं पूर्ण होण्याच्या आतच ती तिथून निघून गेली.

थोडा प्रयत्न केल्यावर तिला रिक्षा मिळाली खरी पण तोपर्यंत ती पावसात पूर्णपणे भिजली होती. रिक्षामधुन उतरल्यावर घाईघाईतच ती गेटमधून आत शिरली. वॉचमनला विचारून पळतच इंटरव्ह्यू जिथे होता त्या बिल्डिंग मध्ये गेली. समोरच्याला आपल्या बोलण्यात गुंतवून ठेवण्याच्या तिच्या सवयीमुळे साहजिकच तिला तो जॉब मिळाला आणि ओरिएंटशन साठी ऑडिटोरिअममध्ये जाणार इतक्यात दरवाज्यात, पुन्हा एकदा तिची गाठ त्या बाईकवाल्याशी पडली.

"तू? तू इथे काय करतोय?"

"काय करतोय म्हणजे? मी इथे नाही येऊ शकत का?"

"नाही तस नाही पण सकाळी भांडून मन नाही भरलं म्हणून इथे माझा पाठलाग करत आलास वाटतं."

"हो. मला तेवढंच काम आहे ना. काय बोलतेय. जाऊ दे. तुम्हा मुलींच्या नादी लागण्यात काही अर्थ नाही. आता जरा

जॉब लागल्यामुळे माझा मूड चांगला आहे आणि मला तो अजिबात बिघडवायचा नाहीये. सो बाय."

पहिलाच दिवस असल्यामुळे सगळ्या फॉर्मलिटीमध्ये वेळ कसा निघून गेला, तिचं तिला सुद्धा कळलं नाही. तसा थोडा उशीरच झाला होता म्हणा. पावसाने सुद्धा थोडी विश्रांती घेतली होती, म्हणून ती बसची वाट पाहत उभी होती आणि तो बाईकवाला पुन्हा एकदा तिच्या समोरून गेला.

'शी. उगाच भांडले याच्याशी. सकाळी माझीच चूक होती. मीच जरा घाईत होते. त्याला सॉरी म्हणायला हवं. पण तो माफ करेल का मला?'

ती ह्या विचारात असताना पुढे गेलेला तो बाईकवाला पुन्हा तिला तिच्या दिशेने येताना दिसला. तिने पाहून न पाहिल्यासारखंच केलं आणि दुसरीकडे पाहत उभी राहिली. तो तिच्या बाजूला येऊन थांबला.

"एक्सक्यूज मी मीस!"

"हा."

"खूप उशीर झाला आहे. जर भांडणार नसशील तर मी लिफ्ट देऊ शकतो तुला. आणि हो मी बाईक नीटच चालवतो."

त्याचं बोलणं ऐकून ती एकदम हसायलाच लागली.

"हसायला काय झालं?"

"अरे काही नाही. सकाळचं भांडण आठवून हसू आलं मला. अक्चुअली आय एम सॉरी. सकाळी ते..."

"सकाळ बद्दल आपण न बोललेलंच बरं" तो सुद्धा हसतचं म्हणाला.

"हो हो. झालं ते झालं. पुन्हा नव्याने सुरुवात करूया."

***********************************

रात्री जेवण करून बिछान्यावर पडल्यावर रश्मीच्या मनात सहजच त्या बाईकवाल्याचा विचार आला. एक मुलगा सकाळी अचानक भेटतो, त्याच्याशी भांडण होतं, योगायोगाने त्यालासुद्धा आपल्याच ऑफिसमध्ये जॉब मिळतो आणि एवढं भांडूनसुद्धा आपण त्याच्याच बाईकवर बसून घरी येतो. हे सगळं एवढं अचानक आणि अनपेक्षित होतं की, तिचं तिलाच कळलं नव्हतं आपण नक्की काय रिऍक्ट करावं. पण उद्या ऑफिसमध्ये कुणीतरी आपल्या ओळखीचं असेल या विचारानेच तिला जरा हायसं वाटत होतं.

एरवी अलार्म पाच वेळा वाजला तरी स्नूज़ करणारी ती, आज मात्र पहिल्याच अलार्ममध्ये उठून बसली. नवीन जॉब त्यामुळे थोडी एक्ससाईटमेंट होतीच. सगळं पटापट आवरून आईने दिलेलं दहीसाखर खाऊन ती बाहेर पडली. पावसाची रिपरिप सुरूच होती. दूरदर्शनवर ट्रेन्स उशिरा असल्याच्या बातम्यासुद्धा येत होत्या. पण नवीन जॉबचा पहिलाच दिवस असल्यामुळे त्या सगळ्याकडे दुर्लक्ष करून

ती छत्री उघडून साचलेल्या पाण्यातून मार्ग काढत चालू लागली. दरम्यान पावसाचा जोर वाढल्याने मुंबईची लाईफलाईन मंदपणे धावत होती. तिला ऑफिसमध्ये पोहोचायला थोडा उशीरच झाला. पहिल्याच दिवशी उशीर झाल्याने तिच्या मनात जरा धाकधुक होती पण जेव्हा ती ऑफिस मध्ये पोहोचली तेव्हा ऑफिसमध्ये फक्त जवळ राहणारे एक दोन जण आले होते. रोजचं कॉफीचं टाइम झाल्यामुळे आणि त्यातच भर पावसात भिजल्यामुळे तिला कॉफीची तलफ लागली होती त्यामुळे त्यातल्याच एकाला कॉफी मशीन कुठे आहे हे विचारून ती कॉफी प्यायला गेली.

कॉफी पितापिता तिची नजर नकळत त्या बाईकवाल्याला शोधू लागली. अनोळखी जागी जर ओळखीचं कुणीतरी असलं तर कोणालाही कम्फर्टेबल वाटेलचं ना. पण त्याचा काही पत्ताच नव्हता. आज त्याचा पण पहिलाच दिवस आणि त्यात तो बाईकने येतो. रस्त्यावर पाणी साचलं असेल. कसा येणार तो. क्षणात कितीतरी

विचार तिच्या मनात येऊन गेले. पण लगेच तिच्या मनात डेव्हिल डोकावला. 'आपण का त्याचा एवढा विचार करतोय. एक दिवस तर झालाय भेटून. अजून मला त्याचं नाव सुद्धा नाही माहीत आणि त्याची एवढी काळजी का वाटतेय मला. ती त्याचा विचार मनातून काढून टाकणार तेवढ्यात दरवाजा उघडून तो बाईकवाला आत आला. दोघांची नजरानजर झाली. तिला पाहताच त्याने एक छोटीशी स्माईल दिली आणि नकळतचं तिच्या ओठांवर हास्य उमटलं.

तो आला आणि लगेचच राजने त्या दोघांना त्याच्या कॅबिन मध्ये बोलावलं. तो केबिन मध्ये गेला तेव्हा ती आधीच येऊन बसली होती.

"मे आय कम इन सर?"

"येस. प्लिज कम. आणि हो, हे असं सर वगैरे नको बोलूस. एकदम पन्नास वर्षाचा झाल्यासारखं वाटतं. कॉल मी राज. इथे आपण सगळे एकाच वयाचे आहोत त्यामुळे

नावाने हाक मारली तर मग नंतर फॉर्मलिटी ची गरज पडत नाही."

"हो. बरोबर आहे."

'राज. ' एक मोठा श्वास घेऊन त्याने ते नाव दोनदा तीनदा तोंडात घोळवलं.

"बरं. आधी तुमची ओळख करून देतो." राजच्या तोंडून हे शब्द ऐकताच नकळतपणे तिने लक्ष त्याच्या बोलण्याकडे एकवटलं. जणू काही बऱ्याच दिवसांपासून अनुत्तरित असलेल्या प्रश्नाचं उत्तर तिला आज मिळणार होतं.

"अविनाश, ही रश्मी. ही सुद्धा आजपासूनच जॉईन झाली आहे. आणि तुमच्या दोघांचंही डोमेन सेम आहे सो मला असं वाटतं की तुम्ही दोघांनी एकत्र काम करावं. त्यामुळे काय होईल की काही डाऊट असला तर तुम्ही दोघे मिळून तो सोडवू शकाल कारण तुम्हा दोघांनाही या कामाचा अनुभव आहे. सो तुम्ही एक टीम म्हणून काम करा. अर्थात तुम्ही दोघे तयार असाल तर."

"चालेल राज." रश्मी एकदम उत्साहात म्हणाली पण दुसऱ्याच क्षणी तिने स्वतःला सावरलं.

"म्हणजे मला मॅनेजमेंट करायला आवडतं. आधीच्या कंपनी मध्ये सुद्धा मी इव्हेंट मॅनेज करायचे म्हणून म्हणाले चालेल."

"अच्छा. आणि अविनाश खूप चांगला आणि अनुभवी इव्हेंट मॅनेजर आहे. मी त्याने मॅनेज केलेल्या इव्हेंट्स बद्दल ऐकलंय. खूप छान असतं त्याच मॅनेजमेंट. तुम्ही दोघं एकत्र आलात आणि पहिला इव्हेंट यशस्वी करून दाखवला तर आपल्याला खूप ऑफर्स येऊ शकतात."

"मलाही एकत्र काम करायला काही प्रॉब्लेम नाहीये. उलट इव्हेंट मॅनेजमेंट मधलंच कुणीतरी टीममेट आहे या पेक्षा चांगली गोष्ट ती कोणती."

"मस्तच. कालच माझ्याकडे एका इव्हेंट चे डिटेल्स आलेत. मी तुम्हा दोघांनाही फॉरवर्ड करतो. रामसिंग तुम्हाला तुमचं क्यूबिकल दाखवेल आणि तुमच्या सिस्टिमचा

आयडी आणि पासवर्ड सुद्धा सांगेल. लागा कामाला. विश यू ऑल द व्हेरी बेस्ट. आणि काहीही अडचण आली तर बिनधास्त मला येऊन सांगा.''

''येस शुअर. थँक यू. राज.'' अविनाश खुर्चीवरून उठत म्हणाला आणि त्याने रश्मीकडे पाहिलं तशी रश्मी सुद्धा उठली आणि राजला थँक्स म्हणून केबिनबाहेर पडली.

'अविनाश. ' राजच्या केबिनमधून बाहेर पडल्यावर त्यांच्या क्युबिकलमध्ये जाईपर्यंत रश्मीच्या ओठांवर फक्त त्याचंच नाव होतं. जणूकाही त्या नावाशी तिचं काहीतरी नातं होतं. एक अटॅचमेंट होती. ती त्याच्याबद्दल एवढा विचार का करत होती तिचं तिलाही समजत नव्हतं. क्युबिकल मध्ये जाऊन बसले तरी सुद्धा त्याच्याशी काय बोलावं तिला कळत नव्हतं. बराच वेळ झाला तरी सुद्धा दोघं एकमेकांशी काही बोलत नव्हते. शेवटी तिलाच ती शांतता असह्य झाली आणि तिने अविनाशला विचारलं.

"तू फक्त समोरच्याशी भांडायचं असेल तेव्हाच बोलतोस का?"

रश्मीच्या बोलण्यावर अविनाश एकदम हसायला लागला.

"हसायला काय झालं?"

"अगं काही नाही. मी वाट बघत होतो की तू स्वतःहून कधी बोलतेय."

"का? तू कधी समोरच्याशी स्वतःहून बोलत नाहीस का? एवढा इगो."

"ए प्लीज. इगो वगैरे काही नाही. तसा मी खूप फ्रेंडली आहे. मला फक्त समोरच्याशी ॲडजस्ट व्हायला जरा वेळ लागतो आणि त्यात काल आपण फक्त भांडलो आहोत. काल मी तुला लिफ्ट दिली पण तेव्हा सुद्धा तू फार काही बोलली नाहीस. मग म्हंटल की हिलाच स्वतःहून बोलू दे."

"अच्छा. म्हणजे तू मी बोलायची वाट पाहत होतास. पहिल्यांदाच असा मुलगा बघतेय जो मुलगी स्वतःहून बोलायची वाट बघतोय."

"हाहा. चक इट. काल तुला नाव विचारायला सुद्धा विसरलो. पाऊस होता सो मला सुचलच नाही काही."

"हम्म. असो. आता आपण एकाच प्रोजेक्ट वर आहोत तर बोलणं होतच राहील."

*********************************************

"अविनाश. राज सरांनी मेल पाठवलंय बघ."

"अच्छा. बघतो थांब. आणि हो. राज सर नाही. राज. म्हणाला ना तो. कॉल मी राज." अविनाश नकळत राजची नक्कल करत म्हणाला.

"अरे वाह. नक्कल चांगली करतोस तू."

"हो मग. कॉलेज मध्ये असताना एकांकिका करायचो मी."

"ओह, मग इथे का आलास. त्याच क्षेत्रात पुढे जायचंस ना."

"अहो मॅडम. पॅशन वेगळी आणि प्रोफेशन वेगळं. आणि इथे सुद्धा माझ्या आवडीचंच काम करतोय ना मी. इव्हेंट्स मॅनेज करायला खूप आवडतं मला."

"मला सुद्धा. म्हणजे सुरुवातीला मी फक्त अटेंड करायचे. विरारला राहायचे आणि घरून रोज अप डाऊन करावं लागायचं ना. पण मग नंतर सेकंड इयर पासून हॉस्टेल वर राहायला लागले. मग कमिटी मध्ये काम केलं. तेव्हापासून हे काम आवडायला लागलं आणि मग घरच्यांनीसुद्धा सपोर्ट केलं म्हणून मग याच क्षेत्रात आले. आता तर आम्ही सगळेच मुंबईला शिफ्ट झालोय."

"चांगलंय चांगलंय. म्हणजे छोट्या छोट्या गोष्टी तुला सांगाव्या लागणार नाही." अविनाश हसतच म्हणाला.

"एक्सक्यूज मी. मला सुद्धा बऱ्यापैकी जमतं बरं का. म्हणजे तुझ्या इतके मोठे इव्हेंट्स नसतील केले मी पण जितके केलेत सगळे यशस्वी केलेत." रश्मी थोड्या तोऱ्यातंच म्हणाली.

"हाहा. निदान या बाबतीत तरी चांगलं जमेल आपलं. भांडण नाही होणार." अविनाश मिश्कीलपणे म्हणाला.

"अरे. तू अजूनसुद्धा तेच घेऊन बसलायस का? विसर ते. थोडी वैतागले होते म्हणून झालं ते."

"कळेलच ते हळू हळू."

"हो कळेल. ए तू एकांकिका केल्यात म्हणजे बरीच पुस्तकं वगैरे वाचली असशील ना."

"हो. वाचायला सुद्धा आवडतं मला. तशी बरीच पुस्तकं वाचलीयेत मी लहानपणापासून. शाळेत असताना तर अभ्यासाच्या पुस्तकांमध्ये गोष्टीची पुस्तकं ठेवून वाचायचो मी. एकदा परीक्षा असताना असं करत होतो आणि आईने

पकडलं. असं धोपटून काढलं ना की विचारू नकोस. तुला आहे का आवड वाचनाची?"

"मी आणि वाचन, दूर दूर पर्यंत संबंध नाही." रश्मी हसतच म्हणाली."मी असं पुस्तक वगैरे वाचायला घेतलं की झोपच येते मला. त्यामुळे मी वाचतच नाही. पण दुसऱ्याने एखाद पुस्तकं वाचलं आणि त्याने स्टोरी सांगितली तर ती ऐकायला आवडते मला."

"चला. म्हणजे माझी बडबड ऐकायला आहे कोण तरी."

"हो नक्कीच. मला आवडेल तू वाचलेल्या बुक्स च्या स्टोरीज ऐकायला."

"बरं. आता जरा काम करूया का आपण. नाही तर पहिल्याच दिवशी बॉसच बोलणं ऐकावं लागेल."

"हो. करूया करूया." असं म्हणून रश्मीने मेल ओपन केला.

"अवि. सॉरी...अविनाश. अरे या कंपनीचा इव्हेंट मी केला आहे आधी."

"ओह. ग्रेट. म्हणजे त्यांच्या एकपेक्टेशन्स माहिती असतील ना तुला?"

"हो. मी माझ्या आधीच्या इव्हेंट्स च्या डिटेल्स मेल करायला सांगते सुरभिला. आपल्याला मदत होईल त्या रेकॉर्ड्स ची."

"कूल. चल आता कॉफी पिऊन येऊ आणि मगच कामाला सुरुवात करू."

"हो चालेल चल."

"रश्मी..." बोलता बोलता अविनाश अचानक थांबला.

"हा. काय झालं?"

"तू अविचं बोल. चालेल मला."

"बरं." रश्मीने एकदा हसून अविनाशकडे पाहिलं आणि ती क्युबिकलबाहेर पडली.

****************************************

सगळे घरी गेले तरी रश्मी आणि अविनाश कामच करत होते . त्यांच्या आवडीचं काम ते. वेळ कसा जातोय त्यांचं त्यांनाही कळत नव्हतं . रश्मी सुरभीने मेल केलेल्या आधीच्या इव्हेंटचा रिपोर्ट स्टडी करत होती आणि अविनाश त्या इव्हेंट साठी योग्य असं लोकेशन शोधत होता. त्यांनी बऱ्याच ठिकाणी फोनसुद्धा केला पण ज्या दिवशीचं बुकिंग हवं होतं त्या दिवशीच मिळत नव्हतं.

"रश्मी!"

"हं. बोल ना."

"अगं २२ तारखेला कोणता चांगला हॉल मिळत नाहीये."

”अरे असं कसं होईल . एवढे हॉल आहेत मुंबई मध्ये. जरा अजून प्रयत्न करू. सापडेल. एवढा अनुभवी ना तू. मग लगेच काय पॅनिक होतोय .”

“पॅनिक नाही होत आहे गं. मी माझ्या कॉन्टॅक्ट मधल्या जवळपास सगळ्या लोकांना कॉल करून विचारलं पण त्यांचे हॉल आधीच बुक्ड आहेत.”

“अच्छा. काही काळजी करू नकोस. मी पण माझ्या ओळखीचे आहेत त्यांच्याशी बोलून बघते.”

“आता निघुया आपण. उद्या बघूया काय ते .”

“बरं.”

“कॉफी प्यायची इच्छा झालीये मला. सीसीडीला जाऊया?”

“आत्ता?”

“हो.” अविनाश बॅग आवरता आवरता म्हणाला.

क्षणभर रश्मी विचारातच पडली. ‘जावं का ह्याच्याबरोबर?? तसा अगदीच अनोळखीही नाहीये हा. गेले तर आधीचे वाद विसरून नव्याने ओळख व्हायलासुद्धा मदतच होईल. आता एकत्रच काम करतोय तर काही हरकत नाहीये जायला. आणि फेसबुकवर त्याच्या आवडी निवडी शोधण्यापेक्षा त्याच्याशी बोलण्यातूनच समजल्या तर चांगलंच आहे. ’

“उमममम. चालेल. पण नंतर तुला मला बस स्टॉप पर्यंत सोडावं लागेल. कारण सीसीडीच्या इथून बस नाही मिळत.”

“बस स्टॉप पर्यंत कशाला. त्या दिवशी सोडलं तसं सोडेन ना घरी. ऑन द वेच तर आहे. अर्थात तुला काही प्रॉब्लेम नसेल तर.”

“मला काय प्रॉब्लेम असणार आहे. मला उलटं चांगलंच आहे. आमच्या एरिया मधला एक जण नेहमी माझ्याकडे टक लावून बघत असतो. अशी एक कानाखाली वाजवावीशी

वाटते. तूला एकदा दोनदा बघितलं तर त्याला वाटेल की तू माझा बॉयफ्रेंड आहे. बघ माझा पिच्छा सोडून देईल."

"ओह. म्हणजे आता स्वतःच्या फायद्यासाठी तू माझा वापर करणार तर" अविनाश हसत म्हणाला.

"वापर वगैरे नाही रे. आता तू सोडायला येशील तर अनायसेच माझं काम सोपं होईल ना."

"ते पण आहे. बरं चल. निघुया आता."

अविनाशने रश्मीला गेटच्या बाहेर उभं राहायला सांगितलं आणि तो पार्किंग मध्ये बाईक आणायला गेला. त्या दिवशी पहिल्यांदाच तिने त्याच्या बाईककडे निरखून बघितलं. बाईक घेऊन जवळपास सात आठ महिने झाले असतील तरी एकदम काल घेतल्यासारखी वाटत होती. एकदम स्वच्छ. अजिबात आवाज नाही काही नाही. बाईक बघून अविनाशचं त्या बाईकवर किती प्रेम आहे हे कुणीही सांगू शकत होतं . पण बोलायला काहीतरी विषय हवा म्हणून तिने त्याला विचारलं.

“अविनाश. तुला बाईक चालवायला खूप आवडतं वाटतं.”

“वाटतं... अगं आवडतेच. बाईक म्हणजे माझा जीव की प्राण. मी बऱ्याच ट्रिप्स ला बाईक वरच जातो. आमचा एक ग्रुप आहे. सगळ्यांकडे बाईक. सगळे एकत्र निघतो रोड ट्रिप करत.”

“अरे वाह. कुठे कुठे गेला आहात तुम्ही आतापर्यंत?”

“लोणावळा, गोवा, महाबळेश्वर, माळशेज घाट, इगतपुरी, अलिबाग, औरंगाबाद. अजून छोट्या मोठ्या बऱ्याच. सलग दोन तीन सुट्ट्या आल्या की आम्ही घरी नसतोच.”

“मस्त रे. नेक्स्ट कुठे जाणार आहेत?”

“अजून काही नक्की नाही. आता २६, २७, २८ तीन सुट्ट्या आहेत ना लागोपाठ. तेव्हा जाऊ कुठे तरी. येणार का तू?” अविनाशने ब्रेक मारता मारता सहज विचारलं.

“मला नक्की आवडेल. पण मला घरून परवानगी मिळणं कठीण आहे जरा .”

“अच्छा. बघू तेव्हाच तेव्हा.” अविनाश बाईक पार्क करत म्हणाला.

त्या नंतर अविनाश आणि रश्मी जवळजवळ एक तास त्या कॉफीशॉप मध्ये बसून गप्पा मारत होते. त्या दरम्यान त्यांना एकमेकांबद्दल बरंच समजलं. एकमेकांच्या आवडी निवडी, एकमेकांच्या सवयी, त्यांची विचार करण्याची पद्धत आणि अजून बरंच काही.

गप्पा मारून झाल्यावर अविनाश तिला तिच्या घरी सोडायला आला . तिने आजूबाजूला बघितलं पण तिचा पाठलाग करणारा मुलगा तिथे दिसला नाही. मग अविनाशला बाय म्हणून ती कॉम्प्लेक्सच्या गेट मध्ये शिरली. मागे वळून बघते तर अविनाश गेटवर नव्हता. तिने थोडं दूर बघितलं तर रात्रीच्या अंधारात अविनाशची बाईक वेगाने

जाताना दिसली. अविनाश दिसेनासा होताच तिची पावलं आपोआप घराच्या दिशेने वळली.

****************************************

घरी पोहोचल्या पोहोचल्याच तिने अविनाशला मेसेज केला. ' घरी पोचलास की मेसेज कर. ' आणि मोबाईल चार्जिंगला लावून आईला मदत करायला किचन मध्ये गेली. सगळं आवरून झाल्यावर तिने परत येऊन मोबाईल बघितला तर तिने पाठवलेला मेसेज अविला अजून डिलिव्हर झाला नव्हता. तिला थोडी काळजी वाटू लागली. कारण अविला इथून जाऊन साधारणतः दोन तास झाले होते. एव्हाना तो घरी पोचायला हवा होता. त्याला बाईक खूप जोरात चालवायची सवय आहे हे सुद्धा रश्मीला त्याने कॉफी पिताना सांगितलं होतं. त्यामुळे तिला जास्तीच काळजी वाटत होती. नानाविध शंका तिच्या मनात येत होत्या. किती

तरी वेळा तिला वाटलं...' कॉल करून विचारू का? पण मी कॉल केला तर त्याला काय वाटेल? तो काय विचार करेल? आणि मुख्य म्हणजे मी का त्याची इतकी काळजी करतेय? इतक्या कमी वेळात मी त्याच्याशी एवढी अटॅच झालीये का? की त्याला साधा मेसेज डिलिव्हर नाही झाला तर मी अस्वस्थ व्हावं. जाऊ दे. तो बघितल्यावर करेल रिप्लाय.... ' असं स्वतःशीच म्हणून रश्मीने दुसरीकडे मन वळवण्याचा प्रयत्न केला. पण तरीसुध्दा मोबाईल वाजला की त्याचा मेसेज असेल म्हणून ती उत्सुकतेने व्हॅट्स अँप ओपन करायची आणि मग तिचा हिरमोड व्हायचा. मग तिने एअरफोन्स कानात टाकले आणि तिची आवडती प्लेलिस्ट चालू केली. जेव्हा कधी तिला बोअर व्हायचं तेव्हा ती प्लेलिस्ट ऐकत बसायची. एक दोन गाणी ऐकली असतील तेवढ्यात वरच्या नोटिफिकेशन बारवर अविनाशचं नाव दिसलं. तिने लगेच मेसेज ओपन केला.

'हे. सॉरी. हो मी पोहोचलो आत्ता घरी. '

रश्मीने मेसेज वाचला. जरा रागातच. आणि ‘ओके. गुड नाईट. ’ एवढाच रिप्लाय केला. तिच्या त्या रिप्लाय वरून तिचा मूड ऑफ आहे हे समजायला अविनाशला वेळ लागला नाही. मुलीचा मूड ऑफ असला आणि तिला काय झालंय हे विचारलं नाही तर तो मुलगा कसला. मग तो अवि असो वा दुसरा कोणी. त्याने लगेच रश्मीला कॉल केला. त्याचा कॉल आलेला बघून रश्मीला एकदम हसायला आलं. पण तरीही तिने लटक्या रागातच फोन उचलला.

“हं.”

“काय ग...काय झालं?”

“कुठे काय? काही नाही.”

“हो का. चेहऱ्यावरून मूर्ख दिसतो ग मी फक्त. पण प्रत्यक्षात नाहीये.” अविनाश हसतच म्हणाला.

त्याच्या अशा बोलण्यावर रश्मीलासुद्धा हसायला आलं पण आलेलं हसू दाबत ती म्हणाली“मला कसं माहीत असणार? मी थोडीच ना तुला खूप दिवसांपासून ओळखते.”

“हा. ते सुद्धा बरोबर आहे म्हणा. पण मी जेवढं तुला या काही दिवसांपासून ओळखतो त्यावरून आता हे नक्की सांगू शकतो की तुझा मूड खराब आहे. त्यामुळे आता जास्ती भाव न खाता सांग काय झालं? अर्थात ; तू सांगायला कम्फर्टेबल असशील तर.” अविने त्याचा डाव टाकला.

रश्मी विचारात पडली. आता याला काय सांगायचं. याला असं थोडंच सांगू शकतो की तू लवकर रिप्लाय दिला नाहीस म्हणून मी रागावलेय. त्याचा काही वेगळाच गैरसमज होईल.

“अरे काही खास नाही. ही घरी आई कटकट करत होती. म्हणून जरा मूड ऑफ होता.”

हे खरं कारण नाहीये हे अविला लगेच समजलं. पण तरीही अजून खोलात न शिरता त्याने ते कारण त्याला पटलय असं दाखवलं. त्या नंतर ते बराच वेळ फोनवर बोलत होते. बोलता बोलताच अविनाशला झोप लागली कारण त्याला रात्री जागायची फारशी सवय नव्हती. एरवी साधारणतः साडेदहा अकरालाच त्याची रात्र होऊन जायची.

रश्मी मात्र एक दोन वाजेपर्यंत जागायची. अविनाश झोपला तरी रश्मीने फोन चालूच ठेवला. तो पूर्णपणे झोपला याची खात्री होताच त्याला गुड नाईट म्हणून तिने फोन ठेवून दिला आणि पुन्हा प्लेलिस्ट चालू केली.

---

"रश्मी. ए रश्मी. अगं ऊठ. वाजले बघ किती. आज ऑफिसला नाही जायचं का?" आईने हाक मारताच रश्मी ताडकन उठून बसली.

डोळे चोळत चोळतच तिने मोबाईलमध्ये बघितलं तर साडेसात वाजले होते.

"शीट. साडेसात वाजले. आई, तू उठवलं का नाहीस मला?"

"मला काय माहीत तू अजून उठली नाहीये. मला वाटलं उठून आवरत असशील. पण नेहमीच्या वेळेला बाहेर आली

नाही म्हणून बघायला आले मी. तर तू आपली साखरझोपेत. सकाळी लवकर उठायचं असतं तर रात्री जरा लवकर झोपावं ना माणसाने. तर ते नाही."

"ए आई. तू प्लीज आता सकाळी सकाळी सुरू नको ना होऊस. आधीच मला उशीर झालाय. मी आवरते पटकन. तू कॉफी करून ठेव ना प्लिज."

"हो. केव्हाही बनवून ठेवलीय. तू जा आवर पटकन."

"अरे माझी स्वीट मम्मा .." असं म्हणून तिने आईचा एकदम गालगुच्चाच घेतला.

"बस बस. अगदीच लाडात नको येऊस. जा आवर पटकन." आई हसतच म्हणाली आणि किचनमध्ये निघून गेली.

रश्मी ऑफिसमध्ये पोहोचली तेव्हा अविनाश कोणाशीतरी फोनवर बोलत होता. रश्मीला पाहताच त्याने

इशाऱ्यानेच तिला गुड मॉर्निंग केलं आणि पुन्हा आपलं लक्ष फोनवरच्या माणसाकडे वळवलं. रश्मी सुद्धा तिचा पीसी चालू करून कोणाचा मेल आलाय का ते चेक करू लागली. फोनवर बोलल्यावर अविनाशने थोड्या नाराजीतच फोन ठेवून दिला. त्याने फोन ठेवताच रश्मी म्हणाली.

"अरे अवि. सो सॉरी. मला यायला जरा उशीरच झाला."

"ठीक आहे ग. त्यात काय एवढं. माझ्या दिवसाची सुरवातच नकार घंटेने झालीये."

"का? तुला सकाळी सकाळी तोंड पाडायला काय झालं?"

"अगं अजून एक हॉल वाल्याला फोन केला होता. त्याच्याशी बोललो सविस्तर. सगळं बोलून झालं आणि मग म्हणतो की सर सकाळी फ्री आहे हॉल. संध्याकाळी एक वाढदिवस आहे. मग हे आधी नाही का सांगता येत याला. मी सुरुवातीलाच विचारलं की संध्याकाळी फ्री आहे का म्हणून..."

"अरेरे...जाऊ दे आपण अजून प्रयत्न करू. आपण राजला विचारायचं का? त्याच्याकडे नक्की कॉन्टॅक्टस असतील. आपल्या कंपनीशी कनेक्टेड..."

"अरे हो. हे आपल्या लक्षातच नाही आलं. आपण आपल्याच कॉन्फिडन्स मध्ये होतो. त्यालाच जाऊन विचारू."

असं म्हणून त्याने रामसिंगला राज आलाय का म्हणून विचारलं. तर रामसिंग कडून त्यांना असं कळलं की राज चार दिवसांसाठी ऑफिसच्या कामासाठी बाहेरगावी गेला आहे. झालं, परत घोडं अडलं.

"रश्मी, आता आपल्यालाच काहीतरी करावं लागेल..."

"हो. करू रे आपण. तूच करशील बघ. मला विश्वास आहे तुझ्यावर..."

"मी काय म्हणतो. जर हॉल मिळत नाहीये आपल्याला, तर आपण एखाद्या ग्रीन पार्टी लॉन बघितला तर. रात्रीचीच आहे ना पार्टी. तर ते पण मस्त होईल."

“क्लायंटला विचारावं लागेल ना आधी. त्यांना काही प्रॉब्लेम नसेल तर मग ठीक आहे. आणि लॉनवर असला तर मग आपल्याला आपल्यानुसार डेकोरेशन पण करता येईल.”

“हो. त्यांना कॉल करून विचारू आपण. की भेटून बोलायचं. म्हणजे सविस्तर बोलता येईल.”

“आय थिंक भेटून बोलावं. ते जास्त बेटर होईल.”

“ठीक आहे मग. आजच जाऊया मग...”

“चालेल. लंच नंतर जाऊ. तो पर्यंत काही लॉन ची माहिती काढू. त्यांचे फोटो वगैरे. म्हणजे त्यांना दाखवायला बरं पडेल.”

“येस. आता तरी जीव शांत झाला का तुझा? कालपासून टेन्शन घेऊन बसलायस नुसता...” रश्मीने हसतच विचारलं.

“येतं ग मला टेन्शन. मला काम वेळच्या वेळी झालेलं आवडतं. नाही झालं की मग माझी चिडचिड होते. आय नो

की या बिझनेसमध्ये डोकं शांत ठेवावं लागतं. पण नाही जमत मला. जेवढं जमतं तेवढं शांत राहण्याचा प्रयत्न करतो मी...”

“हम्म. जमेल जमेल. मी आहे ना. शिकवेन तुला...”

“हाहा...बघ ट्राय करून. जमलं तर माझ्या साठी चांगलंच आहे....” असं म्हणून अविनाश त्याच्या पीसीकडे वळला. रश्मी मात्र काही सेकंद विचारात गढून गेली.

दुपारी लंच नंतर रश्मी आणि अविनाश संपूर्ण तयारीनिशी क्लायंट कडे गेले. त्यांनी दोन तीन पार्टी लॉन चे फोटो वगैरे त्यांना दाखवले. क्लायंटला सुद्धा ते थोडं वेगळं वाटलं कारण या आधीचे सगळे इव्हेंट्स त्यांनी कोणत्या ना कोणत्या हॉल मध्येच केले होते. आणि हा इव्हेंट संध्याकाळचा असल्यामुळे उन्हाचा वगैरेपण प्रश्न नव्हता. शिवाय काहीतरी वेगळं करतोय त्यामुळे सगळे खुश होतील

असा सगळा विचार करून क्लायंटने त्या प्रोपोजलला होकार दिला.

"झालं. एक महत्त्वाचं काम झालं. किती हलकं वाटतंय माहितीये..."

"मी म्हणाले होते ना तुला. तूच उगाच टेन्शन घेत होतास. शांत डोक्याने काम केलं तर सगळी काम होतात. आता हे लॉनचं पण तुलाच सुचलं ना ."

"हो. पण.."

"राहू दे. माहितीये मला तू काय बोलणार आहेस ते."

"हाहा" अविनाश खळखळून हसला."बरं. आता लवकरात लवकर लॉनचं बुकिंग करून टाकू. म्हणजे नंतर काय सिन व्हायला नको."

"हो. पण जरा काही खाशील की नाही. लंचची वेळ झालीये. काही तरी खाऊया आधी."

“चालतंय की.”

“अरे देवा. तुझ्यात पण राणा आला की काय?”

“नाही नाही. मी आपलं सहजच बोललो. चल जाऊ. ते बघ समोर मॅक डी दिसतंय. माझं दुसरं घर.”

“अरे बाबा. एवढं पिझ्झा बर्गर खायचं नाही. हेल्थ साठी चांगलं नसतं ते आणि त्यात तू जिमला पण जातोस.”

“मी वजन वाढवतोय. माझ्यासाठी चांगलंय ते...”

“तुझ्याशी बोलण्यात कधी जिंकली आहे का मी? तुझंच खरं करणार तू. खा बाबा काय खायचं ते..”

“इथून आपण परत ऑफिसला जायचंय?” अविनाशने बर्गरचा घास घेता घेता विचारलं.

“उमममम, काय माहीत . नाही गेलं तरी चालेल ना तस. कारण आपलं आजचं काम तर झालंय. आता फक्त आपल्याला प्लँनिंग करायचंय.”

“हा. राजला विचारू का कॉल करून?”

“अरे. राज नाही आहे ना. विसरलास का?”

“अरे हो. मग नको जाऊया ऑफिसला.”

“चालेल. पण मला एवढ्या लवकर घरी सुद्धा नाही जायचं हा. नाही तर बोअर होईन मी घरी...”

“मग कुठे जायचंय राणीसाहेबांना...” अविनाशने हसतच विचारलं.

“मला काय माहीत. ते डिपार्टमेंट माझ्याकडे कधीच नसत. नेहमी माझे फ्रेंड्स च ठरवतात. कुठे जायचं ते...”

“बरं. मग मूवीला जाऊया.”

“एक था टायगर आहे आणि जुमानजी. बघितले मी दोन्ही...”

“च्या आयला. म्हणजे हा मेन ऑपशनच नाहीये.”

“तूच सांग मग. फिरायला जायचं का कुठे...”

“हम्म्म्म. साऊंड्स गुड”

“मग आता कुठे ते तरी सांग .”

“मरीन्स ला जाऊया.”

“ते पण माझं दुसरं घर आहे. मरीन्सला जायला मी कधीपण रेडी असतो...”

“ओह. मस्तय रे ती जागा. फक्त ऊन असलं की जरा कंटाळा येतो. रात्रीचा नजारा तर बाप...”

“आय नो.” अविनाश बाईक स्टार्ट करत म्हणाला.

“निघुया?”

“हो...” असं म्हणत नेहमी दोन्ही पाय एका साईडने टाकून बसणारी रश्मी या वेळी मात्र जसे आपण आपल्या जवळच्या मित्राच्या बाईकवर बसतो तशी बसली.

ती बसली तसा अविनाश दोन क्षण तिच्याकडे पाहतच राहिला.

“काय झालं?” रश्मीने विचारलं.

“काही नाही” स्वतःशीच हसत अविनाशने गियर टाकला.

*****************************************

दुपारी चारची वेळ असल्यामुळे रस्त्यावर फारसं ट्रॅफिक नव्हतं. साधारण अर्ध्या पाऊण तासात ते मरिन ड्राईव्ह ला पोचले. ते पोहोचले आणि त्यांच्यावर जणू वरुणदेवाची कृपाच झाली. एक भला मोठा ढग आला आणि त्याने आग

ओकणार्या सूर्याला पूर्णपणे झाकून टाकलं. काही क्षण आधी रणरणत ऊन पडलं होतं आणि आता लगेच संध्याकाळ झाल्याचा फील येत होता. अविनाश रस्त्याच्या कडेला बाईक पार्क करत होता तो पर्यंत रश्मी मरीनलाईनचा कट्टा चढून बसली सुद्धा. मग अविनाशसुद्धा तिच्या बाजूला जाऊन बसला.

"किती छान वारा सुटलाय ना. कोणी सांगेल तरी का की इथे दहा मिनिटं आधी इतकं कडक ऊन पडलं होतं ."

"मुंबईतला पाऊस आहे रश्मी हा. कधी येईल कधी जाईल काही नेम नाही."

"हो. ते आहेच. तुला आवडतो का पाऊस...."

"ते डिपेंड करतं की मी तेव्हा काय करतोय. म्हणजे मी घरी असेन ना. तर मग मला पाऊस आवडतो. बाहेर असेल तेव्हा नाही..." अविनाश हसत म्हणाला.

"म्हणजे. ?" रश्मीने प्रश्नार्थक नजरेने विचारलं.

“म्हणजे मला पाऊस फक्त बघायला आवडतो. मस्त गरमागरम कॉफी, आईच्या हातची कांदाभजी आणि पाऊस. हे सगळं असलं म्हणजे जन्नत...पण जर हा मला भिजवायला आला तर मग मला वैताग येतो.”

“अरे रे...तुझ्या सारख्या पामराला काय माहीत पावसात भिजण्याची मजा. एकदा भिजून बघ. स्वर्गीय सुख मिळाल्यासारखा आनंद होईल तुला...”

“नको. राहू दे. तसही पावसाकडे बघण्याचा प्रत्येकाचा दृष्टिकोन वेगळा असतो. जर कपल असेल त्यांना पाऊस हा फक्त भिजण्यासाठी हवा असतो, लेखक कवी असेल तर त्यांना काहिनाकाही लिहायला सुचतं. चाकरमानी असेल तर त्याला त्याचा नेहमी रागच येतो.”

बराच वेळ दोघे बोलत बसले होते. बघता बघता सहा कधी वाजले त्यांना कळलंच नाही. ते निघणार तेवढ्यात पावसाची रिपरिप सुरू झाली.

“अवि, आज पावसाने तुला स्वर्गीय सुख द्यायचं ठरवलं वाटतं...” रश्मी बाईकवर बसत म्हणाली.

“वाटतंय खरं. देव पण मुलींचं ऐकायला लागला वाटतं. मी घरी पोचेपर्यंत जास्त जोरात नाही आला म्हणजे झालं...”

मनोमन प्रार्थना करत अविनाश चालला होता खरा पण वरूणराजाची मर्जी काही औरच होती. ते दोघे रश्मीच्या घरी पोहोचले तेव्हा पावसाने चांगलाच जोर पकडला होता.

“रश्मी. एवढी कशी काय भिजलीस पावसात? छत्री होती ना तुझ्याकडे...”

“हो. होती ग छत्री...” रश्मी बॅग ठेवत म्हणाली.

“वाह. तरी भिजत आलीस. छत्री काय शोसाठी घेतली आहेस का?”

“अगं आई. मी बाईकवरून आले ना, मग छत्री कशी उघडणार आणि पाऊस आत्ता आला जोरात. एवढा वेळ नुसती रिपरिप चालू होती.”

“बाईकवरून?” आईने आश्चर्याने विचारलं.

“कुणाच्या?”

“अगं माझ्याबरोबर तो नवीन मुलगा जॉईन झालाय ना. आम्ही सेम प्रोजेक्ट वर आहोत. आणि आज क्लायंट कडे गेलेलो. म्हणून मग त्यानेच सोडलं घरी.”

“वाह. छान...आणि मग त्याला भिजतचं पाठवलंस. घरी बोलवायचंस ना...”

“अरे यार. हे माझ्या लक्षातच नाही आलं...”

रश्मी तशीच बाहेर गेली तर अविनाश खाली आडोशाला उभा राहून पाऊस कमी होण्याची वाट पाहत होता. रश्मीने

त्याला हाक मारून तिथेच थांबायला सांगितलं आणि ती छत्री घेऊन खाली गेली.

“काय झालं?”

“अवि यार. सो सॉरी. मी तुला घरी बोलवायला हवं होतं. माझ्या लक्षातच नाही आलं. आई बोलली तेव्हा ट्यूब पेटली माझी.”

“अगं. त्यात काय एवढं. आज पहिल्यांदा थोडी ना सोडायला आलोय तुला...” अविनाश हसतच म्हणाला.

“हो ते आहेच. बरं. आता प्लिज वरती चल. पाऊस काय लवकर थांबेल असं वाटत नाही.”

“नको. आता थांबेल थोड्या वेळात. ते बघा आकाश मोकळं दिसतंय पुढे.”

“तो थांबेल रे. पण तू चल ना घरी. पाऊस थांबला की जा. असाच ओला ओला बाहेर थांबलास तर थंडी भरेल.”

"नको रश्मी. राहू दे. मी इथेच बरा आहे."

"आता उगाच नाटकी करू नकोस. गुपचूप चल."

अविनाश तिच्या घरी जायला तयारच नव्हता पण शेवटी स्त्री-हट्टापुढे कोणाचं काही चाललंय का. नाईलाजाने अविनाश तिच्यासोबत वर गेला. तो वर जाताच रश्मी ने त्याची आणि तिच्या आईची ओळख करून दिली. तिच्या आईने त्याला केस कोरडे करण्यासाठी टॉवेल दिला आणि ती कॉफी करण्यासाठी किचनमध्ये गेली.

"रश्मी. कशाला काकूंना उगाच त्रास..."

रश्मीच्या आईने ते किचन मधून ऐकलं.

"अरे त्रास कसला त्यात . तू पहिल्यांदाच आमच्या घरी आला आहेस तर तुला नुसतंच जाऊन देईन का मी. मी तर म्हणते आता आला आहेस तर जेवूनच जा."

“नाही नको काकू. मी जाणार नाही तो पर्यंत आईसुद्धा जेवणार नाही. मी थोड्या वेळाने निघतो.”

“आईला फोन करून सांग ना मग की मी जेवून येईन.”

“आज नको काकू. पुन्हा कधी तरी नक्की येईन. तसही रश्मी म्हणाली आहे की तुमच्या हाताला खूप छान चव आहे. एक दिवस नक्की येईन मी पण आज नको...”

रश्मीच्या आईने त्या दोघांना कॉफी दिली आणि ते तिघे गप्पा मारत बसले. थोड्या वेळाने पाऊस कमी झाला तसा अविनाश घरी जायला निघाला. रश्मी त्याला दरवाज्यापर्यंत सोडायला गेली. अविनाश जाताच रश्मीच्या आईने रश्मीला चिडवत विचारलं.

“चांगला आहे मुलगा, फक्त मित्रच आहे अजून काही.”

“आई. काय ग तू पण; आम्ही भेटून हार्डली काही दिवस झाले आहेत. अजून तर फक्त फ्रेंडच आहोत...” असं म्हणून रश्मी तिच्या रूम मध्ये गेली.

सगळं आवरून रश्मीने झोपायच्या आधी फोन चेक केला तर अविनाशचा मेसेज आला होता. ' पोचलो ग घरी. आता ऑनलाइन नाही येणार. लवकरच झोपतो आज. उद्या भेटू. गुड नाईट. '

मेसेज बघून का कोण जाणे ती स्वतःशीच हसली आणि त्याला रिप्लाय करून तिने तिची आवडीची प्लेलिस्ट चालू केली आणि एअरफोन्स कानात टाकून फेसबुक वॉल चेक करू लागली. पण तरीसुद्धा तिच्या मनातून अविनाशचा विचार काही जात नव्हता. आपल्याला आवडायला लागलाय का तो? की असंच आपल्या मनाचे खेळ आहेत? आम्ही हल्ली खूप जास्ती एकत्र असतो म्हणून तर मला वाटत नाहीये ना असं? मी जसा विचार करतेय तसाच विचार तो सुद्धा करत असेल का? तसं त्याच्यात न आवडण्यासारखं काय आहे? हँडसम आहे. स्मार्ट आहे. बियर्ड तर किती भारी दिसते त्याला. ऑफिसमधल्या मुलींनासुद्धा मी त्याच्याबद्दल बोलताना ऐकलंय. त्या बाजूच्या डिपार्टमेंट मधल्या दोघी तर अशी खुन्नस देत असतात ना मला की बस. मी गुंतत

चाललीये का अविनाशमध्ये? कंट्रोल रश्मी कंट्रोल. आपल्याला या सगळ्यात नाही पडायचं. एकदा माती खालीये ना आपण या सगळ्यामुळे. मग परत कशाला? हे सगळे विचार मनातून काढून टाकायला हवे. नाहीतर मग त्याच्याशी बोलणंही कठीण होऊन बसेल. असं सगळं विचारचक्र तिच्या डोक्यात चालू होतं. विचार करता करताच तिला झोप लागली आणि मोबाईल मधलं गाणं तसंच चालू होतं.

‘साँची साँची तेरी नज़रें एक दर्पण

दे दे मन की ये ख़बरें एक पल चीन

अधरों ने कुछ ना कहा रे

नैनों ने कह दिया

ओ

तूने तो पल भर में

चोरी किया रे जिया

मोरा जिया.... '

*****************************************

इव्हेंटचं लोकेशन ठरलं आणि मग पुढच्या कामात तर अविनाश आणि रश्मी निष्णात. बाकीचं सगळं सेट अप करायला त्यांना फार काही मेहेनत करावी लागली नाही. इव्हेंट एकदम मस्त पार पडला आणि त्यांना सगळ्यांची वाहवाह सुद्धा मिळाली. त्यांच्या या इव्हेंटचा पुढे कंपनीला नक्कीच फायदा होणार होता. त्यामुळे राजसुद्धा त्यांच्यावर एकदम खुश होता.

इव्हेंट संपल्यावर अविनाशने रश्मीला त्यांचा वीकएन्डचा प्लॅन सांगितला. सलग तीन दिवस सुट्टी असल्यामुळे त्यांचा

संपूर्ण ग्रुप बाईक घेऊन शेगावला जाणार होता. तसे ते सगळे बॅचलर्स. पण तरी सुद्धा शेगाव बद्दल बरंच काही ऐकून असल्यामुळे यावेळी त्यांनी तिथे जायचं ठरवलं. शेगावचा प्रवास तसा लांबचाच. पण अविनाश आणि त्याचे मित्रमंडळीही तसेच हौशी. आता रश्मीवर एक जबाबदारी येऊन पडली. ट्रीपला जाण्यासाठी घरून परवानगी कशी काढायची? देवदर्शनाच्या नावाखाली जायचं सांगितलं तरी बाईकने एवढ्या लांब जाण्यासाठी तिला घरून कधीच परवानगी मिळाली नसती. शेवटी बरंच डोकं चालवल्यावर तिला मार्ग सुचला.

"आई. बाबा आले का?" रश्मीने चप्पल काढता काढता दारातूनच विचारलं.

"नाही अजून. आज आल्याआल्या तुला बाबांची कशी काय आठवण आली?"

"आठवण वगैरे नाही ग."

‘ बाबा नाही आहेत तो पर्यंत आईला पटवलेलं बरं. नंतर तिला आपल्या साईड ने घेता येईल. ’ रश्मी मनात म्हणाली.

“आई. पुढच्या आठवड्यात लाँग विकएन्ड आहे ना. तर ऑफिस मधले सगळे शेगावला जाणार आहेत.”

“बरं मग?”

“मग मी पण जाईन म्हणते...”

“तू विचारतेय की सांगतेय?” रश्मीची आई तिला पाण्याचा ग्लास देत म्हणाली.

“दोन्ही. विचारतेय पण आणि सांगतेय पण...” रश्मी एकदम निरागस चेहरा करत म्हणाली.

“तू आणि तुझे बाबा दोघे बघा काय ते. मला उगाच मध्ये घेऊ नकोस...”

“पण तू सांगितलंस तर ते नाही म्हणणार नाही.”

“मी काहीही सांगणार नाही. तुला जायचंय तर तूच विचार...”

“बरं. बघते विचारुन. पण तू सुद्धा थोडा मस्का मारायला मदत कर हा.” रश्मी लाडीकपणे म्हणाली.

रात्री रश्मीचे बाबा घरी आले. आज त्यांना जरा उशीरच झाला यायला. चेहऱ्यावरून ते जरा त्रासलेले वाटत होते. सकाळी लवकर उठायचं, एवढा प्रवास करून कामाला जायचं, दिवसभर काम आणि मग परत गर्दीमध्ये प्रवास. जसे आपण वैतागतो तसे ते सुद्धा वैतागायचे. ‘आता जर बाबांना विचारलं तर ते काहीही विचार न करता सरळ नाही म्हणणार. त्यापेक्षा उद्या सकाळीच विचारलेलं बरं. ’ रश्मीने मनोमन विचार केला. जेवत असताना आईने तिच्याकडे पाहिलं तर तिने खुणेनेच आईला नकार दिला.

सकाळच्या चारच्या गजराने तिला जाग आली. तसं ती नेहमी उशिराच उठायची पण तिचे बाबा लवकर जायचे ना. म्हणून मग आज तीसुद्धा लवकर उठली. ती बाहेर आली

तेव्हा तिचे बाबा टीव्ही समोर बसून चहा पीत होते. रश्मीला या वेळेला बाहेर पाहून त्यांना आश्चर्यच वाटलं.

"रश्मी. आज सूर्य पश्चिमेला उगवला की काय ? तू एवढ्या लवकर उठलीस?"

"काही खास नाही बाबा. सहजच जाग आली."

"अच्छा. सहजच ना...."

"हो. सहज म्हणजे. ते...."

"कुठे जायचंय?" रश्मीच्या बाबांनी सरळ मुद्द्याला हात घातला.

रश्मीने चमकून आईकडे पाहिलं. आईने सहजच मान डोलावली.

"अक्चुअली बाबा. ऑफिसमधले सगळे शेगावला चाललेत. तर मी पण जाऊ का त्यांच्यासोबत?"

“हो, जा ना. त्या निमित्ताने देवदर्शन होईल आणि ऑफिसमधल्या इतर लोकांशी ओळख पण होईल. कसे जाणार आहात?”

“अजून काही सांगितलं नाहीये. कळेल आज. पण जाऊ ना मी?” रश्मीने खात्री करून घेण्यासाठी पुन्हा एकदा विचारलं.

“हो. जा. आता तू काही लहान नाहीस. तुझं चांगलं वाईट तुला कळतं. फक्त काळजी घे इतकंच.”

“हो. थँक्स बाबा.”

“बरं. आता जा झोप जा. तुझी सकाळ व्हायला अजून वेळ आहे.”

“हो.” रश्मी हसतच म्हणाली.

जाताजाता आईचा मुका घ्यायला ती विसरली नाही.

ऑफिसमध्ये येताच तिने अविनाश आलाय का ते दुरून बघितलं. पण तो काही दिसला नाही. तिने डेस्क वर जाऊन बॅग ठेवली तेवढ्यात अविनाश आला.

"अवि, बाबांनी चक्क काहीही जास्ती न विचारता परमिशन दिली."

"अरे वाह. पण काही विचारलं कसं नाही त्यांनी?"

"अरे मी त्यांना सांगितलं ना की शेगावला जायचंय. माझे बाबा तसे देवभोळे आहेत थोडे. आणि मी त्यांना बाईकने जातोय हे नाही सांगितलं."

"अच्छा. पण रश्मी. तुला जमणार आहे का एवढ्या वेळ बाईकवर बसायला? कारण आम्हाला सगळ्यांना सवय आहे. आमच्या ग्रुप मध्ये आहेत तशा तीन मुली. पण त्यांना सुद्धा सवय आहे. तू कधी केला नाहीस ना एवढा प्रवास."

"त्यात काय नाय रे. जमेल मला. एवढं काय त्यात..."

“बरं. ठीक आहे. शुक्रवारी पहाटे निघायचं आहे. तुझे बाबा सोडायला नाही येणार ना. नाहीतर ते तुला रेल्वे स्टेशन वर सोडायला यायचे.” अविनाश हसतच म्हणाला.

“तू उगाच नरपती लावू नकोस. त्यांना सांगेन मी ऑटो ने जाईन अस.”

“हं. कॉफी?”

“हो. चल. त्या शिवाय ऑफिस सुरू नाही होत माझं.”

त्या दिवशी रश्मी आणि अविनाशला फार काही काम नव्हतं. मागचा इव्हेंट यशस्वी झाल्यामुळे राजने त्यांना हा आठवडा कामातून सुट्टी दिली. त्यामुळे ते दोघे शेगावंच प्लॅंनिंग करण्यात व्यस्त होते. त्यांनी शेगावला गेल्यावर कोणत्या हॉटेल ला थांबायचं, कुठे कुठे फिरायचं हे सगळं ठरवून ठेवलं. कुठे जायचं म्हटलं की रश्मी नेहमीच उत्साहात असायची. शाळेची एक सुद्धा पिकनिक तिने सोडली नव्हती. तशी तिला घरून थोडी बंधनं असायची पण

ती काही ना काही कारण सांगून तिची फिरायची हौस पूर्ण करून घ्यायची. आता सुद्धा कधी एकदा शेगावला जातो असं तिला झालं होतं. त्यातसुद्धा बाईकने जायचं म्हणून ती विशेष आनंदात होती.

जायच्या दोन दिवस आधीच रश्मीने पॅकिंग सुरू केली. पण पॅकिंग करताना सॅक फार जड होणार नाही याची काळजी तिने घेतली. शेगावला थोडं आध्यत्मिक वातावरण असल्याने तिने एक पंजाबी ड्रेस सुद्धा बरोबर घेतला. बाकी नेहमी लागणाऱ्या छोट्यामोठ्या गोष्टी तिने आठवणीने बॅगेत ठेवून दिल्या. सगळं आवरून ती झोपणार इतक्यात अविनाशचा फोन आला. आणि मग बोलता बोलता रात्रीचे दोन कधी वाजले त्यांना कळलंही नाही. झोपताना अविनाशने रश्मीला त्यांच्या व्हॅट्स अप ग्रुप मध्ये ऍड केलं. जायच्या आधी जे काही ठरेल ते तिलासुद्धा समजावं म्हणून.

गुरुवारी रश्मी लवकरच जेवून झोपली. झोपली म्हणजे नुसती बिछान्यावर पडून होती. कुठे जायच असलं तर आपल्याला कधी झोप येते का? एवढी एक्ससाईटमेंट असते

की झोप पार उडून जाते. तिने अविनाशचं लास्ट सिन चेक केलं. थोड्या वेळापूर्वीचचं होतं.

“हाय... झोपलास का?” तिने अविला मेसेज टाकला आणि मग सकाळपासुन अनरीड असलेले मेसेज उघडून नुसती स्क्रोल करू लागली. ते मेसेज वाचायची खरं तर तिची इच्छा सुद्धा नव्हती. पण अविचा रिप्लाय येईपर्यंत काहीतरी टाईमपास असा विचार करून ती ग्रुप मधले मेसेज वाचत होती.

साधारण पंधरा मिनिटांनी अविचा रिप्लाय आला.

“हाय. बॅग भरत होतो. म्हणजे सकाळी घाई नको व्हायला. नाहीतर माझं नेहमी काही न काही तरी राहून जातं. तुझी झाली भरून?”

“हो मग, मी कालच भरून ठेवली.”

“वाह. जास्तीच फास्ट आहेस तू.”

“कुठे फिरायला जायचं असलं की मला जरा जास्तीच एक्ससाईटमेंट असते.”

“हो, कळलं ते. मला वाटलं तू झोपली असशील.”

“विचार तोच होता. पण झोपच येत नाहीये.”

“का बरं…?”

“नेहमीचंच आहे ते. कुठे जायचं असलं ना की मग माझ्या मनात सारखे तेच विचार येत असतात. अजिबात झोप येत नाही.”

“लहान मुलांना होतं असं.” अविनाश मुद्दाम रश्मीला चिडवण्यासाठी म्हणाला.

“असू दे हा.”

“हाहा. जस्ट किडींग.”

“बरं. पण तुला झोपावं लागेल आता. कारण तुला बाईक चालवायची आहे दिवसभर.”

“हो. पण मला बाईक चालवताना झोप नाही येत ग. आपण चिंता करू नये. आपल्याला सुखरूप घरी परत पार्सल केलं जाईल.”

अविनाशचा हा मेसेज बघून रश्मीला हसायलाच आलं.

“हो. ते माहितीये मला. पण तरी सुद्धा. आराम कर तू. आणि तसही तुझं झोपायचं टाईम झालंच आहे.”

“हो ते ही आहेच म्हणा...”

“हो ना. मग झोपा राजे. भेटू उद्या.”

“जो हुकूम मेरे आका. चलो गुड नाईट. टेक केअर.”

“गुड नाईट.”

अवि ऑफलाईन गेल्यावर तिने सुद्धा मोबाईल चार्जिंगला लावला आणि थोड्यावेळाने निद्रादेवी तिच्यावर मेहेरबान झाली.

सकाळी घड्याळाचा गजर वाजायच्या आधीच तिला जाग आली. तिने वेळ पहिली तर साडेचार वाजले होते. आता उठलीच आहे तर घेते सगळं आवरून असा विचार करून ती मोठ्या कष्टाने बेडवरून उठली. एकदा मोबाईल चेक करून तिने तो चार्जिंगला लावला आणि रात्रभर चार्जिंगला लावलेली पॉवर बँक तिने आठवणीने बॅगेत ठेवून दिली. तिने सावकाश सगळं आवरलं आणि खाली जाणार इतक्यात रश्मीची आई तिच्या रूम मध्ये आली.

"अरे वाह. आज मॅडम लवकर उठलेल्या दिसतायेत. जायचंय म्हणून झोप लागली नाही वाटते..."

"झोपले होते. पण लवकर जाग आली. मग म्हटलं की जाग आलीच आहे तर आवरून घेते सगळं. परत मग घाई व्हायला नको."

“हम्म. कॉफी हविये का?”

“हो. प्लिज कर ना. क्रीम पण टाक हा थोडं...”

“हो. टाकते. ये लवकर खाली. बाबा थांबलेत...”

“बाबा?” रश्मीने आश्चर्याने विचारलं.”बाबा कशाला उठलेत आज लवकर?”

“तुला सोडायला येणार आहेत ते.”

हे ऐकताच रश्मीच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्हं उभं राहिलं.

“अगं आई मी जाईन ऑटो ने. बाबांना कशाला उगाच त्रास.”

“ते तुमचं तुम्ही बापलेक बघून घ्या बाई. मला त्यात ओढू नका. चल आता ये लवकर खाली.”

“हो आले .”

आई गेल्यावर रश्मी थोडी विचारात मग्न झाली. आता काय करायचं? बाबा जर सोडायला आले आणि त्यांना कळलं की मी त्यांच्याशी खोटं बोलतेय तर ते नंतर मला कधीच कुठे पाठवणार नाहीत. काय करावं? अविला विचारावं का? नको राहूदे. पहिले आपल्याच्याने काही होतं का पाहूया नाहीतर मग नंतर अविला कॉल करू.

ती खाली आली तेव्हा तिचे बाबा टीव्हीवर सकाळच्या बातम्या पाहत होते.

"बाबा. तुम्ही कशाला उगाच सुट्टीच्या दिवशी लवकर उठलात. थोडा आराम करायचा ना."

"असू दे ग. तसही नेहमीच्या वेळेला जाग येते तर मग उगाच लोळत पडण्यापेक्षा उठलेलं बर. उठलोच आहे तर तुला सोडून येईन स्टेशनला."

“अहो बाबा कशाला. मी जाईन ऑटोने आणि माझ्याकडे काही फार मोठ्या बॅगा वगैरे सुद्धा नाही. एकच तर सॅक आहे.”

“तरीसुद्धा. एवढ्या सकाळी सकाळी कशाला एकटीच जातेस. मी आहे घरी. मी सोडतो तुला...”

“बाबा. दर वेळी तुम्ही मला असे सोडायला आलात तर मला कशा जमणार बाकी गोष्टी. मलासुद्धा थोडी हिम्मत दाखवायला हवी ना.” रश्मीने शेवटचा डाव टाकला. ही मात्रा बरोबर लागू पडली आणि रश्मीने सुटकेचा निश्वास टाकला.

रश्मी जेव्हा स्टेशनला पोहोचली तेव्हा अविची गँग आधीच तिथे हजर होती. रश्मी येताच अविनाशने तिची आणि त्याच्या इतर मित्रमैत्रिणींची ओळख करून दिली. आणि मग ते निघाले. तास दोन तास बाईक चालवल्यावर मध्ये ते एखादा ब्रेक घायचे. चहा, बिडीकाडी झाल्यावर मग परत पुढच्या प्रवासाला लागायचे. तसं मुंबई ते शेगाव साधारण ५०० किलोमीटरच अंतर. त्यामुळे त्यांना रात्रीसुद्धा

प्रवास करावा लागणार होता. कार असली असती तर त्यांनी आलटूनपालटून चालवत तेवढंच अंतर लवकर पार केलं असतं. असा बराच वेळ प्रवास करून ते मध्यरात्री शेगावला पोहोचले. रश्मी आणि अविनाशने आधीच हॉटेल बुक करून ठेवल्यामुळे त्यांना फारशी अडचण आली नाही. आता थोड्यावेळ आराम करावा आणि मग हॉटेलवाल्याच्या गाडीतून शेगाव फिरायचं असं सगळं ठरवून ते आपापल्या रूममध्ये गेले. सकाळी त्यांना लवकरच उठावं लागणार होतं. कारण शेगाव फिरायचं म्हणजे एक पूर्ण दिवस हवाच.

सकाळी रश्मीला जाग आली ती पक्षांच्या किलबिलाटानेच. मुंबई सारख्या शहरात क्वचितच ऐकू येणारा पक्षांचा मंजुळ आवाज इथे मात्र सर्वत्र ऐकू येत होता. आजूबाजूला बरीच झाडी असल्यामुळे सगळे पक्षी तिकडे आकर्षित व्हायचे. रश्मीने पटापट सगळं आवरून तिच्या रूम मधल्या बाकी मुलींना उठवलं आणि मुलांना उठवण्यासाठी अविनाशला फोन केला.

सगळ्यांनी आवरून त्याच हॉटेल मध्ये शेगावच्या प्रसिद्ध कचोरीचा नाश्ता केला आणि फिरायला बाहेर पडले. कालचा पूर्ण दिवस आणि अर्धी रात्र बाईक चालवली असल्यामुळे त्या सगळ्यांनीच हॉटेलवाल्याच्या कार मधून जाणं पसंत केलं.

सुरुवातीला त्यांना दर्शन झालं ते गजानन महाराजांच्या समाधीचं. थोडा वेळ तिथे थांबून ते तिथेच असलेल्या मेडिटेशन सेंटर मध्ये गेले. तसे ते सर्व जण अशांतच. म्हणजे थोडावेळही शांत बसायचं म्हटलं तरी यांना ते जमायचं नाही. पण काही तरी वेगळं करायचं म्हणून मग सगळ्यांनी तो अनुभव घेतला.

एव्हाना दुपार झाली होती. सगळ्यांच्या पोटात कावळे ओरडायला लागले होते. मग मठातच महाप्रसाद घेऊन थोडा वेळ ते आनंद सागर मध्ये बसले. आजूबाजूला होणारे प्राण्यांचे, पक्षांचे कृत्रिम आवाज त्यांचे लक्ष वेधून घेत होते. थोडा वेळ आराम केल्यावर ते पुन्हा फिरायला बाहेर पडले. तिकडे असलेलं मत्स्यालय बघून तर अविनाश खूपच खुश

झाला. त्याला लहानपणापासूनच मासे पाळायची हौस होती. त्याच्या घरी टॅन्क होता ज्यात त्याने त्याला आवडणारे डिस्कस ठेवले होते. त्या मत्स्यालयात तो एवढा हरवून गेला की थोडावेळ त्याला आजूबाजूच्या जगाचा विसर पडला. सगळ्यांना फिरून कंटाळा आला पण अवि मात्र परत परत त्याच माशांना बघत होता. मग शेवटी सगळे जण बाहेर जाऊन बसले पण अविला एकट्याला सोडायला नको म्हणून रश्मी त्याच्यासोबत थांबली.

आता बाकी होतं ते शेगावचं प्रमुख आकर्षण. पावणे सात वाजता सुरू होणारा वॉटर शो. सगळे येऊन शो ची अगदी आतुरतेने वाट पाहत होते. रंगीबेरंगी लाईट मध्ये ती पाण्याची कारंजे खूपच आकर्षक दिसत होती. जणू काही रश्मीला झालेला आनंद, तिच्या भावना त्या पाण्याच्या रूपाने उचंबळून येत होत्या. तिला अचानक काय झालं कोणास ठाऊक पण तिने अविनाशचा हात एकदम घट्ट पकडला.

“काय ग? काय झालं?”

“अवि, तुला काही तरी सांगायचंय. म्हणजे मला स्वतःलाच अजून नक्की माहीत नाहीये म्हणून तुला सांगतेय. मी खूप कन्फयुज्ड आहे. मी ना....”

“रश्मी. काय झालं? बिनधास्त सांग. काहीही टेन्शन घेऊ नकोस. ग्रुप मधलं कोणी काही बोललं का?”

“अरे नाही. ग्रुप तर खूप मस्त आहे तुझा. मला वाटलंच नाही की मी पहिल्यांदा भेटतेय सगळ्यांना. असं वाटत होतं की आम्ही सगळे आधी पासून ओळखतोय.”

“अच्छा. मग...काय झालं?”

“अवि. मला असं वाटतंय....”

“काय वाटतंय?” अविनाशने प्रश्नार्थक नजरेने विचारलं.

“मला आवडतोस तू.” रश्मीने डोळे बंद करून एका दमात सांगून टाकलं.

“काय???” अविनाश आश्चर्याने बघतच राहिला.

“हो. म्हणजे माझं प्रेम आहे की नाही हे मला माहित नाही. ते एवढ्यात सांगताही नाही येणार मला. पण मला आवडतं तुझ्या बरोबर राहायला. सतत तुझ्याशी बोलावसं वाटत.”

“खरं सांगायचं तर माझीही अवस्था फार काही वेगळी नाहीये.”

अवि तिची नजर चुकवत म्हणाला.”पण जसं तू म्हणालीस की हे प्रेम आहे की आकर्षण ते मलाही माहीत नाही आणि एवढ्यात ते कळणारही नाही. कदाचित आपण नेहमी एकत्र असतो म्हणून आपल्याला एकमेकांची सवय झाली असेल म्हणून आपल्याला असं वाटत असेल.”

“हम्म. असू शकतं.”

“सध्या तरी काही विचार करू नकोस या गोष्टीचा. जसा वेळ जाईल तसं कळेलच आपल्याला. नक्की काय आहे ते...”

“हो.”

अविनाश असं बोलला खरा पण त्याच्या डोळ्यात रश्मीवरच प्रेम दिसत होतं. रश्मीने थोडा प्रयत्न केला असता तर तिला ते सहज वाचता आलं असतं.

डिनर करून सगळे परत निघाले. ती संपूर्ण रात्र अविनाश आणि रश्मी गप्पा मारत होते. तसे ते आधी पासून एकमेकांसोबत कम्फर्टेबल होते पण आता एकमेकांच्या मनातलं कळल्यामुळे ते थोडे अजून फ्री होऊन बोलू शकत होते. अजून काही दिवस एकत्र राहिल्यावर त्या दोघांनाही एकमेकांबद्दल च्या त्याच्या भावना समजणार होत्या. पण नियतीच्या मनात मात्र काही वेगळंच होतं. रश्मीच्या मेलबॉक्स मध्ये आलेला एक मेल तिची वाट पाहत होता. कदाचित त्या एका मेल ने त्या दोघांचही आयुष्य बदलू

शकत होतं. पण एकमेकांच्या प्रेमात असलेल्या त्या दोघांना मात्र त्याची अजिबात कल्पना नव्हती.

****************************************

"रश्मी. उठतेस का? आठ वाजत आले."

"अरे. आठ वाजले पण पटकन..." रश्मी डोळे चोळत म्हणाली.

"मी काय म्हणते.." आईने चादराची घडी करत विचारलं"आज ऑफीसला नाही गेलीस तर नाही चालणार का? फक्त तीन तास झोप मिळालीय तुला. आज आराम कर. नाहीतर तब्येतीला त्रास होईल."

"नाही ग आई. आज जावंच लागणार. एवढा मोठा विकेंड होता ना. ढीगभर कामं पडली असतील."

“बरं. आवर मग पटकन. मी तो पर्यंत तुझी आवडती कॉफी बनवते.”

“हो आलेच मी.”

रश्मी ऑफिसमध्ये आली तेव्हा अविनाश आधीच येऊन बसला होता. रश्मीला पाहताच त्याचे एक मस्त स्माईल दिली आणि पुन्हा कॉम्पुटर मध्ये डोकं खुपसलं. रश्मीनेसुद्धा तिचा कॉम्पुटर चालू केला तेवढ्यात राज तिच्या डेस्कवर आला.

“काय रश्मी. झाली का तयारी?”

“तयारी?? कसली?” रश्मी आणि अविनाश दोघांनीही एकमेकांकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिलं.

“मेल बघितले नाहीस वाटतं अजून…”राज हसत म्हणाला.

“नाही. म्हणजे आता तेच बघत होते. काय झालं.”

“बघ बघ. आणि बघून झाल्यावर ये केबिनमध्ये…”

“बरं.” एवढं बोलून रश्मीने भराभर सगळे मेल वाचायला सुरुवात केली. आणि एकाएकी ती थांबली. डोळे विस्फारून तिने तो मेल पून्हा वाचला.

“अवि...”

“हा...बोल ना...”

“हा बघ. काय मेल आलाय.”

“काय?”

“वाच तरी...”

रश्मीचा चेहरा पडलेला पाहून अविनाशने पटकन मेल वाचला आणि नकळत त्याच्या चेहऱ्यावर हास्य उमटलं.

“अरे वा. मस्त. काँग्रट्स ...”

“कसलं काँग्रट्स. मला नाही जायचं इतक्या लांब. आणि तेही इतके दिवस.”

“अगं ही संधी सगळ्यांना मिळत नाही . तुला कंपनी तीन महिन्यांसाठी केरळला पाठवतेय याचा खरं तर तुला आनंद व्हायला हवा. अशी तोंड पाडून काय बसलीये वेडी…”

“तीन महिने. कॅन यु इमॅजिन… इतके दिवस मी तुझ्यापासून लांब राहणार.”

“त्यात काय? Career is more important than anything. आता जा आणि शहाण्या मुलीसारखी राजला होकार सांगून ये.”

“पण अवि…”

“आता पण नाही आणि बिण नाही…जा बरं लवकर.”

“बरं….”

“राज…आत येऊ का?” तिने दरवाजातूनच विचारलं.

“अरे रश्मी ! ये ये…काय वाचला का मेल?”

“हो...”

“मग. जाणार की नाही केरळला?”

रश्मी गप्पच होती. तिला असं गप्प पाहून राजच पुढे म्हणाला.

“मला माहितीये रश्मी की असं एकदम तुला सांगितल्यामुळे तुला थोडंस गोंधळल्यासारखं झालं असेल पण ट्रस्ट मी की खूप चांगली संधी आहे तुझ्यासाठी. तिकडे तुला ट्रेनिंग तर मिळेलच पण जर तू चांगला परफॉर्मन्स दिलास तर तुला एखाद्या मोठ्या प्रोजेक्ट वर काम करायची संधी सुद्धा मिळेल. तिथे फक्त आपल्या ब्रँच चे नाही देशभरातल्या ब्रँच चे एम्प्लॉयी असणार. तुला खूप शिकायला मिळेल.”

“हो.”

“मग...मी तुझा होकार समजू?”

“हो. पण मला जमेल ना...”

“का नाही? तुला जमेल म्हणूनच तुला पाठवायचा निर्णय घेतलाय ना आम्ही. खरं म्हणजे तुला आणि अविनाशला पाठवायचं ठरलं होतं. पण अविनाशची आम्हाला इथे गरज आहे. म्हणून तुला एकटीलाच पाठवतोय.”

“अच्छा. ठीक आहे. कधी निघावं लागेल मला?”

“उद्या दुपारची फ्लाईट आहे तुझी. मला माहित होतं की तू नक्की होकार देशील म्हणून मी आधीच तुझं बुकिंग करून ठेवलंय.”

“ओके. थँक्स राज. मला एवढी मोठी संधी दिल्या बद्दल...”

“थँक्स काय त्यात. ऑल द वेरी बेस्ट आणि तू आज लवकर निघालीस तरी चालेल.”

“ठीक आहे.”

“आणि हो. हॉस्टेल चा पत्ता वगैरे सगळं मेल मध्ये आहे.”

“हो. पाहिला मी.”

“हम्म. ऑल द बेस्ट वन्स अगेन...”

“थँक्स...”

रश्मी राजच्या केबिनमधून बाहेर आली तीच मुळी तोंड पाडून.

“काय झालं?” अविनाशने उत्सुकतेने विचारलं.

“उद्या दुपारची फ्लाईट आहे माझी.”

“काय? एवढ्या तडकाफडकी?” अविनाश आश्चर्याने म्हणाला.

“हो ना...” रश्मीने थोडा नाराजीचा स्वर लावला.

“बरं. मग आता घरी जा तू. पॅकिंग करायचीय तुला. संध्याकाळी भेटू आपण. आणि आता चेहरा जरा हसरा ठेवा

मॅडम. ही आनंदाचीच बातमी आहे. एवढी मोठी संधी मिळालीय."

"काय फायदा. एवढी मोठी संधी आणि साधं तुझ्या सोबत सेलिब्रेशन सुद्धा करता येत नाहीये मला..."

"चालायचंच ग. सर्व गोष्टी आपल्याला हव्या तशा होत असत्या तर या जगात कोणी दुःखी असतं का. ?"

"ए. तू आता फिलॉसॉफी झाडू नकोस."

"नको ना...मग हस बघू छान..."

आता मात्र रश्मीला हसू आवरलं नाही.

"बरं चल. निघते मी. संध्याकाळी नेहमीच्या कॉफीशॉप मध्ये भेटू...बाय...टेक केअर..."

*****************************************

रश्मीला एवढ्या लवकर घरी आलेलं बघून तिच्या आईला जरा आश्चर्यचं वाटलं.

"काय गं? काय झालं? बरं वाटत नाहीये का? तरीही मी सांगत होते की आराम कर नाहीतर त्रास होईल पण तू माझं ऐकशील तर शपथ..."

"आई. जरा थंड घेशील का? सांगते तुला सविस्तर. पहिले मला सांग आपली टूरला जायची बॅग कुठे आहे. गेल्या वर्षी तुम्ही हिमाचलला घेऊन गेला होतात ती?"

"ती बॅग ना. असेल वरच्या कट्ट्यावर नाहीतर पलंगामध्ये. पण तुला आता ती कशाला हविये आणि मुळात मी काय विचारलं आणि तू काय सांगतेय."

"अगं मला केरळला जायचंय."

"काय? बाबा पाठवणार नाहीत." रश्मीच्या आईने आधीच सांगून टाकलं.

"अगं कंपनीमधून जातेय. पिकनिकला नाही."

“म्हणजे?”

“आमच्या कंपनीचं ट्रेनिंग आहे केरळला. तीन महिने. आणि कंपनीने मला पाठवायचं ठरवलंय.”

“असं अचानक. ते सुद्धा तीन महिने....” रश्मीची आई जवळजवळ ओरडलीच.

“अगं. हो हो. जरा शांत...मलासुद्धा ऑफिसला गेल्यावरचं कळलं. म्हणून मग माझा बॉस म्हणाला की लवकर जा म्हणून. उद्या दुपारची फ्लाईट आहे माझी. प्रवास आणि अकोमोडेशन सगळं कंपनीच असणार आहे त्यामुळे काळजी करण्याचं कारण नाही.”

“पण हे असं अचानक कसं ठरू शकतं. पहिले बाबांना फोन करुन सांग. मला मात्र हे.”

“आई...आई...बाबांना मी आधीच फोन करून सांगितलं आहे. आता मला आवरायला जरा मदत करशील का?”

“हा. थांब पहिले आपली बॅग कुठे आहे ते शोधते आणि तुला काय काय हवंय याची एक लिस्ट बनवून दे. आपण डिमार्ट मध्ये जाऊन घेऊन येऊ.”

“अगं आई. फार काही नाही नेत मी इकडून. तिकडे सगळं मिळेलचं. उगाच कशाला इथून वजन घेऊन जायचं.”

“अगं पण तो म्हात्र्यांचा प्रतिक गेला होता ना केरळला. तो म्हणत होता की तिकडे जवळपास काहीचं मिळत नाही म्हणून.”

“अगं त्याचं हॉस्टेल कळकोट्टम की कझाकोट्टम नावाच्या गावात होता. माझं प्रॉपर शहरात आहे. माझं आधीच विचारून झालंय. सो...डोन्ट वरी...आणि हो. संध्याकाळी अविला भेटायला जायचंय. त्याच्याकडे राज काही डॉक्युमेंट्स देणार आहे .”

“बरं...”

“चल मी आवरायला घेते...तू ती आपली बॅग काढून ठेव.”

“अवि...कुठे आहेस...निघालास का?” रश्मीने आवरता आवरता विचारलं.

“हॅलो रश्मी...हो निघतोच आहे.... पोचेन मी अर्ध्या तासात...”

“ठीक आहे. मी निघते मग आताच. ऑटो मिळायला वेळ लागेल. चलो. सिया...”

“हो...बाय...”

अविनाश आला तेव्हा रश्मी गूगलवर तिचं हॉस्टेल शोधत होती.

“काय मॅडम...झाली का सगळी तयारी?”

आल्या आल्याच अविनाशने रश्मीला विचारलं.

“अरे आधी येऊन बस तरी...काय उभ्या उभ्याच सगळं विचारतोय. बॅग भरून झालीये. बाकी छोटं मोठं सामान

आहे ते मी जाताना घेईन आणि मग बाकी राहिलेलं तिकडे घेईन.”

“बरं...ज्या कामासाठी भेटलो आहोत ते काम पहिले करून घेतो म्हणजे नंतर विसरायला नको. हे घे लेटर आणि बाकी काही कागदपत्रे आहेत.”

“थँक्स.”

“अरे. बस दुआ मे याद रखना.”

“आता थोडे दिवस तेच करावं लागणार आहे.”रश्मी तोंड पाडून म्हणाली.

“ठीक आहे गं. जे आहे त्यात समाधान मानायचं आणि जगत राहायचं.”

“अहो महोदय. आपले उच्च विचार ना आपल्यापाशीच ठेवा. सध्या माझी मनस्थिती तरी असं प्रवचन ऐकण्याची नाहीये. तीन महिने अवि...कॅन यु इमॅजिन... आणि जर माझा परफॉर्मन्स चांगला असला तर मग अजून...”

“म्हणजे तू काय मुद्दामहून खराब परफॉर्मन्स देणार आहेस की काय?”

“नाही रे...तस नाही. पण एवढे दिवस मी तुझ्या पासून लांब...”

“आपल्याला भेटूनच किती दिवस झालेत रश्मी? उलट या काळात आपल्यालाच काही गोष्टी क्लिअर होतील आणि विडिओ कॉल करत जाऊ ना आपण रोज. कशाला काळजी करतेस. जातेच आहेस तर आनंदी होऊन जा आणि केरळ फिरून घे मस्त. सगळे विकेंड एन्जॉय कर. अशी संधी पुन्हा पुन्हा येत नाही. आणि महत्वाचं. काळजी घे स्वतःची...”

“हो...पण मिस करेन यार मी तुला .”

“मला सुद्धा आठवण येईल तुझी. पण ऑपशन नाहीये दुसरा...”

“हो...ते ही आहेच...”

“आणि हो. उद्या मला नाही जमणार तुला एअरपोर्टला सोडायला यायला. माझी मीटिंग आहे एका क्लायंट बरोबर...”

“झालं. बघ...जायच्या आधीच दुरावा...”

“माय डिअर. दुरावा तर अजून यायचा आहे....”

“म्हणजे?” रश्मीने प्रश्नार्थक नजरेने अविनाशकडे पाहिलं.

“काही नाही. जाऊदे. चल. निघुया का आत्ता?तुझी अजून बरीच तयारी व्हायची असेल...”

“निघायचं लगेच?” रश्मी पुन्हा चेहरा पाडून म्हणाली.

रश्मीला असं उदास बघून अविनाशलासुद्धा थोडं वाईट वाटलं पण तो नेहमी त्याच्या प्रोफेशनला, त्याच्या कामाला त्याच्या भविष्याला प्रथम प्राधान्य द्यायचा आणि जो स्वतःच्या भविष्याचा एवढा विचार करतो तो रश्मीच्या बाबतीत स्वार्थी होऊ शकत नव्हता त्यामुळेच रश्मीने तिला मिळालेली संधी स्वीकारावी आणि त्या संधीचं सोनं करावं असं त्याला अगदी

मनापासून वाटत होतं. त्यामुळे त्याला कितीही वाईट वाटत असलं तरी त्याला ते रश्मीला दाखवायचं नव्हतं.

रश्मीला अजून थोडी खरेदी करायची असल्यामुळे अविनाशने तिला मार्केटमध्ये सोडलं. खरंतर दोघांनाही एकमेकांचा निरोप घेताना अगदी जीवावर आलं होतं मग शेवटी इथेही अविनाशने पुढाकार घेतला.

"चला मॅडम. निघतो आम्ही. काळजी घ्या . नीट राहा. आणि पोचल्यावर मेसेज करा. हॅपी जर्नी..."

रश्मीने एकदम अविनाशला मिठी मारली. क्षणभर अविनाशला वाटलं की हा क्षण संपूच नये. पण मग त्याने स्वतःला सावरून रश्मीची पाठ थोपटली आणि मग पुन्हा मागे वळून न बघता तो बाईक पळवत दिसेनासा झाला.

*******************************************

# 2

संध्याकाळी क्लायंटसमोर प्रेझेन्टेशन देत असताना अविनाशच्या मोबाईलचा नोटिफिकेशन लाईट लुकलूकला.

‘ पोचल्या वाटतं मॅडम. ’ अविनाश मनात म्हणाला आणि पुन्हा प्रेझेन्टेशन मध्ये मग्न झाला.

प्रेझेन्टेशन झाल्यावर त्याने मोबाईल पहिला तर रश्मीचे आठ मिस्ड कॉल्स.

‘ आता उद्रेक होणार. ’ असं स्वतःशीच म्हणत त्याने रश्मीला फोन लावला.

एकाच रिंग मध्ये रश्मीने फोन उचलला.

“फोन जवळच बसून होतीस की काय?” अविनाश हसत म्हणाला.

“मग काय. किती फोन केले तुला.” रश्मी थोडी रागातच म्हणाली.

“अगं तुला म्हणालो होतो ना की माझी मीटिंग आहे म्हणून.”

“दुपारी होती ना मीटिंग. आता तर संध्याकाळ झाली...”

“कम ऑन यार रश्मी. दुपार म्हणजे काय दुपारीच संपणार का मीटिंग. उशीर झाला संपायला...”

“हं.”

“बरं ते सोड. तू पोचलीस का व्यवस्थित. हॉस्टेल मिळालं लगेच? आणि रूम?”

“अरे हो हो. एकाच वेळी किती प्रश्न विचारशील? पोचले मी नीट. आणि यू नो व्हॉट. कंपनीने गाडी पाठवली होती. मला घ्यायला. मला म्हणजे आम्हाला घ्यायला. बरेच जण आहेत अजून मुंबईचेच...”

“अरे वाह. चांगलं आहे मग. आपल्याच लोकांबरोबर ओळख व्हायला फार वेळ लागत नाही. बोलता बोलताच ओळख होऊन जाते.”

“हो ना. माझी झाली सुद्धा ओळख. मग आम्ही तीन जणींनी एकत्रच घेतली रूम. मी, मिथिला आणि नेहा. ए मस्त आहेत रे दोघी पण. एकदम आपल्यासारख्या...”

“आपल्या सारख्या म्हणजे. ?”

“आपल्या सारख्या म्हणजे एकदम बिनधास्त आणि मोकळ्या. नाही तर तुला माहितीये ना. ती आपल्या ऑफिस मधली अंकिता . किती भाव खाते. जसं काय स्वर्गातली अस्पराच ही...”

“आयला. कोणाचं काय तर कोणाचं काय. कोणाचा विषय कुठे नेतेय तू.”

“सॉरी सॉरी...सांगायचा मुद्दा एवढाच की मस्त आहेत दोघी.”

“चांगलं आहे. चला. म्हणजे पहिल्याच दिवशी तुला चांगल्या मैत्रिणी भेटल्या. तीन महिने मजेत जातील.”

“हो.”

“बरं. मी काय म्हणतो. मी आता निघतो. पाऊस सुद्धा सुरू झालाय. मी घरी गेल्यावर मेसेज करतो.”

“अरे वाह. मी थोडीशी लांब काय गेली तू तर कारणंच द्यायला लागलास. मागे पावसात किती भिजला होतास माझ्याबरोबर...”रश्मी हसत म्हणाली.

“काय चाललंय रश्मी तुझं? कसला संदर्भ कशाशी काय जोडतेयस तू...”

“अरे मस्करी केली रे. आता तुला त्रास दयायला नाही मी तिथे. मग तुला कोण त्रास देणार? म्हणून मग मीच फोन वरून त्रास देतेय.” असं म्हणून रश्मी स्वतःशीच हसली.

“ह्यात हसण्यासारखं काय होतं?”

“जाऊदे. तुला नाही कळणार.”

“बरं...”

“हा. जा तू घरी जा पाहिले आणि विंगशीटर आणलाय का? नाही तर पुन्हा भिजशील आणि पुन्हा सर्दी होईल.”

“हो आणलंय...” नाही म्हणून पुन्हा मग चार गोष्टी ऐकून घेण्यापेक्षा खोटं बोलणंच अविनाशला जास्त सोयीचं वाटलं.

“ठीक आहे. सावकाश जा.”

“हो...”

“आणि अवि....”

“हा...बोल ना...”

“मिस यू....”

“मिस यू टू....”

“टाटा...”

अविनाशला घरी पोचायला थोडा वेळचं झाला. एक तर ऑफिस नंतर जिम आणि त्यात धो धो कोसळणारा पाऊस. घरी आल्या आल्याच त्याने रश्मीला फोन करून घरी पोचल्याचं कळवून टाकलं. उगाच कशाला पुन्हा चार गोष्टी ऐकून घ्या.

जेवल्यानंतर त्याने रश्मीला फोन लावला तर तिचा फोन बिझी. ‘घरी फोन केला असेल कदाचित. ’ अविनाश मनात म्हणाला आणि इन्स्टाग्राम उघडून नुसतंच स्क्रोल करू लागला. स्टोरी बघता बघता त्याच्यासमोर रश्मीची नुकतीच अपलोड केलेली स्टोरी आली. विमानातून काढलेले बरेच फोटो रश्मीने अपलोड केले होते. एक दोन फोटो बघून झाले असतील तेवढ्यात रश्मीचा व्हिडिओ कॉल आला.

“हाय....”

“नमस्कार. आज चक्क व्हिडिओ कॉल?”

“अभी तो ये ही एक सहारा है जनाब. नाहीतर दिसणार कसा तू...”

“ते ही आहेच म्हणा. बोला बोला. झालं का सगळं सेट?”

“ऑल सेट. हे बघ...”असं म्हणून रश्मीने त्याला जवळपास सगळी रूमचं फिरुन दाखवली.

“मस्तय ग रूम आणि गॅलरीतून किती मस्त बीच दिसतो...”

“हो. आणि आजूबाजूला मस्त झाडं वगैरे आहेत. नाही तर आपल्याकडे. नुसतं सिमेंटचं जंगल...”

“हं...”

“उद्याची सगळी तयारी झाली का?” अविनाशने शिंक देत विचारलं.

“हो झाली. आणि काय रे. खोटं बोललास ना माझ्याशी. पावसात भिजलास वाटत. बघ लगेच सर्दी झाली. स्वतःची काळजी घ्यायला कधी शिकणार तू अवि....”

“अहो इन्स्ट्रक्टर. जरा थंड घ्या. थोडीशी सर्दी झालीये. जाईल एक दोन दिवसांत...”

“जाऊ दे...तुला सांगून काही उपयोग आहे का. तुझंच खरं करणार तू...”

“असाच आहे मी...” अविनाश हसत म्हणाला.”चल आता मी झोपतो...”

“हो. झोपा राजे, झोपा. आपण कधी कोणासाठी जागे राहिला आहेत का? झोपा...”

“तुला माहीत आहे ना...”

“हो. मला माहित आहे तू काय सांगणार आहेस. तू लवकर झोपतोस. तुला लवकर उठायचं असतं. माहितीये हा मला. झोप झोप. चल गुड नाईट.”

“येस. गुड नाईट.”

बघता बघता आठवडा निघून गेला. रश्मी आणि अविनाश दोघेही स्वतःच्या कामात मग्न होते. रात्रीच काय तो त्यांना बोलायला वेळ मिळायचा. पण दोघे एवढे थकून जायचे की त्यांच्यातला एक जण बोलता बोलताच झोपून जायचा. त्यांच्यापैकी कोणी मेसेज केलाच दिवसभरात तरीसुद्धा दुसऱ्याचा रिप्लाय उशिराच यायचा. सुरुवातीला दिवसभर एकमेकांसोबत असणारे, एकमेकांची थट्टा करणारे , सतत बोलणारे ते दोघेही आता इच्छा असूनसुद्धा एकमेकांना हवा तेवढा वेळ देऊ शकत नव्हते. आठवड्याचे पाच दिवस असेच कामात निघून गेले. शनिवारीसुद्धा रश्मीला ऑफिसला जावं लागल्याने तो दिवस सुद्धा गेला.

अविनाशला हे माहीत नव्हतं त्यामुळे त्याने एक दोनदा फोन केला. पण ‘ ऑफिसमध्ये आहे ’ असा रश्मीचा मेसेज पाहून मग त्यानेसुद्धा पुन्हा फोन करण्याचा नाद सोडून दिला आणि तो कॅमेरा घेऊन रपेट मारायला बाहेर पडला.

रविवारी सकाळी सकाळीच रश्मीचा फोन आला.

“हॅलो. गुड मॉर्निंग”

“वेरी गुड मॉर्निंग.” अविनाश आळस देत म्हणाला.

“अजून उठली नाही वाटतं स्वारी...”

“नाही. म्हटलं आज आराम करूया जरा....”

“बरंय.... मग...आज काय प्लॅन...?”

“माझे प्लॅन कधी ठरलेले असतात का. ते अचानक ठरतात.”

“हो. तेही आहेच. आम्ही आज बीच वर जाणार आहोत.”

“वाह...मस्त. कोणत्या?”

“सेंट अँड्रूज म्हणून आहे कोणतातरी जवळच. मला सुद्धा नक्की माहीत नाही. मिथिलाचा मित्र आहे ना. तो आधी येऊन गेला होता केरळला. त्यामुळे त्याला बऱ्यापैकी माहिती आहे.”

“अच्छा. म्हणजे तुझं केरळ फिरून होणार तर...”

“बघू. जेवढं मिळेल फिरायला तेवढं फिरायचं.”

“हो.”

“हं...चल मी ठेवते फोन. अजून बरंचसं सामान बॅग मध्येच आहे. आज जरा जायच्या आधी सामान लावून ठेवते.”

“बरं. ठीक आहे. मी झोपतो जरावेळ अजून.”

“हं. टाटा.”

“बाय.”

साधारण चार वाजता रश्मी, मिथिला, नेहा आणि मिथिलाचे दोन मित्र अक्षय आणि सुजित बीचवर फिरायला गेले. दुपारची वेळ असल्यामुळे बीचवर फारशी वर्दळ नव्हती. बीचच्या आजूबाजूला फारशी झाडं सुद्धा नव्हती त्यामुळे ऊन जाणवत होतं. ओल्या मातीवर सूर्याची किरणे पडल्याने ती थोडीशी तांबूस भासत होती. एका बाजूला चॉकलेटी जेलिफिशचा एक कळप किनाऱ्याला लागल्यामुळे मरून पडला होता. अक्षयने लगेच बाजूला पडलेली काठी उचलून जेलिफिशला उलटसुलट करायला सुरुवात केली.

"अक्षय. कशाला नाय ते धंदे करतोयस? जेलिफिश विषारी असतात माहितीये ना."

"म्हणून तर काठीने बघतोय ना." अक्षयने जेलिफिशवरून नजर न हटवता उत्तर दिलं.

"आधीच ते मरून पडलेत. बघ किती घाण दिसतंय ते. चला आपण दुसऱ्या बाजूला जाऊया..."

“थांब ग. आपल्या इथे कधी पाहायला मिळतो का जेलिफिश? असेल तर तो सुद्धा तारापूरवालामध्ये. आयता दिसलाच आहे तर जरा निरीक्षण करू दे.”

“तू काही ऐकणार नाहीस. आम्ही जातो. तू ये तुझं झालं की.”

असं म्हणून मिथिलासोबत बाकी जण पण निघाले. त्यामुळे अक्षयचा सुद्धा नाईलाज झाला. भरभर त्या जेलिफिशचे फोटो काढून त्याने त्यांना गाठलं.

“मस्तय ना बीच.”नेहा सेल्फी काढत म्हणाली आणि तेवढ्यात मिथिला आणि रश्मीसुद्धा तिच्या फोटोत जॉईन झाल्या.

बरेच फोटो काढून झाल्यावर शेवटी मग पाचही जण तिथेच वाळूत बसले. मिथिला, नेहा, अक्षय आणि सुजित आधीच एकमेकांना ओळखत होते. गप्पा मारता मारता रश्मीची सुद्द्धा त्या सगळ्यांशी चांगलीच गट्टी जमली.

त्या रस्त्यावर रोडलाईट नाही हे अक्षयला आधीच माहीत असल्याने दिवस मावळायच्या आतच सगळे परतीच्या प्रवासाला लागले. इंटरनेट नसल्याने आणि भाषेचा थोडा प्रॉब्लेम होत असल्याने त्यांना पोचायला थोडा उशीर झाला. मिथिला, नेहा आणि रश्मीला त्यांच्या हॉस्टेलला सोडून सुजित आणि अक्षय त्यांच्या हॉस्टेलवर गेले.

'डे वेल स्पेन्ट. ' असं स्टेटस आणि एक पाऊट वाला सेल्फी अविनाशला पाठवून रश्मीने फोन चार्जिंगला लावला. गप्पा मारण्याच्या नादात रात्री अकरा कधी वाजले त्यांनाही कळलं नाही. रश्मी झोपायला आली तेव्हा अविनाशचा तिच्या मेसेजवर रिप्लाय आला होता. पण उशीर झाला असल्यामुळे अविनाश झोपला असेल असं समजून तीनेसुद्धा त्यावर रिप्लाय न करता फोन बाजूला ठेवून दिला आणि परत हॉलमध्ये जाऊन गप्पा मारत बसली. पण त्याच वेळी सुट्टी असूनसुद्धा दिवसभरात रश्मीशी बोलणं झालं नाही म्हणून अविनाश जागा राहून रश्मीच्या मेसेजची वाट पाहत होता.

रश्मीची सोमवारची सुरुवात झाली तीच मुळी पुढल्या आठवड्याच्या प्लँनिंगने. ती मिथिला आणि नेहा पुढच्या विकेंड बद्दल बोलत बोलत ऑफिसला पोचल्या. ऑफिसला पोचल्या पोचल्या तिला लक्षात आलं की आज अविनाशला गुड मॉर्निंग विश करायचं राहून गेलय. तिने मेसेज पाठवायला नेट चालू केलं तरी अविनाशचा आधीच मेसेज आलेला. नकळत तिच्या चेहऱ्यावर हसू उमटलं. त्याच्या मेसेजला रिप्लाय करून मोबाईल ठेवून ती तिच्या कामात व्यस्त झाली.

"अक्षय. पुढल्या आठवड्यात कुठे जायचं?"

मिथिलाचे कॉम्पुटरची स्क्रीन बंद करता करता विचारलं.

"बघू गं. वेळ आहे अजून. आणि आपल्याला शनिवारी सुट्टी आहे की नाही ते सुद्धा आपल्याला माहीत नाही. त्यामुळे आता उगाच कल्पनेचे इमले बांधण्यात काहीही अर्थ नाही."

“तेही बरोबर आहे म्हणा. पण तरी...”

“जर दोन दिवस सुट्टी असली तर लांब जाऊ कुठे तरी मस्त. नाही तर जवळच कुठेतरी जावं लागेल.”

“चालेल. पण कुठेतरी जायचं हा. हॉस्टेल मध्ये किती बोअर होतं यार...”

“पहिल्याच आठवड्यात बोअर झालीस? अजून तर तीन महिने जायचे आहेत.”

“कसे जाणार काय माहीत...”

“कसे जाणार काय. मस्त जाणार. एवढं स्वातंत्र्य मिळालंय का कधी? मस्त एन्जॉय करायचं.”

“हो ते आहेच रे. पण कधी लांब नाही राहिली ना घरापासून. म्हणून मग जमत नाहीये. एकदा सवय झाली की मग परत जाव असं नाही वाटणार.”

“हं. आहेत ते दिवस एन्जॉय करायचे. पुन्हा कुठे तू केरळला राहायला येणार आहेस.”

“हा. बरं ऐक. आम्ही कॅफे मध्ये चाललोय. येणार आहेस तू?”

“कोण कोण येतंय?”

“मी रश्मी आणि नेहा.”

“ठीक आहे. चला.”

“रश्मी. किती वेळ मोबाईल बघत बसणार आहेस. चल आता...” मिथिला बाहेर निघता निघता म्हणाली.

रश्मीने एकदा तिच्याकडे पाहिलं आणि ती आपल्याच विश्वात त्यांच्यामागे चालू लागली.

रात्री नेहमीच्या रुटीनप्रमाणे तिने अविनाशला कॉल केला. पण दोघांकडेही बोलण्यासारखं खास असं काही नव्हतं. रोजच्या दिवसाचे तेच तेच अपडेट तरी किती देणार.

थोडा वेळ बोलून तिने फोन ठेवून दिला. झोप येत नव्हती पण हॉस्टेलमध्ये अकरा वाजता लाईट बंद करावे लागत असल्याने ती तशीच बेड वर पडली आणि निद्रेच्या आधीन कधी झाली तिचं तिलाच कळलं नाही.

आठवडा असाच निघून गेला. तरी बरं त्यांना शुक्रवारीच कळलं की शनिवारी सुट्टी नाही आहे. मग अक्षयने पुढाकार घेऊन रविवारी सकाळीच कोवलम बीचला जायचा प्लॅन नक्की केला. आणि एक एक करून जवळ जवळ अख्खी बॅच त्या प्लॅन मध्ये सामील झाली. अपवाद होता तो मुंबईचाच दुसरा ग्रुप. निखिल, कार्तिक, गौरव , ऐश्वर्या, हिमांशी, रोहित, सिद्धेश आणि विराजस. केरळला येतानाच आपण बॅचसोबत फिरायचं नाही. आपण आपलं स्वतंत्र फिरायचं असं ते ठरवूनच आले होते. त्यामुळे बॅचच्या प्लॅन मध्ये सामील होण्याचा काही प्रश्नच नव्हता. निखिलने त्याच्या जुन्या मित्रांना फोन करून एका दिवसात कुठे जाता येईल याची माहिती काढली आणि शनिवारी रात्री ते वर्कला बीचला गेलेसुद्धा.

****************************************

इथे अक्षयने सर्वांना सकाळी आठ वाजता तयार राहायला सांगितलं होतं. आठ वाजता बस मुलींच्या हॉस्टेलला पोहोचणार आणि मग तिथून मुलांच्या हॉस्टेलला येऊन मुलांना घेऊन मग सरळ कोवलम बीच. पण त्यांना निघायलाच साडेदहा झाले. उशीर झाल्याने अक्षयचा पारा बराच चढला होता. बस येई पर्यंत त्याची सगळ्यांना शिव्यांची लाखोली वाहून झाली. शेवटी बस निघाली तसा सगळ्यांनी एकच जल्लोष केला.

बसमध्ये सुरुवातीला सगळे शांत होते पण मग ड्रायव्हरने उडती लावायला सुरुवात केली आणि आपोआप सगळ्यांचे पाय गाण्याच्या तालावर थिरकायला लागले. सुरुवातीला फक्त अक्षय आणि नेहा नाचत होते आणि मग अक्षयने जबरदस्तीने सगळयांनाच उठून नाचायला लावलं. ते कोवलमला पोचले तेव्हा सूर्य डोक्यावर आला होता. बसमधून उतरून कोवलम बीच वर पोहोचेपर्यंत सगळ्यांची

डोकी तापली होती पण कोवलमचा तो निळाशार समुद्र पाहिला आणि सगळ्यांचा थकवा कुठल्या कुठे पळाला.

"आयच्या गावात ! काय क्लिअर आहे पाणी. यात डुंबायला मजा येणार. मिथिला. पाण्यात येणार आहेस तू?" अक्षयने एकदम उत्साहात विचारलं.

मिथिलाकडून नकाराची अपेक्षा करणाऱ्या अक्षयला त्याच्या बाजूने कौल मिळताच मोबाईल आणि पाकीट मिथिलाकडे देऊन तो धावत सुटला. मिथिला काही बोले पर्यंत तो पाण्यापर्यंत पोचला देखील होता.

"किती एर्नर्जेटिक आहे हा..." रश्मी सहज मिथिलाला म्हणाली.

"अगं अजून थोडे दिवस थांब. कळेल मग तुला. आपण कधी विचारसुद्धा करणार नाही असे उद्योग करून झालेत त्याचे. डोकं असं चालतं ना त्याचं कि विचारू नकोस ."

"हाहा. बघूया काय उपद्व्याप करतोय ते..."

“तसा चांगला आहे ग. पण मस्ती करायला लागला की समोरच्याला रडवूनच सोडतो.”

“ओह...बरं तू येणारच नाही आहेस का पाण्यात? .”

“नाही. एक तर दुसरे कपडेसुद्धा नाही आणलेत. आणि मला अजिबात आवडत नाही त्या ओल्या कपड्यात राहायला .”

“अगं पूर्ण पाण्यात नाही जायचं. थोडेसे पाय भिजवू .”

“नको. तू आणि नेहा जा.”

“तिचा कुठे पत्ता? ती बघ फोटो काढत कुठपर्यंत पोचली.”

“हा. हिला एक फोटोग्राफीच वेड. कुठे गेली की फोटोच काढत बसते.”

“जाऊदे. मी जाते एकटीच. तसही आपल्यातले बरेच आहेत तिथे.”

“ठीक आहे. मी थांबते इथेच. तू ये जाऊन.”

समुद्राच्या त्या पारदर्शी पाण्यात रश्मी शांतपणे उभी होती. दूरवर पसरलेला अथांग सागर आणि नजर जाईल तिथपर्यंत दिसणारा मध्येच कापूस पिंजून ठेवल्यासारख्या मेघांचा आसमंत यात तिची नजर फिरत होती. मध्येच थंडगार वाऱ्याची झुळूक त्या तप्त उन्हातसुद्धा शरीरासोबतच मनालाही गारवा देत होती.

' आता अवि असता तर इथे.... ' असा विचार क्षणभर तिच्या मनात येऊन गेला. तिने लगेच त्याला फोन करण्यासाठी मोबाईल बाहेर काढला. पण 'नो सर्व्हिस' पाहून ती थोडीशी हिरमुसली. मोबाईल पुन्हा खिशात ठेवून ती पुन्हा पायाला हळुवार स्पर्श करून गुदगुल्या करणाऱ्या लाटांचा आनंद घेऊ लागली.

इतक्यात तिच्या अंगावर पाण्याचे काही तुषार उडाले. तीने डोळे उघडून पाहिले तर समोर अक्षय उभा. क्षणभर ती त्याच्याकडे बघतच राहिली. पण लगेच तिने स्वतःला सावरलं.

“काय मॅडम. कसल्या विचारात आहेत?” अक्षय पाण्यात कोलांटी उडी मारत म्हणाला.

रश्मी काही बोलणार तोपर्यंत अक्षय पाण्याखाली गेला होता. रश्मी मागे वळून जाणार तोच मागून अक्षयचा आवाज आला.

“सॉरी सॉरी. मी तुला विचारलं आणि मीच गायब झालो.”

“इट्स ओके.”

“तू काय नेहमीच इतकी सिरीयस असतेस का?”

“सिरीयस? नाही रे...काहीही काय...”

“नाही तर काय. कधी पासून बघतोय मी. एवढा छान निसर्ग आहे. त्याची मजा घायची सोडून तू कुठल्यातरी विचारात मग्न आहेस. डोन्ट टेल मी की तू उद्याच्या प्रेझेंटेशनच टेन्शन घेतलयस.”

“नाही रे. असं काही नाही. असंच जर एकटं राहावंसं वाटलं म्हणून...”

“ऑल ओके ना?”

“हो .”

“मग ठीक आहे. चला आता निघुया. जेवून झाल्यावर बरंच फिरायचंय.”

“हो. बाकीच्यांना तर सांग.”

“हो. सांगतो...” आणि अक्षय पुन्हा ओरडत पाण्यात शिरला.

‘ कसा आहे हा. एकदम वल्ली...’ रश्मी पाण्यातून बाहेर पडताना स्वतःशीच म्हणाली.

कडाडून भूक लागलेली असल्यामुळे सगळ्यांनी आवडीच्या डिश ऑर्डर केल्या खऱ्या पण पहिला घास तोंडात टाकताच सगळ्यांनी तोंडं वाकडी केली. सगळे पदार्थ नारळाच्या तेलात बनवलेले. त्यामुळे घास

खाल्ल्यानंतरसुध्दा एक वेगळीच चव जिभेवर रेंगाळत होती. कसंबसं जेवण संपवून सगळे जवळच असलेल्या लाईट हाऊस वर पोहोचले. लाईट हाऊस चांगलं सात आठ मजली उंच होतं. लाईट हाऊसच्या एका बाजूने जवळपास वीस ते तीस किलोमीटरचा परिसर आरामात पाहता येत होता. ते दृश्य खरोखरच विलोभनीय होतं. समुद्राच्या बाजूने खाली पाहिलं तर दगडांवर आपटून परत येणार फेसळलेलं पाणी पांढऱ्याशुभ्र दुधाप्रमाणे भासत होतं.

थोडावेळ तिथेच थांबून फोटोसेशन वगैरे करून सगळे परतीच्या प्रवासाला लागले. दिवसभराच्या थकव्यामुळे बसमध्ये सगळ्यांच्याच विकेट पडल्या होत्या. अक्षय मात्र जागा राहून सगळ्यांचे झोपलेल्या अवस्थेत वेडेवाकडे फोटो काढत होता. साधारण आठ वाजता सगळे होस्टेलवर पोहोचले. थोडंस खाऊन लगेचच सगळे आपापल्या रुम मध्ये गेले.

रश्मीने सवयीप्रमाणे अविनाशला फोन लावला. आणि जवळपास दोन आठवड्यांनी त्यांच्यात पुन्हा पहिल्यासारखं

बोलणं झालं. दोघांनाही थोडं बरं वाटलं. बोलता बोलता रश्मी निद्रेच्या आधीन झाली. मग अविनाशने मनातच तिला गुड नाईट विश करून फोन ठेवून दिला आणि झोप येत नसल्याने शनिवारी काढलेले फोटो एडिट करायला सुरुवात केली.

****************************************

रश्मीच्या ग्रुपची आठवड्याची सुरुवात झाली तीच मुळी पुढच्या पिकनिकच्या प्लँनिंगने. पुढचा शनिवार रविवार सुट्टी असल्याचं त्यांच्या लीडने त्यांना आधीच सांगून टाकलं. मग अक्षय का कोणासाठी थांबणार आहे. त्यांनी सगळ्यांना विचारून पुढल्या आठवड्यात कायकिंग आणि पोवर बीचला जायचा प्लान केला. गेल्याच आठवड्यात बीचवर गेलो आता परत काय बीचवर जायचं. सगळ्यांनी पहिल्यांदा जरा नापसंतीच दर्शवली. पण आधी जवळ जवळ फिरून घेऊ नंतर मस्त लांबच्या ट्रिप शुक्रवारी रात्री निघून करू

अशी अक्षयने सगळ्यांची समजूत काढल्याने सगळेजण तयार झाले. अक्षयने विराजसच्या ग्रुपला मात्र याबाबत अजिबात सांगितलं नाही. आपल्या बरोबर नाही येत मग कशाला यांना उगाच भाव देऊन विचारायचं. असा विचार त्याने बहुदा केला असावा. रश्मीने मी विचारले असं म्हटलं तर त्याने तिलाच दम भरला. मग तीनेसुद्धा ते फार ताणून धरलं नाही.

इकडे विराजसच्या ग्रुपने या विकेंडला कोवलम बीचला जायचं ठरवलं. त्यांनी सुद्धा मागच्या वेळेसारखं ग्रुप मधल्या कोणाला विचारलं नाही. जेवढे जण कमी तेवढं मॅनेज करायला चांगलं असं निखिलचं मत असल्याने ते मोजकेच जण जायचे आणि खूप मज्जा करून यायचे. आणि रश्मीच्या ग्रुपचं व्हायचं असं की विराजसचा ग्रुप सोडला तर बॅचमधले जवळपास सगळेच जण असायचे त्यामुळे त्यांना कुठेही जायला किंवा निघायला उशीरच व्हायचा. अक्षयची तर प्रचंड चिडचिड व्हायची. त्याला एक तर सकाळी लवकर

उठायची सवय त्यामुळे बाकी सगळे उठे पर्यंत त्याच्या निदान दोन तीन तरी सिगरेट मारून व्हायच्या.

हॉस्टेल वर राहत असल्याने त्यांचं सोमवार ते शुक्रवार हे रुटीन ठरलेलंच होतं. कधी तरी ते ऑफिस सुटल्यावर कोणत्या तरी कॅफेमध्ये किंवा मॉलमध्ये जाऊन बसायचे. आणि मग केरळला आल्यापासून दुसऱ्याच आठवड्यात रश्मीचं अविनाशशी बोलणं कमी झालं. अर्थात ती काही मुद्दाम करायची अशातला भाग नाही पण घरट्यापासून लांब गेलेल्या पिल्लाला दुसरी सोबत ही शोधावीच लागते. आणि अविनाशलासुद्धा ते माहीत होतं. त्यामुळे त्यानेसुद्धा या गोष्टीचा कधी विचार केला नाही किंवा तिला कधी तसं बोलूनही दाखवलं नाही. मध्येच एक दोन दिवसातून त्यांच बोलणं व्हायचं. कदाचित अविनाशच्या जागी रश्मी असती तर तिने वेळ देत नाही म्हणून अविनाशशी भांडण सुद्धा केलं असतं. पण तो मात्र सगळं समजुतीने घेत होता.

रात्री उशिरा आल्याने सकाळचे दहा वाजले तरी अविनाश उठला नव्हता. त्याच्या आईने येऊन पाहिलं तर

अविनाशला अजून झोपलेलं पाहून तिला आश्चर्यचं वाटलं. तिने त्याच्या कपाळाला हात लावून पहिला तर तिला चटकाचं बसला.

"अवि...ए अवि..." तिने अविनाशला बळेच उठवलं."काय झालं? कधी आलास रात्री? बघ किती ताप भरलाय तुला. काल परत पावसात भिजला असशील. किती वेळा सांगितलं."

"आई. अगं कुठे आहे ताप? थोडीशी कणकण आहे पण आराम केला की ती सुद्धा कमी होईल."

"तू कधी माझं काही ऐकलं आहेस का जे आता ऐकणार. झोप मग शांतपणे. आज कुठेही बाहेर जायचं नाहीये"

"हो." असं म्हणून अविनाश पुन्हा पांघरुण घेऊन झोपी गेला.

इथे अक्षय आणि त्याचा ग्रुप शनिवारी ठरल्याप्रमाणे पोवरला जायला निघाले. अक्षयने यावेळी सगळ्यांच्या फ्लॅटवर जाऊन त्यांना सकाळी जबरदस्तीने उठवून तयार

केलं होतं. इतकंच नाही तर त्याने रश्मीला सतरा वेळा फोन करून इतकं भंडावून सोडलं की शेवटी रश्मीने सुद्धा सगळ्यांना लवकर उठवलं. निघाले खरे सगळे लवकर पण रस्त्यातच त्यांची बस पंक्चर झाली.

“अंकल. क्या हुआ?” अक्षयने खाली उतरून सिगरेट पेटवत विचारलं.

“पंक्चर हुआ है. सबको उतारनेको बोलो. दस मिनिट में हो जायेगी.” ड्रायव्हर ने केरळी टोन च्या मोडक्या तोडक्या हिंदीमध्ये म्हटलं.

‘ आईच्या गावात...’ अक्षय वैतागून म्हणाला आणि तसाच बस मध्ये चढला.

“सुजित, मिथिला... बाहेर या सगळ्यांनी. पंक्चर झालीये बस...”

“क्या क्या क्या?” त्या बस मध्ये असलेल्या अमराठी मुलांनी एकाच सुरात विचारलं.

“अरे वो बस के टायर में कूछ तो गया हैं. सबको उतारनेको बोला ड्रायव्हर. चलो जलदी उतरो. नही तो पोहोचनेमे लेट हो जायेगा.”

असं म्हणून त्याने जवळपास सर्वांनाच घाईघाईने बसच्या बाहेर काढलं.

सुदैवाने बस ज्या ठिकाणी पंक्चर झाली होती त्याच्या बाजूलाच चहाची टपरी होती. आणि आजूबाजूला निसर्ग सुद्धा तसा चांगला होता. फोटो काढायला चांगलं लोकेशन मिळालं म्हणून मुलींनी लगेच ओठांचा चंबू करायला सुरुवात केली.

“च्या आयला. या पोऱ्यांना काय कामं नाही काय दुसरी? कुठे पण काय फोटो काढायला चालू होतात.”

“मग काय त्यांनी तुझ्या बरोबर सिगारेट आणि चहा प्यायला यायचं का. ?” रश्मीने थेट प्रश्न केला.

“तसं नाही गं... पण...”

“काय पण काय?” रश्मीने आक्रमक पवित्रा घेत विचारलं.

“नाही काही नाही. जाऊदे...” रश्मीला तसं बघून अक्षयने सरळ माघार घेतली आणि मिथिलासकट सगळे हसायला लागले.

“काय झालं...?” रश्मीने विचारलं.

“अक्षयला तोडीस तोड भेटलंय कोणीतरी....”

“म्हणजे?”

“आज अक्षय चक्क तू विचारलेल्या प्रश्नावर उत्तर न देता गप्प बसला. गप्प बसेल तो अक्षय कसला. आम्ही जर कुणी बोललो असतो ना असं तर एव्हाना आमचं जगणं असह्य करून टाकलं असतं त्याने.”

“ओह. कदाचित मी नवीन आहे म्हणून तो काही बोलला नसेल.”

“नवीन...अनोळखी माणसाला भंडावून सोडतो तो... तू तर आता ओळखीची आहेस.”

रश्मी यावर काही बोलणार तोच अक्षयचा आवाज आला.

“ए चलो सब लोग... हो गया बस ठीक...”

मेंढरं चढवीत तसे सगळे एका लाईन मध्ये चढून बसले.

सगळे पोवर ला पोचले खरे पण अक्षयने हॉटेल बुक केलं नसल्याने त्यांना एवढ्या जणांसाठी हॉटेल मिळेच ना. बरंच शोधल्यावर त्यांना एक हॉटेल मिळालं. बीच पासून थोडं लांब. सगळ्यांनी बॅगा टाकल्या आणि बिचकडे धाव घेतली.

अक्षयला शांतपणे त्या हॉटेल मालकाशी बोलताना पाहून सगळ्यांच्या आश्चर्याचा पारावरच उरला नाही. तो परत येताच मिथिलाने त्याला विचारलं.

“काय रे. तू बीचवर न जाता चक्क त्या हॉटेल वाल्याशी बोलत बसलास.”

“अगं रात्रीची सोय करत होतो गं...”

“काय?” मिथिलाचे एकदम ओरडून विचारलं.

“अगं सोय म्हणजे बाटलीची सोय...”

“अच्छा. पण चालतं का इथे?”

“हो. चालतं. इथून जवळच आहे दुकान. पण बिअर मिळणार फक्त. आपल्या सारख कुठेही हार्ड ड्रिंक नाही मिळत. सरकारी दुकान असतं तिथेच मिळत.”

“हे काय आता नवीन?”

“ह इथे असंच आहे...सो आज बीअरच घ्यावी लागणार....”

“हं. आणू थोड्या वेळाने जाऊन...”

“चालेल” सुजीत एकदम आनंदात म्हणाला.

“हा बघ. नुसत्या नावानेच याला आनंदाच्या उकळ्या फुटायला सुरुवात झाली.”

“तसं नाही गं पण...”

“जाऊदे...” सुजितला मध्येच अडवत अक्षय म्हणाला.

“पण घेणार कोण कोण आहे?”

“सगळेच.” सुजित खांदे उडवत म्हणाला.

“आपलं ठीक आहे रे...रश्मीचं काय. ?”

“अरे हा...मिथिला.”

“ती पण....” अक्षय काही बोलायच्या आतच मिथिलाचे सांगून टाकलं.

“तुला कसं माहीत...”

“रूममेट आहे माझी ती. माहितीये मला.”

“बरं ठीक आहे. आम्ही नंतर जाऊन आणू. आता थोडं फिरून येऊ.”

“हो. चला.” सुजित लगेच उठत म्हणाला.

“हा. ती पूर्वी गेलीये ना. म्हणून जायचं असेल याला” अक्षयने उगाच सुजितला चिडवलं.

“काय संबंध... मला तर...” सुजित सारवासारव करण्याचा प्रयत्न करू लागला.

“राहू दे हा राहू दे. कळेल थोड्याच दिवसात काय संबंध ते. चला आता.” अक्षय बाहेर पडत म्हणाला.

थोडावेळ बीचवर टाईमपास केल्यावर सगळे एक एक करून हॉटेल वर परतत होते. अक्षय आणि सुजित बिअरशॉप मध्ये गेले आणि बघतो तर काय त्यांच्या बस मधल्यांचे जवळपास सगळ्यांचेच प्रतिनिधी तिथे हजर.

“आयला. अख्खी बस च आलीये वाटते इथे...” अक्षय हसत म्हणाला.

“आपल्याला वाटलं की आपणंच असू तर हे तर आपल्यापेक्षा चार पावलं पुढे.”

अक्षयने मग सगळ्यांसाठी हवा तो स्टॉक घेतला आणि मग सगळ्यांबरोबर चालतच हॉटेलकडे निघाला.

आता मोठा प्रोग्रॅम आहे म्हटल्यावर अक्षयने हॉटेल वाल्याला विनंती करून खाली मोकळी जागा वापरायची परवानगी मिळवली. आणि मग सगळ्यांनी टेबल खुर्च्या मांडून तिथेच बैठक मांडली.

रश्मी खाली जाण्यासाठी रूममधून बाहेर पडली तोच तिचा फोन वाजला. मिथिलाला पुढे जायला सांगून तिने फोन उचलला.

"हॅलो...”

"काय मॅडम, काय चाललंय??” समोरून अविचा आवाज आला.

"अरे आता खाली जमले आहेत सगळे. फिरायला आलो आहोत ना आम्ही.”

"कुठे?? अरे हो! विकेंडला प्लॅन असतो ना तुमचा. कुठे गेला आहात फिरायला?"

"पोवरला आलो आहोत. बरं अवि! ऐक ना. नंतर फोन करू का मी? सगळे बोलावतायेत खाली. ठीके. चल बाय” तिने अजून तिथेच रेंगाळणाऱ्या मिथिलाकडे पाहून म्हटलं.

"हो... बा..." अविनाशचं बोलणं पूर्ण व्हायच्या आतच रश्मीने फोन कट केला.

रश्मी केरळमध्ये गुंतत चालली होती. मिथिला, अक्षय वगैरे सोबतच तिचा वेळ निघून जायचा. ह्या सगळ्यात तिला अविनाशची जरासुद्धा आठवण यायची नाही. आणि तिचंही बरोबर होतं म्हणा. ते सगळे संपूर्ण वेळ एकत्र असायचे,

त्यामुळे ती त्यांच्यात चांगलीच रुळली होती. अविनाशलासुद्धा ते जाणवत होतं. त्यामुळे उगाच तिला फोन करून त्रास द्यायचा नाही असं अविनाशने मनोमन ठरवून टाकलं.

जवळपास दोन तीन वाजले पर्यंत सगळे जागेच होते. नंतर हळू हळू सगळे आपापल्या रूम मध्ये गेले. सकाळी रश्मी उठून पाहते तर साडे दहा वाजले होते. सूर्य चांगलच डोक्यावर आला होता. अक्षय अजून उठवायला कसा आला नाही म्हणून तिने अक्षयच्या रुममध्ये जाऊन पाहिलं तर अक्षय एक पाय आणि हात बाहेर काढून बिछान्यावर पालथा पडलेला. तिने त्याला हाक मारली तरी तो उठला नाही. मग रश्मीने त्याला गदागदा हलवलं.

“काय झालं???” अक्षय एकदम दचकून उठत म्हणाला.

“अरे...वाजले बघ किती...”

“किती?”

“साडेदहा...”

“काय....” अक्षयने चमकून मनगटावरचं घड्याळ पाहिल.

“चला चला निघुया...” अक्षय एकदम आवराआवर करत म्हणाला.

“चला काय. कोणीही उठलं नाहीये. मला सहज जाग आली म्हणून तुला उठवायला आले.”

“लागली. चल लवकर बाकीच्यांना उठवू. ए सुज्या ऊठ...” अक्षय बाजूला झोपलेल्या सुजितला लाथ घालत म्हणाला.

अक्षय बाहेर येई पर्यंत रश्मीने सगळ्या मुलींना उठवलं होतं. घाईघाईत सर्व आवरून सगळ्यांनी हॉटेल सोडलं पण त्यांना निघायला दीड वाजला. आणि एवढ्या उशिरा कायकिंगला जाऊन काय फायदा. नुसतं दर्शन घेऊन यावं लागेल. त्या पेक्षा नकोच असा विचार करून आणि सर्वांचं

मत घेऊन अक्षयने ड्रायव्हरला गाडी सरळ हॉस्टेलकडे घ्यायला सांगितली.

"काय मग.... कशी झाली पिकनीक?" ऐश्वर्याने सकाळी सकाळीच बसच्या लाईन मध्ये उभ्या असलेल्या रश्मीला विचारलं.

"चांगली होती. तुमची?"रश्मीने एकदम फिक्या चेहऱ्याने विचारलं.

"आमची तर एकदम मस्त...निखिल आणि विराजसने सगळी व्यवस्था आधीच करून ठेवली होती. त्यांचं प्लँनिंग इतकं मस्त असतं म्हणून सांगू...."आणि मग ऑफिसमध्ये पोहोचेपर्यंत ऐश्वर्याने रश्मीला त्याच्या ट्रीपचा इति वृत्तांत कथन केला. मध्येच हिमांशी सुद्धा त्यात सामील व्हायची.

"मस्त गं. सही झाली तुमची ट्रिप. आम्ही एवढे जण जातो ना की मॅनेजचं नाही होत सगळं. काही ना काही गडबड

होतेच. पहिल्या दोन्ही ट्रीपला पाहिजे तसं एन्जॉय करता आलंच नाही."

"अच्छा. म्हणून आम्ही मोजकेच जण जातो. मस्त एन्जॉय करायला मिळतं."

"चांगलंय."

"हं. बरं चल. मी आणि हिमांशी कॅन्टीनमध्ये जातोय. येतेय तू?"

"नाही नको. मी आपल्या हॉस्टेलखालीच नाश्ता केला. तुम्ही या जाऊन. भेटूया ट्रेनिंग रूम मध्ये...."

"ठीक आहे. सिया..." एवढं बोलून ऐश्वर्या आणि हिमांशी खाली कॅन्टीन मध्ये गेल्या आणि रश्मी दुसऱ्या मजल्यावरच्या त्यांच्या क्लास मध्ये.

"अरे ही बघ आली." रश्मीला आत शिरताना पाहून अक्षय जवळजवळ ओरडलाच.

“काय झालं? एवढ्या जोरात का ओरडलास?” रश्मीने एकदम चमकून विचारलं.

“काही नाही ग. असच. आम्ही तुझ्याच विषयी बोलत होतो आणि तितक्यात तू आलीस ना. म्हणून...” मिथिला म्हणाली.

“माझ्याविषयी... अच्छा म्हणजे मी चर्चेचा विषय सुद्धा होऊ शकते तर...” रश्मी हसत म्हणाली.

“बॉस. तू आधीपासूनच चर्चेचा विषय आहेस आपल्या पूर्ण लर्निंग ग्रुपमध्ये...”

“असं काहीही नाहीये बरं...”

“कळेल तुला थोडेच दिवसात.”

“हं...आता जरा आपण कामाला लागायचं का? की दिवसभर टाईमपासच करत बसणार आहोत.”

"या आल्या शाळेतल्या बाई..." अक्षय एकदम टर उडवत म्हणाला.

"व्हॉटएव्हर..." एवढं म्हणून रश्मी तिच्या जागेवर जाऊन बसली आणि तेवढ्यात बिना मॅम आल्याने सगळ्यांचीच पांगापांग झाली.

"त्या ऐश्वर्याच्या ग्रुपची ट्रिप मस्त झाली ग...." दुपारी गप्पा मारता मारता रश्मी मिथिलाला म्हणाली.

"म्हणजे...?"

"आज सकाळी मी ऐश्वर्या आणि हिमांशी सोबत आले ना. तर त्या सांगत होत्या सगळं..."

"फेकत असतील." मिथिलाने सहज म्हटलं.

"नाही ग. त्यांनी मला फोटो दाखवले सगळे. आपण कोवलमला जाऊन काहीच केलं नाही. आपण काय केलं

फक्त बीच आणि लाईटहाऊस. त्यांनी किती मस्त बोट रायडिंग वगैरे केलं.”

“तिथे बोट रायडिंगसुद्धा होतं...” मिथिलाने डोळे विस्फारून विचारलं.

“मग काय. हा आपला अक्षय नुसतंच काही माहिती न काढता प्लॅन करतो.”

“तो निदान करतो तरी प्लॅन...दुसरं कोण करतं तरी का.... ?”

“हो तेही आहेच म्हणा. पुढचा विकेंड कुठे जातोय आपण?”

“काही माहीत नाही. बघू काय सांगतायेत सगळे. तुझा त्यांच्या बरोबर जायचा विचार सुरु आहे की काय...”

“नाही ग...तसं काही नाही...”

“हं...बघू काय ठरवतात सगळे....”

रात्री त्यांच्या एलजीच्या व्हॅट्स अँप ग्रुपवर अशीच मस्ती चालू होती. ट्रेनिंग मधली सर्वात प्रसिद्ध मुलगी अशी टॅगलाईन नुकतीच त्याच्या सीआरने रश्मीला दिली होती. त्यावरूनच सगळ्यांचं चॅट चालू होतं. असंच चालू असताना रश्मीला एका अनोळखी नंबरवरून मेसेज आला.

‘ फक्त आयएलपीमध्ये नाही तर मुंबई मध्ये प्रसिद्ध आहेस तू.... ’

तिने उत्सुकतेने डीपी पाहिला. विराजसचा मेसेज होता तो.

“तुला काय माहीत.... ?” तिने सरळसोट भाषेत त्याला विचारलं.

कारण असे मेसेज तिला नवीन नव्हते. दिसायला तशी ती नाकोडोळी नीटच होती. मोठ्या मेहेनतीने तिने स्वतःच

सौंदर्य व्यवस्थित जपलं होतं. तिच्याशी बोलण्यासाठी मुलं काही न काही कारण काढून मेसेज करायचीच.

“म्युच्युअल फ्रेंड्स खूप आहेत आपले...” विराजसने सुद्धा तिला तिच्याच शैलीत उत्तर दिलं.

“हो पण आपण फ्रेंड्स नाही आहोत ना ...”

“मान्य.... पण मैत्रीने केल्याने होते. जर आपण केलीच नाही तर मग या जगात एकटं राहू आपण...”

“अहो लेखक. शब्दांचे खेळ माझ्यासोबत नाही हा खेळायचे.”

सुरुवातीला झालेल्या ओळख परिषदेत आपल्याला साहित्याची आवड आहे आणि आपण मध्ये मध्ये काहीतरी लिहत असतो असं विराजसने आधीच सांगितलं असल्यामुळे एव्हाना सगळ्या एलजीला ते माहीत झालं होतं.

“लेखक असल्याचा एवढा तरी फायदा असायलाच हवा ना. ?” विराजसने हसण्याचा चेहरा पाठवत विचारलं.

“हो...म्हणून आधीच सांगितलं. की मला शब्दांत नाही पकडायचं...”

“बरं बाई...ठीक आहे...”

“हं.... तसं छान लिहितोस तू....”

“आणि हे तुला न वाचताच कळलं. आश्चर्यच आहे.”

“का? जर तुम्ही मुलं आमची माहिती ठेवू शकता तर आम्ही तुमची माहिती ठेवू शकत नाही का?” रश्मीने मिश्कीलपणे हसत विचारलं.

“अच्छा. म्हणजे गुप्तहेरी चालू आहे वाटत.”

“ए. गुप्तहेरी वगैरे नाही. असंच कुतुहल वाटलं म्हणून तुझं फेसबुक पाहिलं होत. त्यातला एक लेख वाचला . छान वाटला म्हणून बोलले.”

“ओह. थँक यू. थँक यू. म्हणजे मला अजून एक वाचक मिळाला तर...”

“तसं मी फार मराठी वाचत नाही. चांगलं वाटलं तर वाचेन...”

“बरं. ठीक आहे. चला आता झोपतो. भेटू उद्या...बाय...”

“बाय...”

रश्मीने मग त्याच फेसबुक उघडलं आणि त्याची आलेली मैत्रीची विनंती मान्य करून आणि त्याने लिहिलेल्या काही कविता वाचायला सुरुवात केली.

*********************************************

त्या दिवसापासून रश्मी आणि विराजसच अधून मधून बोलणं व्हायचं. त्यांच्या बोलण्यातूनच त्यांच्यातील मैत्री वाढत होती. त्याचे ग्रुप सोबत असताना मात्र त्यांच्या तोंडातून एक अक्षर निघत नसे. पण त्यांच्या जीआर माधुरीनेच निखिलला सांगितलं की आपण सगळे एकत्र आहोत तर आपण

एकत्रच ट्रिप करूया. निखिलने इतरांचं मत घेतल असता सिद्धेश आणि गौरवने सरळ नापसंती दर्शवली. पण ' आपण इथे एकत्र आहोत. कधी आपल्याला कोणाची मदत पडेल सांगता येत नाही. एकत्र राहिलो तर तेवढंच आपल्याला चांगलं' असं मत मांडत विराजसने कसाबसा सगळ्यांचा होकार मिळाला. निखिल आणि अक्षयच अजिबात पटत नसल्याने ट्रिप प्लँनिंग मधून निखिलने माघार घेतली आणि पुढचं प्लँनिंग विराजस करेल असं त्याने माधुरीला सांगून टाकलं. विराजसने सुद्धा अक्षय जर लुडबुड करणार नसेल तरंच मी प्लान करेन अशी अट घातली. कारण विराजस सुद्धा थोडा तापट डोक्याचा होता. त्याने ठरवलेलं काही झालं नाही किंवा त्याच्या प्लॅनिंग मध्ये कोणी खो घातला की याचा तिळपापड व्हायचा. माधुरीने सगळ्या अटी मान्य केल्यावर शेवटी सगळं एलजी एकत्र जायला तयार झाला.

विराजसने मग गुगलवर शोधून दोन तीन ठिकाणं निवडली. सगळ्यांच्या संगनमताने पोंमुडी हे थंड हवेचं

ठिकाण ठरवण्यात आलं. विरजसने मग ट्रॅव्हल्स शी वगैरे बोलून दोन छोट्या बस बुक करून टाकल्या.

ठरल्याप्रमाणे सगळे निघाले पण विराजसने ट्रिपच्या प्लॅन मध्ये थोडासा बदल केला होता. पूर्ण दिवस पोंमुडीला काय करणार म्हणून त्याने पहिले मीनमुट्टी धबधब्याला भेट द्यायचं ठरवलं. महामार्गावर बस ठेवून सगळे पायीच पुढे निघाले. वाटेत एक छोटासा ओढा होता. तो पार केल्यावर जवळपास पंधरा मिनिटे चालल्यावर ते धबधब्याच्या एका टोकाला पोहोचले. मुख्य धबधबा अजून वर होता. काही जणांनी तिथेच बसकण मांडली. वर जायचं तर धबधब्याच्या एका बाजूने थोडंस ट्रेकिंग करत जावं लागणार होतं. सर्व एकत्र जरी आले असले तरीसुद्धा इथे देखील जो तो आपापल्या ग्रुपला धरून होता. निखिल वगैरे थोडा वेळ खाली थांबले पण त्यांच्यातला ट्रेकर त्यांना काही स्वस्थ बसू देईना. मग सगळे जण वर जायला निघाले. मजल दरमजल करत शेवटी ते दुसऱ्या टप्प्याला पोहोचले. मुख्य धबधबा तिथून दहा मिनिटे दूर होता. तिथपर्यंत पोहोचण्यासाठी

त्याच धबधब्याच्या पाण्याचा एक प्रवाह ओलांडून जायचं होतं. पाणी खूप खोल नसलं तरी सुद्धा मागे जवळपास १०० फूट खोल दरीसारखा उतार होता. प्रवाह पार करण्यासाठी एका टोकाकडून दुसऱ्या टोकापर्यंत जाड दोरखंड बांधलेले होते.

पाण्याचा प्रवाह पार करुन विराजस आणि त्याचा ग्रुप पुढे गेले तर रश्मी आणि अक्षय दोघेच तिथे विश्रांती घेत बसले होते. त्या दोघांनाच पाहून विराजसचा थोडं आश्चर्यच वाटलं.

"हे काय.... दोघेच तुम्ही? बाकीचे कुठे गेले...?"

"अरे कोणालाच नव्हतं यायचं एवढ्या वर. किती मनधरणी करून झाली. शेवटी मग आम्ही दोघंच आलो पुढे."

"अच्छा......" विराजसने मान डोलावली खरी पण त्याच्या मनातली शंका काही कमी झाली नाही.

आता एकाच ठिकाणी पोहोचायचं असल्यामुळे सगळे एकत्रच निघाले. पावसाळा नसला तरी धबधब्याला बरंच

पाणी होतं. केरळ मध्ये अधून मधून पाऊस सुरूच असतो. त्यामुळे इथे मुबलक पाणी आणि सर्वत्र हिरवागार निसर्ग असतो. समोरून उंच डोंगरावरून तो धबधबा कोसळत होता. फार मोठा नसला तरीसुद्धा ते दृश्य विहंगम होत. थोडा वेळ सगळे तिथेच थांबले. समोर काचेसारखं स्वच्छ पाणी पाहून अक्षयला पाण्यात उडी घ्यायचा मोह आवरत नव्हता पण तिकडे रखवालदार उभा असल्याने अक्षय मोठ्या कष्टाने स्वतःला आवर घालत होता. तासभर तिथे सेल्फी वगैरे काढून सगळे परतीच्या प्रवासाला लागले. अर्धा रस्ता पार करतात तर त्यांना समोर त्यांच्या एलजी मधले बाकी जण वर चढत असलेले दिसले.

"बघा. आता येतायेत सगळे. म्हणजे आता फुकट टाईमपास होणार...." विराजस निखिलला म्हणाला.

"तुझं काय ते तू बघ. मी फक्त तुझ्या बरोबर येणार आहे." निखिल हसतच म्हणाला.

"हो आता काय...आलीया भोगासी..."

ते सगळे खाली उतरले तेव्हा मिथिला वगैरे खालच्याच पाण्यात पाय टाकून बसलेले. आजूबाजूला इतर बरीच मंडळी तिथे जलविहार करत होती. त्यांना पोहताना पाहून सर्वांच्याच मनात त्या पाण्यात पोहण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली. मागचा पुढचा काहीही विचार न करता सर्वांनीच पाण्यात उड्या टाकल्या. थंडगार पाण्यामुळे त्यांच्या अंगावर काटाच उभा राहिला तरीसुद्धा त्यांनी बाकी जण येईपर्यंत त्या पाण्यात मनसोक्त पोहून आपली इच्छा पूर्ण केली. सगळे आल्यावर ठरलेल्या हॉटेल मध्ये जेवण करून त्यांच्या बस पोंमुडी च्या रस्त्याला लागल्या.

जसजसं पोंमुडी जवळ यायला लागलं तसा हवेत गारवा वाढू लागला. सभोवताली खोल दऱ्या आणि वळणावळणाचा घाट. त्यातही ते ड्रायव्हर अगदी सफाईने बस चालवत होते. पोंमुडीला उतरले तेव्हा हवेत बऱ्यापैकी थंडावा जाणवत होता. अक्षयने उतरल्या उतल्याच एक सिगरेट पेटवून स्वतः पुरती सोय करून घेतली. भराभर सिगारेटचे झुरके घेत त्याने सिगरेट संपवली तोच पुन्हा जोराचा पाऊस सुरू

झाला. सगळे जण धावत जाऊन एका मोठ्या झाडाखाली उभे राहिले. काही जणांकडे छत्र्या होत्या पण वाराचं इतक्या जोरात वाहत होता की त्याच्यासमोर छत्रीचा टिकाव लागणंसुद्धा कठीण होतं. थोडावेळ पडून तो पाऊस आला तसा निघून गेला. मग सगळे आपापल्या ग्रुपने फिरायला बाहेर पडले.

एका ठिकाणी विराजस आणि रश्मीचा ग्रुप जवळजवळ उभे होते. तीच संधी साधून विराजसला चिडवण्यासाठी निखिलने त्याला तो नको म्हणत असतानाही रश्मी बरोबर फोटो काढायला लावला. तिनेही काही फारसे आढेवेढे घेतले नाही. जणू काही ती त्याच क्षणाची वाट पाहत होती. मध्येच एखादा मोठा ढग येई आणि समोरच दृश्य त्यात विरून जाई. अक्षय एका उंच ठिकाणी उभा राहून तिथून मोठ्याने आरोळ्या ठोकत होता. विरुद्ध बाजूला असलेले त्याच्याच एलजी मधली काही मुलं त्याला प्रतिसाद देत होती.

अंधार पडू लागतात विराजसने सगळ्यांना घाईघाईने बस मध्ये बसवलं आणि ते निघाले. या ट्रिपच्या दरम्यान त्याने

रश्मीचे बरेच फोटो काढले होते. अर्थात तिच्या सांगण्यावरूनच. त्याने ऐश्वर्याचे काढलेले एक दोन फोटो तिने पाहिले आणि तो फोटो चांगले काढतो म्हणून तिनेही त्याला तिचे फोटो काढायला सांगितलं. त्याच निमित्ताने त्यांची अजून ओळख झाली होती. जाताना रश्मी आणि विराजस वेगवेगळ्या बस मध्ये असल्यामुळे त्यांना बोलता काही आलं नाही. एक बस मुलांच्या हॉस्टेलला गेली आणि दुसरी मुलींच्या.

पोंमुडीच्या ट्रिप नंतर रश्मी आणि विराजस यांचं चांगलच जमायला लागलं होतं. त्यातच मागची ट्रिप विराजसने एकदम छान प्लॅन केल्याने त्यानेच पुढची ट्रिप प्लॅन करावी असा सगळ्यांचा हट्ट होता. विराजसनेही फार आढेवेढे न घेतला निखिल आणि त्यांच्या जीआर च्या मदतीने पुढचं ठिकाण शोधायला सुरुवात केली. एक दोन दिवस शोधल्यानंतर मग विराजसने डीलरला फोन करून हाऊसबोट ची चौकशी केली आणि घासाघीस करून पुढील आठवड्याचा अँलिपी ला जायचा प्लॅन नक्की केला.

अँलिपीला जाण्याआधी आगाऊ पैसे भरणे गरजेचे होते. कारण जर पैसे भरायला उशीर केला असता तर त्यांना आयत्या वेळेवर हाऊसबोट मिळाली नसती आणि विराजसचा याची पक्की कल्पना होती. म्हणून त्याने सगळ्यांच्या मागे लागून आगाऊ रक्कम जमा करून दोन हाऊसबोट ठरवून टाकल्या. रश्मीच्या ग्रुपकडून पैसे जमा करण्याची जबाबदारी त्याने रश्मीकडेच सोपवली होती. त्या निमित्ताने त्या दोघांमधली मैत्री बऱ्यापैकी वाढली. अँलिपीला दोघांचेही ग्रुप एकाच हाऊसबोट वर राहणार असं त्यांनी आधीच ठरवून ठेवलं होतं. विराजस आणि रश्मी दोघांचेही ग्रुप अजूनही त्यांच्या मैत्रीबद्दल अनभिज्ञ होते. कधी एकदा शनिवार होतो आणि अँलिपीला पोहोचतो असं त्यांना झालं होतं.

पण तिथे पोहोचले आणि पाहतो तर काय...डीलरने सगळा घोळ करून ठेवला होता. तिथे दोन मोठ्या आणि एक छोटी अशा तीन हाऊसबोट तयार होत्या. विराजसने बराच वाद घातला. पण त्यातून काहीही निष्पन्न झालं नाही.

आणि त्या लहान बोटीवर कोणीही जाण्यासाठी तयार नव्हतं. विराजसने आजूबाजूला पाहिलं. निखिल आणि त्याच्या ग्रुपचे सगळे मेंबर एका बाजूला उभे होते. विराजसचं लक्ष जाताच निखिलने त्याला तिथे बोलावलं.

"वीरा...आपण जाऊ त्या बोटीवर. बोट लहान असली तरीसुद्धा एकदम मस्त आहे. आपल्याला दोन रूम खूप झाल्या. आणि शिवाय सगळ्यांची कटकट सुद्धा नाही. आपण आपलं मस्त एन्जॉय करू..." विराजसने सगळ्यांवरून नजर फिरवली. सगळ्यांनीच मूक संमती दिल्याने विराजसला मान्य करावंच लागलं. आणि थोड्याच वेळात त्या तीनही बोटी वेगवेगळ्या दिशेने भ्रमंती करण्यासाठी रवाना झाल्या.

अँलिपीला हाऊसबोट मध्ये राहणं हे प्रत्येक ट्रॅव्हलरचं स्वप्न असतं. बोट धावत असताना पाण्यावरून येणारी ती थंडगार वाऱ्याची झुळूक, मध्येच कोसळणारी एखादी पावसाची बारीक सर, आणि त्यात आजूबाजूला दिसणारी

हिरवीगार झाडी. मुख्यतः नारळाची...स्वर्गसुख अनुभवल्याचा भास होतो.

विराजसने त्यांच्या बोटीच्या कप्तानला विनंती करून एक लांबची रपेट मारून आणायला सांगितली. कप्तानने त्याच्या विनंतीला मान देऊन बोटीची दिशा बदलली आणि एका वेगळ्याच रस्त्याला लागला. त्यांची बोट छोटी असल्याने त्या छोट्या ओढ्यातूनही जाऊ शकत होती. बरंचसं अंतर पार केल्यावर एका ठिकाणी ती बोट थांबली. त्यांच्या दुपारच्या जेवणाची सोय बोटीवरचं करण्यात आली होती. मस्त पापलेट फ्राय , कोलंबीचं कालवण आणि भाकरी असा फक्कड बेत होता. सगळेच जेवणावर यथेच्छ तुटून पडले. जेवण झाल्यावर थोडावेळ तिथेच विश्रांती घेऊन त्यांची बोट पुन्हा एकदा प्रवासाला लागली. संध्याकाळ होत आली होती. सूर्याचा मावळतीला प्रवास सुरु होता. सूर्यास्ताच्या तांबूस छटा आकाशात सर्वत्र पसरल्या होत्या आणि साधारण पाच साडेपाच वाजता ते ओढ्याच्या शेवटच्या टोकावर पोहचले. तिथून समोर नजर जाईल तोवर

अथांग जलाशय पसरला होता. सूर्य तांबूस होऊन त्या जलाशयात डुबकी मारण्याच्या तयारीत होता. ते विहंगम दृश्य पाहून सगळ्यांच्या नजरेचं पारणं फिटलं आणि ते डोळ्यात साठवून त्यांनी परतीचा प्रवास सुरु केला.

बराच वेळ फिरून झाल्यावर तीनही बोट शेवटी एका जवळ येऊन थांबल्या. पण यातही नशीब थोडंस परीक्षा घेतंच होतं. रश्मीची बोट एका बाजूला होती, त्याच्या बाजूला दुसरी बोट आणि दुसऱ्या टोकाला विराजसची बोट. एका बोटीतून दुसऱ्या बोटीमध्ये जावं म्हणजे दिव्यच होतं. बोटीला असलेल्या मोठ्या खिडकीतून बाहेर पडायचं आणि समोरच्या बोटीची खिडकी येईपर्यंत बोटीच्या बाजूला बांधलेल्या बांबूवरून चालत तिथपर्यंत पोहोचायचं. यात जरा जरी तुमचा अंदाज चुकला तर सरळ पाण्यात बुडलाच म्हणून समजा. कारण तीनही बोटी एकमेकांच्या बऱ्यापैकी जवळ होत्या. पाण्यात पडलं तर योग्य ठिकाणी डोकं वर काढता आलं तर ठीक नाहीतर पडलेला बोटीखालीच अडकून पडण्याची भीती. त्यातच त्या पाण्यात अनेक

प्रकारच्या वेली फोफावलेल्या. पण शेवटी मुंबईचं रक्त ते. कसं शांत बसणार. मुली सोडुन विराजससकट सगळेच हे जलदिव्य पार करून तिसऱ्या बोटीवर पोहोचले. ती बोट मोठी असल्यामुळे डीजे ची सोय त्याच बोटीवर केलेली होती. एका बाजूला सगळे नाचत होते तर दुसऱ्या बाजूला विराजस, सुजित आणि इतर दोन तीन जण पत्त्यांचा डाव मांडून बसले होते. अक्षय बोटीच्या टोकाला उभा राहून आजूबाजूचा परिसर निरखत होता.

डीजेच्या निमित्ताने थोडावेळ का होईना दोन्ही ग्रुप एकत्र येऊन नाचत होते. साडेनऊ वाजले तसा विराजस आणि त्याचा ग्रुप त्यांच्या बोटीवर जायला निघाले. पुन्हा एकदा जलदिव्य पार करायला. कारण एकदा का त्यांची बैठक बसली की नंतर हे दिव्य पार करणं थोडं कठीणच होतं. शिवाय मुलीही त्या बोटीवर कंटाळून गेल्या होत्या.

रात्री जेवल्यानंतर या सगळ्याची धमाल चालू होती. हिमांशी सोडून बाकी सगळे जण मैफिलीचा आनंद घेत होते. हिमांशीला थोडी कणकण असल्याने तिने आराम

कारण पसंत केलं. दंगा चालू असतानाच त्यांना झोप लागली. विराजस आणि निखिल मात्र जागे होते. त्यांना काही केल्या झोप येत नव्हती. मग ते दोघे वरती जाऊन गार हवा अंगावर झेलत होते. अशा शांत आणि थंडगार वातावरणात विराजसला सिगरेट पेटवायचा मोह आवरला नाही आणि मग निखिल आणि तो सिगरेटचे झुरके घेत वरतीच बसून राहिले.

दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांना परतीचा प्रवास करायचा होता. साडेदहा वाजता बोट किनाऱ्याला लागल्यावर ते आपापल्या बस मध्ये बसले आणि जाता जाता रस्त्यात येणाऱ्या अँलिपी बीच वर थोडावेळ थांबून पुन्हा आपल्या हॉस्टेलकडे रवाना झाले.

संध्याकाळी हॉस्टेलला पोहोचल्यावर रश्मीने घरी फोन केला. तसे तिचे आई बाबा तिला रोज फोन करायचेच पण तब्येतीची वगैरे चौकशी करून फोन ठेवून द्यायचे. पण आज रश्मीकडे बराच मोकळा वेळ असल्याने तिघेजण तासभर गप्पा मारत बसले होते. मिथिला जेव्हा तिला

डिनरसाठी बोलवायला आली तेव्हा आई बाबांची मिथिलाशी ओळख करून देऊन तिने फोन ठेवला व त्या दोघी डिनर करण्यासाठी बाहेर पडल्या.

*******************************************

सोमवारी सकाळी नेहमीप्रमाणे विराजस सर्वांच्या आधी येऊन बसला होता. म्हणजे तसे निखिल, विराजस, कार्तिक वगैरे त्यांची गँग एकत्रच यायची. पण कालच्या ट्रीपमुळे सगळे जण दमले होते त्यामुळे त्या सगळ्यांनाच जरा उशीर झाला. विराजसला नेहमीच्या वेळेला जाग आली मग पटापट आवरून तो जिमला जायचं म्हणून लवकर निघाला. निघताना त्याने कार्तिक आणि निखिलला हलवून हलवून जागं केलं आणि दरवाजा नुसता लोटून घेतला.

थोड्या वेळाने एक एक जण येऊ लागले. विराजस मात्र रश्मीची वाट पाहत होता. रश्मी आली तेव्हा तिच्या चेहऱ्यावरून तरी तिचा मूड बरा दिसत नव्हता. रश्मी आली आणि तशीच विराजसकडे न बघता बाहेर गेली. विराजसला

जरा आश्चर्यच वाटलं पण मग त्याने सुद्धा त्याच्या कामाकडे लक्ष वळवलं. नंतर दुपार पर्यंत तरी विराजस आणि रश्मी समोरासमोर आले नाहीत.

चार वाजता विराजस त्याच्या ग्रुप बरोबर चहा प्यायला म्हणून बाहेर आला होता तेव्हा रश्मीसुद्धा मिथिला बरोबर तिथे होती. रश्मीला पाहिल्यावर विराजस नेहमीच्या मस्करीच्या मूड मध्ये म्हणाला.

"आज तर काही लोकांना खूप भाव चढलाय वाटतं. शनिवारी तर किती मिस करत होते आणि आज ओळख दाखवायला पण तयार नाहीत."

"हा हा. तुला आधीच म्हणालो होतो मी पण तू भरकटला होतास ना..." निखिलने असं म्हणतात बाकीचेसुद्धा हसायला लागले.

यावर कोणी काही बोलणार तोच रश्मी किंचाळली. "यार तुम्हाला काय दर वेळी मस्करीच सुचते का?तुम्ही काय स्वतःला शहाणे समजता का?"

रश्मी इतकं म्हणाली आणि ताडताड पावलं टाकत कलासमध्ये निघून गेली. मिथिलाचे क्षणभर विराजसकडे पाहिलं आणि नजरेनेच सॉरी बोलून ती सुद्धा रश्मीच्या मागे धावली.

“हिला काय झालं मध्येच...” सिद्धेश सिगरेट पेटवत म्हणाला.

“काय माहीत...त्या अक्षय बरोबर काही झालं असेल...” कार्तिक हसत म्हणाला आणि मग सगळेच त्या हसण्यात सामील झाले.

त्या नंतर विराजसने रश्मीकडे एकदाही पाहिलं नाही. तो स्वभावाने चांगला असला तरी शीघ्रकोपी होता. उगाचच समोरचा काही बोलला तर तो अजिबात ऐकून घायचा नाही. नवीन मुलींशी मैत्री करण्यासाठी तो नेहमी पुढाकार घ्यायचा पण ती मुलगी आपल्याला इग्नोर करतेय अशी थोडी जरी शंका आली तर तो तिच्याकडे सरळ दुर्लक्ष करायचा. त्याच्या जुन्या सगळ्याच मित्रमैत्रिणीना त्याचा हा स्वभाव चांगलाच

माहीत होता. पण ते सगळे त्याला सांभाळून घायचे कारण एकदा का त्याचा राग शांत झाला की तो जर कोणी दुखावलं गेलं असेल तर त्याची माफीही मागायचा.

एक दोन दिवस गेले असतील. विराजस पुढच्या पिकनिकच्या तयारीला लागला. पण यावेळी त्याच्यासोबत रश्मी नव्हती. विराजसने एकट्यानेच सगळ्या हॉटेल्स वगैरेला फोन करून चौकशी वगैरे केली. पण गुरुवारी त्यांना समजलं की केरळच्या किनारपट्टीच्या जवळ वादळ सुरू असल्याने त्यांना या वीकेंडला बाहेर जायला परवानगी मिळणार नव्हती. सगळ्यांचाच हिरमोड झाला.

शनिवारी सकाळी विराजस जरा उशिराच उठला. भूक लागली होती म्हणून सगळं आवरून तो नाश्ता करायला खाली गेला तर खाली सिद्धेश धापा टाकत बसला होता. त्याची अवस्था बघून हा रंनिंग करून आलेला आहे हे विराजसला कळलं. त्याला न विचारताच विराजसने दोन ऑम्लेटपाव ची ऑर्डर देऊन टाकली.

नाश्ता करून दोघे रूमवर आले. आल्या आल्याच निखिल त्यांना म्हणाला.

"बिग बाजार ला जातोय आपण दुपारी..."

विराजस आणि सिद्धेशने अधिक काही न विचारता त्याला मूक संमती दिली. घरी बसून बोअर होण्यापेक्षा कुठे तरी बाहेर पडलेलं बरं हेच सगळ्यांचं मत होतं.

बिग बाजार मध्ये फिरण्यात त्यांची दुपार कशी निघून गेली त्यांचं त्यांनाच कळलं नाही. ऐश्वर्या आणि हिमांशीने तर संपूर्ण महिन्याची शॉपिंग करून घेतली. सगळे परतीच्या प्रवासाला निघणार तोच कार्तिकचा फोन वाजला. मिथिलाचा फोन पाहून त्याला जरा आश्चर्यच वाटलं.

"हॅलो..."

"हॅलो कार्तिक. मिथिला बोलतेय."

"हा बोल ना. काय झालं?"

“कुठे आहेत तुम्ही?”

“आम्ही बिग बाजार ला आलो होतो. आता जातोय परत रूम वर...”

“बस पकडली का तुम्ही?”

“नाही. आता बस स्टॉप वरच जातोय...”

“थांबा. आम्ही सुद्धा इकडेच आहोत. भेटा. काहीतरी ठरवायचय...”

“ठीक आहे तुम्ही कुठे आहात आत्ता?”

“आम्ही सुद्धा बिग बाजार च्या जवळच आहोत. ते कैलाश रेस्टॉरंट दिसतंय...”

“हो. ठीक आहे येतो.”

ते सगळे कैलाशच्या जवळ आले तर मिथिला, अक्षय, सुजित, रश्मी असा त्यांचा सगळा ग्रुपच तिथे होता. आणि

त्यांनी कोवलम बीच वर जायचा प्लान बनवला होता. अक्षयचं कुणी ऐकणार नाही आणि रश्मी विराजस एकमेकांशी बोलत नव्हते म्हणून मग मिथिलानेच निखिल विराजसला सगळा प्लॅन सांगितला. परवानगी नसताना बीचवर जाणं रोहितला पटत नव्हतं पण मग सगळेच तयार झाल्याने त्याचासुद्धा नाईलाज झाला.

निखिलने ते आधी राहिलेल्या हॉटेल मध्ये फोन करून चार रूम बुक केल्या तो पर्यंत अक्षय आणि सुजित त्यांच्या ग्रुपसाठी आणि सिद्धेश आणि गौरव त्यांच्या ग्रुपसाठी हार्ड ड्रिंक्स घेऊन आले.

सगळे एकत्र निघालेले खरे पण अक्षय आणि विराजसला एकमेकांपासून दूर ठेवणं सगळ्यांसाठी खूप मोठं आव्हान होतं. कारण दोघांमध्येही मतभेद होते आणि दोन पेग पोटात गेल्यानंतर त्या मतभेदांचं कशात रूपांतर होईल कोणीही सांगू शकत नव्हतं.

कोवलमला गेल्यावर सगळे जण आपापल्या ग्रुप बरोबर बीचवर फिरायला गेले होते. त्यांच्या हॉटेल बीच जवळच होता. त्यामुळे उशीर झाला तरी काही चिंता नव्हती. रात्री नऊ च्या सुमारास विराजसचा ग्रुप हॉटेल वर आला. त्यांच्या ग्रुप साठी त्यांनी दोन रूम घेतल्या होत्या खऱ्या पण ते सगळे एकाच रूम मध्ये होते. सगळं आवरून विराजस आणि निखिल बाहेर बाल्कनी मध्ये उभे होते तेवढ्यात खालून रश्मीचा ग्रुप आला. रश्मीने विराजसकडे पाहिलं तर विराजसने सरळ तोंड विरुद्ध दिशेला फिरवलं आणि तो रूम मध्ये गेला.

रात्री रश्मीच्या ग्रुप बरोबर बसायची कोणाचीच इच्छा नव्हती खरं तर पण आता एकत्र आलोच आहोत म्हणून मग सगळे जण त्या चार रुमपैकी मोठ्या असलेल्या रूममध्ये जमले. हळू हळू मैफिल रंगात येत होती. एका बाजूला विराजसचा ग्रुप आणि एका बाजूला रश्मीचा ग्रुप दोघांचीही चांगलीच जुगलबंदी चालू होती. थोड्या वेळाने विराजसला घरून फोन आला म्हणून तो बाहेर गच्चीवर गेला. फोनवर

बोलत असताना त्याच लक्ष गेलं तर गच्चीच्या एका कोपऱ्यात अक्षय आणि रश्मी बसले होते. त्याने ते पाहिलं आणि मग तिथे आणखी न थांबता तो तडक खाली निघून गेला. रश्मीने त्याला आवाज दिला पण त्याने काहीच उत्तर दिलं नाही. तो पुन्हा सगळ्यांसोबत जाऊन बसला. पण त्याच्या चेहऱ्यावरून त्याचा मूड उतरल्याच निखिल आणि रोहितला बरोबर कळलं. आधीच ठिणगी पेटलेली आहे तिचा भडका व्हायला नको म्हणून मग दोघांनीही जबरदस्तीने त्याला त्यांच्या खोलीत नेलं आणि मग हळूहळू बाकीचेसुद्धा खोलीत येऊन बसले.

सकाळी नेहमीप्रमाणे विराजसला जाग आली. बाकीचे सगळे साखर झोपेतच होते. आता उठलोच आहोत तर जरा बाहेर फिरून येऊ असा विचार करून विराजस बीचवर जायला निघाला. तो बीचवर पोहोचला तर रश्मी आणि मिथिला दोघी जणी तिथे सकाळी सकाळी नारळपाणी पित उभ्या होत्या. त्यांना पाहून विराजसला एकदम हसायलाच आलं.

“काय झालं? एवढा का हसतोय?” मिथिलाचे तोंडातून स्ट्रॉ काढून विचारलं.

“हँगओव्हर नंतर उतारा म्हणून लिंबू सरबत पितात हे माहीत होतं. नारळपाणी प्यायलेलं पहिल्यांदाच बघतोय.” विराजस हसतंच म्हणाला.

“ए. उतारा वगैरे काही नाही हा...आम्हाला काय ऐवढी चढली नव्हतीच...”

“ते मला कसं माहीत असणार. नंतर मी कुठे होतो ना पाहायला.” विराजस रश्मीकडे एक तिरपा कटाक्ष टाकत म्हणाला.

“हो हो...कळतात हा टोमणे.” रश्मी लटक्या रागाने म्हणाली.

“पण मी कुठे टोमणा मारला. मी आपलं सहज...”

“पुरे. नाहीतर सकाळी सकाळीच भांडायला लागाल.” मिथिला विराजसला मध्येच थांबवत म्हणाली.

“हो ना. काही लोक तर उगाचच भाव खातात. लगेच रागावतात. आणि...” रश्मी पुढे काही बोलणार तोच मिथिलाने तिचं तोंड दाबलं.

“निघायचं का आपण?”

“मी थांबेन अजून थोडावेळ...तुम्ही जा जायचं तर.”

“थांबुया ना थोडा वेळ...किती मस्त वारा येतोय...” रश्मी हात पसरवत म्हणाली.

“तुम्ही घ्या मग वारा... मी जाते. बाकीच्यांना उठवते. नाही तर परत उशीर व्हायचा.” एवढं म्हणून मिथिला निघाली सुध्दा. निघताना रश्मीकडे बघून तिने डोळे मिचकवले आणि गालातल्या गालात हसत ती हॉटेलकडे जायला निघाली.

थोडावेळ तिथे निरव शांतता पसरली. शेवटी ते असह्य झाल्याने रश्मीनेच त्या शांततेचा भंग केला.

“विराजस....”

विराजसने तोंडातून एक शब्दही न काढता अगदी मठ्ठपणे तिच्याकडे पाहिलं.

“सॉरी...”

“काय म्हणालीस...?” विराजसने आश्चर्याने विचारलं.

“सॉरी म्हणलं मी...”

“यु शुड बी...”विराजस हात उंचावत म्हणाला.

“अरे आधीच रविवारी अँलिपीला अक्षय सोबत भांडण झालं होतं. त्यात तो सोमवारी पण डोकं खात होता सारखा. म्हणून मग माझा मूड चांगला नव्हता. त्यात तुम्ही...”

“अच्छा... म्हणजे तू दुसऱ्यांचा राग माझ्यावर काढलास तर...?”

“अगदीच तसं नाही. पण तो निघाला...”

“का? अक्षय वर काढायची भीती वाटते...? की काढायचा नाहीये. ?”

“भीती वगैरे नाहीये रे. त्याच्या नादी कोण लागेल. तुला माहितीये ना कसा आहे तो?”

“चांगलंच... म्हणून तर लांब राहतो ना.”

“हे चिडणं ना जरा कमी करत जा...” विराजस रश्मीच्या डोळ्यात पाहून म्हणाला.

“वाह...पहा कोण बोलतंय.... स्वतःकडे पाहिलंस का? तू किती चिडतोस ते? मी बोलले नसते तर तू बोललाच नसता कधी..”

“तो स्वभाव आहे माझा. आणि तो बदलणं कठीण आहे...”

“म्हणजे काय मीच नेहमी असं तुझ्या मागे यायचं का?”

“नेहमी नाही. हल्ली सहसा मी जास्त नाही चिडत. संयम ठेवायचा प्रयत्न करतो. हा जर माझी काही चूक नसेल आणि विनाकारण कुणी माझ्या वाकड्यात शिरलं तर मग त्याला मी काही करू शकत नाही. माझीच चूक असेल आणि

तरीही जर मी चिडलो तर मग राग गेल्यावर मी माफी मागेन हे ही नक्की...”

“बापरे...खूप कॉम्प्लिकेएड आहेस रे तू...तुझी कोणती डिक्शनरी आहे ज्याने मी तुला समजू शकेन...”

“सहवास ही विराजस ची डिक्शनरी आहे मॅडम. तुला हिमनग माहितीये? त्याचा फक्त १/८ भाग आपल्याला दिसतो. मी काहीसा तसा आहे.... पण कोणी तर धडक दिली तर ७/८ भाग खूप नुकसान करू शकतो. टायटॅनिक आहेच उदाहरण म्हणून...” विराजस हसतच म्हणाला.

“चल आता आपल्याला निघायला हवं...नाही तर उशीर व्हायचा...”

“हो निघुया....”

विराजस बरोबरचा अबोला संपला या समाधानातच रश्मी त्याच्या मागे चालू लागली.

****************************************

# 3

त्यानंतर रश्मी आणि विराजसच फोनवरचं बोलणंवाढत गेलं. सकाळच्या गुडमॉर्निंगपासून ते रात्रीच्या गुडनाईटपर्यंत. मधल्या वेळात ते एकत्रच असायचे. त्यांच्यात वाढत चाललेली जवळीक अक्षयलाही समजत होती. पण विराजससमोर तो काही बोलू शकत नव्हता. कारण विराजसशी वैर घेणं म्हणजे अक्षयचा त्याचा स्वतःचा ग्रुप सोडून बाकी सगळया क्लासची वैर हे त्याला कळून चुकलं होतं. विराजस मात्र मनात काहीही किंतु परंतु न ठेवता त्याच्याशी अगदी मनमोकळेपणाने बोलायचा.

“विराजस.. नेक्स्ट ट्रिप कुठे..” त्याच्या क्लास मधल्या संजनाने विराजसला बुधवारी सकाळी सकाळीच विचारलं.

' अरे हो.. पुढचं ठरवायला हवं. ' विराजस स्वतःशीच म्हणाला.

“अजून काही ठरवलं नाहीये ग...गुगलबाबांना शरण जावं लागणार..”

“मला सांग हा यावेळी नक्की.. मी येणार आहे..”

“हो. सांगतो नक्की. आजचा दिवस दे मला.”

संजनाशी बोलून झाल्यावर विराजसने लगेच निखिलला विचारलं.

"तुला तर गाव घेऊन जायचं असेल ना परत..” निखिल हसत म्हणाला.

“अरे आता सगळे तयार असतात तर नाही कसं म्हणायचं ना..”

“तू ना धन्य आहेस. बघ आता कोणतं ठिकाण सापडतं का.. मी पण शोधतो.”

विराजस रश्मीला बरोबर घेऊन गुगलबाबाला शरण गेला. बराच वेळ आरती बोलल्यानंतर शेवटी गुगलबाबा

प्रसन्न झाला आणि त्याला हवं होतं तसं ठिकाण त्यांना मिळालं.

'वॅगेमोन'.. मुन्नारच्या आधी असलेलं आणखी एक थंड हवेचे ठिकाण. विराजसने वॅगेमोननंतर पेरिआर नॅशनल पार्कचा सुद्धा प्लॅन बनवला पण शेवटी सर्वानुमते फक्त वॅगेमोन निश्चित झालं. मग विराजसने पटापट फोन करून बस आणि हॉटेल बुक केलं. हॉटेल म्हणण्यापेक्षा ते एक कॉटेजच होतं आणि पूर्ण कॉटेजमध्ये त्याच्याशिवाय दुसरं कोणीही असणार नव्हतं.

वॅगेमोन थोडं लांब होतं म्हणून सगळे शुक्रवारी रात्रीच निघाले. त्यांचा या ट्रिपचा ड्रायव्हर एकदम जॉली होता. मस्तपैकी साऊथ सिनेमांची गाणी मोठ्याने वाजवत गाडी चालवत होता. सगळ्यांनी सुरुवातीला झोपायचा प्रयत्न केला पण झोप येत नाही म्हटल्यावर सगळ्यांनी रात्री दोन अडीच वाजता गाडीमध्येच नाचायला सुरुवात केली. ड्रायव्हर

मध्येच सिगारेट पिण्यासाठी बस थांबवायचा. त्याच्या पाठोपाठ सगळेच बाहेर उतरायचे. असं करता करता शेवटी ते वॅगेमोनला पोचले. त्यांनी तिथे पोहोचल्यावर त्या घराच्या केअरटेकरला फोन केला तर त्याने त्यांना पुढचे दोन तीन तास तिथेच राहण्याचा सल्ला दिला. कारण ते जिथे थांबले होते तिथपासून ते त्या कॉटेजपर्यंतचा रस्ता थोडा बिकट होता. शिवाय त्या रस्त्यात एकही दिवा नव्हता. त्यामुळे धोका पत्करण्यापेक्षा त्यांनी सगळ्यांनी तिथेच थांबणं पसंत केलं. सगळे एका पाठोपाठ खाली उतरले. बाहेर कडाक्याची थंडी पडली होती. गार वारा अंगाला झोंबत होता. त्या थंडीमुळे त्यांच्यातले अर्धेजण परत गाडीत जाऊन बसले.

विराजस, निखिल आणि सुजित तिघे जण तिथेच फेरफटका मारायला म्हणून निघाले. थोडं चालल्यावर निखिलच्या मनात काय आलं कोणास ठाऊक.. ज्या थंडीमध्ये विराजस जॅकेट घालूनही कुडकुडत होता त्या थंडीमध्ये निखिल जॅकेट आणि शर्ट काढून तो झोंबणारा

वारा उघड्या अंगावर झेलत कड्याच्या टोकाला उभा होता. विराजसने त्याला एक दोन वेळा हाक मारली पण त्याने काही लक्ष दिलं नाही. मग विराजस आणि सुजित तिथेच सिगरेट ओढत बसले. थोड्यावेळाने निघे परतले तर सर्वजण गाडीत जाऊन झोपले होते. थोडा वेळआराम करावा म्हणून मग विराजस, निखिल आणि सुजितसुद्धा थोडावेळ डोळे मिटून बसले आणि कधी त्यांचा डोळा लागला त्यांचं त्यांनाही कळलं नाही.

सकाळी गाडीच्या धक्क्याने त्यांना जाग आली. डोळे उघडून बघतात तर त्यांची गाडी त्यांच्या कॉटेजच्या बाहेर उभी होती. सगळे जण पटापट सामन घेऊन रूम मध्ये शिरले. इथे पुन्हा विराजसचा ग्रुप एका रूम मध्ये आणि रश्मीचा ग्रुप एका रूम मध्ये. तरी रश्मी मध्ये मध्ये त्यांच्या रूम मध्ये यायचीच.

सकाळी साधारण नऊ वाजता त्या कॉलेजच्या मालकाने विराजसला फोन केला. त्यांच्या ऑफ रोड ड्राईव्ह साठी त्यांच्या कार्स बाहेर आल्या होत्या. पटापट नाश्ता करून

सगळे बाहेर पडले. इथे सुद्धा पुन्हा ग्रुप वेगळे झालेच हे काही वेगळं सांगायला नको.

ऑफ रोड ड्राईव्ह ला तर त्यांना खूप मजा आली. आता पर्यंत सगळे जण फक्त घाट मार्गानेच डोंगरावर चढले होते. जीपने आडवाटेने डोंगरावर चढण्यात एक वेगळीच गम्मत होती. जीप मधून उतरले की रश्मी आणि विराजस एकत्र यायचे. जायच्या वेळेला रश्मी तिच्या ग्रुप बरोबर आणि विराजस त्याच्या ग्रुप बरोबर.

बराच वेळ फिरून झाल्यावर मग त्या जीप ठरलेल्या ठिकाणी पुन्हा येऊन थांबल्या. तिथून दुपारचं जेवण करून ते पुढच्या ठिकाणी जाणार होते. त्यांनी आजूबाजूच्या दोन तीन हॉटेलमध्ये जाऊन पाहिलं पण त्यांना खास असं काही आवडलं नाही. शेवटी नाईलाज म्हणून ते एका हॉटेलमध्ये बसले. वेटरने बिर्याणी आणून पुढ्यात ठेवताच विराजसने नाक मुरडलं. केरळमध्ये असल्यामुळे ती बिर्याणी नारळाच्या तेलात बनवली होती आणि विराजसला नारळाच्या तेलात बनवलेल्या केळा वेफर्स चा सुद्धा

तिटकारा. कसेबसे त्याने घशाखाली एक दोन घास उतरवले आणि बाजूच्याच एका दुकानातून वेफर्स खाऊन तात्पुरती का होईना भूक भागवली.

एक एक करून सगळे जण जमल्यावर मग ते तिथून जवळच असलेल्या एका छोट्या टेकडीवर गेले. तिकडचा निसर्ग हा अगदी वाखाणण्याजोगा होता. ती टेकडी तीन बाजूनी पाण्याने वेढलेली होती. काही जण त्या पाण्यात दगड फेकून चकत्या बनवण्याचा प्रयत्न करत होते तर काही स्वतःचे फोटो काढून घेण्यात मग्न होते. हळूहळू त्या चकत्याच्या खेळाने स्पर्धेचं रूप घेतलं. जे खेळत नव्हते ते बाकीच्यांना प्रोत्साहन देत होते. खेळता खेळता संध्याकाळ कधी झाली कोणालाच समजलं नाही. हवेत गारावाही वाढला होता. ते निघाली तेव्हा अंधार पडायला सुरुवात झाली होती.

त्यांच्या ड्रायव्हरने त्यांना त्यांच्या रात्रीच्या वास्तव्याच्या ठिकाणी आणलं. हे कॉटेज त्यांच्या आधीच्या कॉटेजपेक्षा बरंच मोठं होतं. आजूबाजूला साधारण शंभर दोनशे

मीटरवर तरी दुसरं कोणीच दिसत नव्हतं. त्यांच्या ड्रायव्हरने त्यांना सोडलं आणि तिकडे असलेल्या केअरटेकर सोबत तो त्यांच्या रात्रीच्या जेवणाची सोय करण्यासाठी गेला.

इकडे सगळे जण आपापल्या रूममध्ये आराम करत बसले होते. थंडी असल्यामुळे सगळेजण एकाच बेडवर बसले होते. थोडावेळ आराम करून साधारण आठ वाजता सगळे खाली आले. आले म्हणण्यापेक्षा विराजसने सगळ्यांना खाली आणलं. खाली असलेल्या मोकळ्या जागेवर रात्रीच्या शेकोटीची व्यवस्था करण्यात आली होती.

हळूहळू सगळे जमले आणि मग प्रत्येक ग्रुपच्या बार टेंडरने स्वतःची जबाबदारी घ्यायला सुरुवात केली. फक्त विराजसच्या ग्रुप मध्ये असं काही नसायचं. प्रत्येक जण स्वतःची ड्रिंक स्वतःच बनवायचा. विराजसने त्याचा ग्लास घेतला आणि एक सिगारेट पेटवून तो तिथून थोडा लांब असलेल्या धक्क्याला टेकून उभा राहिला. तो लांब जरी असला तरी कोण काय बोलतंय हे त्याला त्या गोंगाटातही ऐकू येत होतं. मध्येच अक्षय आणि रश्मीची

चाललेली मस्ती, मध्येच त्यांचं एकत्र येऊन बोलणं सगळं विराजस शांतपणे पाहत होता.

थोड्या वेळाने कार्तिक आणि मिथिला विराजसच्या बाजूला येऊन उभे राहिले.

"विराजस.. सिगरेट आहे का?"

“हो.. आहे ना.. ही घे..” असं म्हणून विराजसने अख्ख बॉक्सच कार्तिकला दिलं.

“मग कधी विचारतोय रश्मीला?” कार्तिक सिगरेट पेटवत म्हणाला.

“काय?"

“तेच जे तुझ्या मनात चाललंय..”

“काय चाललंय माझ्या मनात.. एवढया लवकर चढली की काय तुला..” विराजस हसत म्हणाला.

“विराजस.. मुर्ख नाहीये मी.. जे काय चाललंय ना तुझ्या मनात ते सगळं दिसतंय तुझ्या डोळ्यात. आताही अक्षय

आणि रश्मीला एकत्र पाहून तुला जे वाईट वाटतंय ना तेही कळतंय बरं का..”

“जाऊ दे ना यार. कशाला उगाच जखमेवर मीठ चोळतोय. ती खुश आहे ना त्याच्याबरोबर.. मग ठीक आहे ना..”.

“आणि तुला कोणी सांगितलं की ती खुश आहे त्याच्या बरोबर वगैरे.” मिथिला मध्येच विराजसला थांबवत म्हणाली.

“कोणी सांगायला कशाला हवं.. दिसतंय ना..”

“दिसतं तसं नसतं विराजस.. एकदा बोलून तर बघ..”

"नको ग.. राहू दे.. तसंही मला या सगळ्यात पडायचं नाहीये..”

"पडू नकोस पण निदान तुझ्या मनात काय आहे ते तरी सांग तिला..”

विराजस काही बोलणार तितक्यात रश्मी तिथे आली.

“काय एकटे एकटे गप्पा मारत उभे आहात रे..”

"तू बिझी होतीस ना." विराजस एकदम म्हणाला.

रश्मीने चमकून विराजसकडे पाहिलं.

"अगं म्हणजे तू अक्षय सोबत बोलत होतीस ना. आणि विराजस इथे एकटाच शांतपणे उभा होता. म्हणून मी आणि कार्तिक त्याला त्रास द्यायला आहे.." मिथिलाने लगेच सावरलं.

"अच्छा. अगं मी त्या अक्षयसोबत जरा सॉर्ट आऊट करत होती. एकत्र राहतो तर कशाला उगाच भांडण ना.."

"मिटलं का मग. एवढी हसत आली म्हणजे मिटलंच असेल. चांगलंय."

"नाही मिटलं नाही.. आमच्यातलं भांडण काही मिटणार नाही. ते चालूच असतं." एवढं बोलून रश्मी पुन्हा निघून गेली.

थोड्या वेळाने ती परत आली तेव्हा तिच्या हातात व्हिस्कीचा ग्लास होता. ती येताच कार्तिक ने मिथिलाला खूण

केली आणि मग काहीतरी कारण काढून ते दोघं तिथून सटकले.

बराच वेळ रश्मी आणि विराजस बोलत उभे होते. मध्येच ते ग्लास रिफिल करायला टेबलवर जायचे आणि मग परत होते तिथे जाऊन उभे राहायचे.

साधारण साडे दहा अकरा वाजता निखिलने त्यांना थोडं बळजबरीनेच नेऊन जेवायला वाढलं. विराजस व्यवस्थित होता पण रश्मीला थोडी जास्तच झाली होती. कशीबशी तिने एक भाकरी संपवली. मग विराजसने तिला तिच्या रूममध्ये नेऊन सोडलं. तिने रूममध्ये जाताच बिछान्यावर स्वतःला झोकून दिलं. तिला तिथे सोडून विराजस जायला निघाला एवढ्यात तिने विराजसला हाक मारून तिच्या बाजूला बसण्यासाठी आग्रह केला . पण रूम मध्ये दुसरं कोणी नसताना आणि रश्मी प्यायलेली असताना तिच्यासोबत

एकटच रूम मध्ये थांबणं विराजसला पटत नव्हतं. तिची समजूत काढून तो लगेच रूमच्या बाहेर पडला आणि खाली त्याचा ग्रुप बसला होता तिथे जाऊन बसला.

विराजस, निखिल, कार्तिक, रोहित, सिद्धेश, गौरव, ऐश्वर्या, हिमांशी आणि सुजित सगळे जण बराच वेळ बोलत बसले होते. बराच वेळ गौरव बडबड करत होता म्हणून मग शेवटी ऐश्वर्या त्याला घेऊन त्यांच्या रूम मध्ये गेली. हळूहळू एकेकाची विकेट पडत गेली आणि शेवटी तिथे राहिली ती वाऱ्यावर फरफरणारी शेकोटी.

दुसऱ्या दिवशी सकाळी नेहमीप्रमाणे विराजसला लवकर जाग आली. हळूच दरवाजा उघडून तो बाल्कनीमध्ये आला. आजूबाजूला सहज पाहताना त्याच लक्ष त्या शेकोटीच्या इथे गेलं. रात्री सुटलेल्या वाऱ्यामुळे तिथे असलेल्या खुर्च्या इतस्ततः पसरल्या होत्या. त्यातली एक खुर्ची तर शेकोटी

मध्ये पडून अर्धी वितळून गेली होती. केअरटेकर यायच्या आधी त्या खुर्चीची विल्हेवाट लावणं आवश्यक होतं. मग विराजसने कोणी उठायची वाट न बघता एकट्यानेच जाऊन ती अर्धवट जळलेली खुर्ची उचलून बाजूच्याच नाल्यात फेकून दिली.

हळूहळू एक एक करून सगळे उठले. पटापट आवरून सगळे तयार झाले. त्यांचा बस ड्रायव्हर सुद्धा एकदम गॉगल वगैरे घालून रेडी होता. केअरटेकर येताच राहिलेले पैसे देऊन विराजसने सगळ्यांना बस मध्ये बसायला सांगितलं.

यावेळी मात्र जाताना रश्मी विराजसच्या बाजूला बसली. रोहितने हळूच विराजसकडे पाहून डोळा मिचकवला आणि मग बाकीचेसुद्धा त्यांना चिडवण्यात सामील झाले.

त्यांच्या ट्रेनिंगचा शेवटचा दिवस हळूहळू जवळ येत होता. अनायसे शुक्रवारी सुट्टी असल्यामुळे त्यांना ट्रिपसाठी तीन दिवस मिळत होते. शेवटची ट्रीप थोडी मोठी आणि लांब करू असं सगळ्यांचं मत होतं. तसं विराजसच्या मनात

ट्रीपच ठिकाण ठरलं होतं. फक्त हॉटेल, बस वगैरे सगळं बाकी होतं.

'कोडाइकनाल'. केरळमधलं सर्वात सुंदर असं थंड हवेचे ठिकाण. उंचच उंच डोंगर आणि मोठमोठ्या वृक्षांमधून जाणारे रस्ते. विराजसने तीन चार ठिकाणी फोन करून शेवटी एक कॉटेज निवडलं. कॉटेज असलं की वेळेचं काही बंधन नसतं. कितीही वाजेपर्यंत गाणी वाजवली तरी कोणी बंद करा असं सांगायला येत नाही. त्यामुळे विराजसनेच मुद्दामहुन हॉटेल न बघता कॉटेज बुक केलं. कधी नव्हे ते त्यांच्या बॅचचे बरेच जण यावेळी त्यांच्यासोबत जायला तयार होते. रश्मीने सुरुवातीला का. कू. केलं पण विराजसने सगळ्याना घेऊन जायचं ठरवलं. त्याने त्यानुसार मोठी बस बुक केली.

बुधवारी संध्याकाळी ऑफिस सुटल्यावर विराजसचा पूर्ण ग्रुप आणि रश्मी असे सगळे जण जवळच असलेल्या डोमिनोज मध्ये पिझ्झा खायला गेले.

“काय यार. हल्ली दिवस संपता संपत नाही.” विराजस पिझ्झाचा तुकडा तोंडात टाकता टाकता म्हणाला.

"काय बोलतोस.. आम्हाला वाटलं हल्ली तुला वेळ कसा जातो हेही कळत नसेल.” निखिल उगाच खेचायची म्हणून रश्मीकडे पाहून हसला. आणि का कोण जाणे रश्मी लाजून लालेलाल झाली. ते पाहून सगळेच हसत सुटले.

"अरे असं काही नाहीये.. तुम्हाला नाही का बोअर होत दिवसभरात..”

“आमची गोष्ट वेगळी रे. तुझी तर एंटरटेनमेंट चालू असते ना दिवसभर..”

"जर एंटरटेनमेंट असती तर मी म्हणालो असतो का की बोअर होतंय म्हणून..”

"अच्छा म्हणजे रश्मी बरोबर तुला बोअर होतं असं म्हणायचंय तुला.. रश्मी बघ हा काय बोलतोय.."

"नाही म्हणजे अगदीच तसं नाही. च्या आयला. येऊन जाऊन कसलाही संबंध तुम्ही तिच्याशी काय जोडताय.."

विराजस थोडी सारवासारव करणार तेवढ्यात रश्मीने त्याला नजरेनेच गप्प राहायला सांगितलं. आणि कधीही कुणाचंही न ऐकणारा विराजस चक्क गप्प बसला. इतर सर्वांच्या नजरेतून ते सुटलं असेल तर मिथिलाने मात्र ते बरोबर हेरलं. पण तिने त्याची वाच्यता केली नाही. रात्री रूम वर गेल्यावर मिथिलाने पुन्हा विषय काढला.

"काय मग रश्मी, तुझ्या मनात तर आनंदाच्या उकळ्या फुटल्या असतील ना..."

"म्हणजे. ? कशाबद्दल बोलतेय तू?"

"आता उगाच नाटकी करू नकोस हा. निखिल जे म्हणत होता त्याबद्दल बोलतेय मी.."

"अच्छा. अगं तो तर मस्करी करत होता."

"हो पण तुझ्या चेहऱ्यावरचे भाव काहीतरी वेगळंच सांगत होते. विराजसला तुझ्या वरून चिडवल्यामुळे तुला होणारा आनंद तुझ्या चेहऱ्यावर दिसत होता."

"चल गं. तुझं आपलं काहीतरीच."

"काहीतरीच नाही हा. आणि बघ ना. कुणाच्याही सध्या 'अरे रे' ला 'का रे' करणारा विराजस तुझ्या एका इशाऱ्यावर चक्क गप्प बसला. हे तर तू अमान्य करू शकत नाहीस ना."

"ते मी त्याला विषय वाढू नये म्हणून गप्प राहायला सांगितलं".

"रश्मी यार. माझ्याशी खोटं बोलशील पण निदान स्वतःशीतरी खोटं बोलू नकोस. दोघांच्याही मनात असताना केवळ व्यक्त होता येत नाही म्हणून तुम्ही तुमच्या एकमेकांबद्दल असणाऱ्या भावना मनात साठवून इतरांसमोर सर्वकाही नीट असल्याचं अजून किती दिवस भासवणार आहात?"

“मिथिला.. चिल..”

“हे बघ. आता फक्त दोन तीन आठवडे उरलेत आपल्या ट्रेनिंगचे. त्यानंतर कुणीही सोबत नसणार. तू, मी, विराजस वगैरे मुंबई मध्ये असूनही एकत्र असू की नाही हे आपल्याला माहीत नाही. त्यामुळे आता जर तू काही ठरवलं नाहीस तर नंतर हातचं गमावून बसशील.”

"अगं पण त्याच्या मनात काय आहे हे सुद्धा मला माहित नाही. आणि मला भावनेच्या भरात वाहवत नाही जायचंय.”

"अग पण तुम्ही जर एकमेकांशी नीट बोललाच नाहीत तर तुम्हाला कसं कळणार एकमेकांच्या मनातलं. आणि हे बघ. एकदा तुमच्या दोघांचं म्हणणं क्लिअर झालं की मग पुढचं पुढे बघू. पण वेळेवर बोलल्यामुळे हातचं काहीतरी गमावल्याच दुःख तरी नंतर सांभाळत बसावं लागणार नाही ना.”

"ठीक आहे. बोलेन मी वेळ पाहून.”

"बघ बाई. शेवटी तुझं आयुष्य. तुला तुझ्या आयुष्यात काय हवंय तुला ठाऊक. मी आपलं तुझ्या मनातलं थोडं फार कळलं म्हणून बोलले."

"बरं बाईसाहेब. विचार करेन हा मी.. आता झोपुया का आपण. एक तर उद्या रात्री निघायचंय. थोडा आराम केलेला बरा."

"हो. गुड नाईट"

रश्मी डोळे बंद करून पडली खरी पण झोप काही येत नव्हती. सतत मिथिलाच बोलणं तिला आठवत होतं. शेवटी या ट्रिपच्या वेळी विराजसशी बोलायचंच असा निर्धार करून ती निद्रादेवीच्या आधीन झाली.

*********************************************

गुरुवारचा दिवस कसा गेला त्यांना कळलंच नाही. कारण सगळे संध्याकाळी निघायचंय याच विचारात होते. जरी

थोडंफार कामावर लक्ष द्यायचं ठरवलं तरीसुद्धा त्यांच्या डोक्यात कोडाइकनालच यायचं आणि मग हाती घेतलेलं काम सोडून ते गुगलवर कोडाइकनालचे फोटो उघडून बसायचे.

दिवस संपला तरी एरवी इथे तिथे भटकणारे सगळे जण आज पहिल्यांदाच होस्टेलवर पळाले. पटापट पॅकिंग करून आणि थोडंफार खाऊन सगळे खाली रस्त्यावर येऊन बसची वाट पाहत उभे होते. नेहमीप्रमाणे बस पहिले मुलींच्या हॉस्टेलला आणि मग तिथून मुलांच्या हॉस्टेलला येणार होती. बस आल्यावर सगळ्या मुलींनी पटापट आपल्या ग्रुपसाठी जागा अडवून ठेवल्या. कारण प्रवास लांबचा होता. जवळपास बारा तासांचा. बस मुलांच्या हॉस्टेलला आली. मुलंसुद्धा तयारच होती. विराजसच्या ग्रुप ने पहिले सर्वांना चढुन दिलं आणि ते शेवटी चढले. अपेक्षेप्रमाणे त्यांना शेवटची पूर्ण मोठी सीट मिळाली. बस मोठी होती त्यामुळे शेवटची सीट असूनसुद्धा धक्के जाणवायची शक्यता कमीच होती. रश्मी त्या सीटपासून दोन

सीट सोडून बसली होती आणि तिच्याबाजूला दुसऱ्याच ग्रुपची एक मुलगी होती. मिथिलाने काहीतरी चलाखी करून तिला तिच्या ग्रुप बरोबर पूढे पाठवून दिलं. ती खाली उतरलेला विराजस कधी वरती येतोय याची वाट पाहत होती. विराजस आला तो बस सुटायच्या वेळी. विराजस त्याच्या सीटवर जाऊन पाहतो तर तिथे मिथिला त्याच्या सीटवर कार्तिकच्या बाजूला बसली होती. विराजस रश्मीच्या बाजूला बसायला तयारच नव्हता कारण त्याला त्याच्या ग्रुपला चिडवण्यासाठी आणखी कारणं द्यायची नव्हती पण कार्तिकने सांगितल्यावर त्याचा नाईलाज झाला. झालं.. मिथिलाच्या मनासारखं झालं. आता पुढे सगळी मदार रश्मीवर होती.

बस सुरू झाली तशी पुढे बसलेल्या संजयने एकदम उडती गाणी लावायला सुरुवात केली. त्याला तामिळ भाषा येत होती त्यामुळे ड्रायव्हरशी काही बोलायचं असेल तर तोच बोलायचा. इतर वेळी ड्रायव्हरसोबत असणाऱ्या विराजसला या ट्रीपला मात्र थोडी मज्जा करता येणार होती.

संजयने गाणी लावताच सगळ्यांनी ताल धरला आणि आरडाओरड करून संपूर्ण बस दणाणून सोडली. रात्री एक दीड वाजेपर्यंत सगळे नाचत होते. त्यात रश्मीला नाचायची भारी हौस. विराजस आधीच जागेवर येऊन बसला होता. रश्मी आली तसा तो उठला आणि त्याने रश्मीला आत बसवलं. कारण बाहेरच्या सीटचं बाजूचं हँडल तुटलं होतं.

कोडाइकनालचा रस्ता म्हणजे वळणावळणाचा. बाहेर बसलेला माणूस वळणावर खाली पडेल याची भीती. तसाही विराजसला प्रवासात झोप लागायची नाही. कॉलेजमध्ये असताना विराजसचा कॉलेजचा ग्रुप मनालीला गेला होता. मनालीचा पूर्ण प्रवास त्यांनी रात्रीच केला होता. सगळे झोपून जायचे पण विराजस आणि त्याचा मित्र सुशांत मात्र रात्रभर ड्रायव्हर सोबत जागे राहायचे. त्यामुळे विराजस बाहेर बसला आणि त्याने अर्धवट पेंगलेल्या रश्मीला आत बसवलं. पुढल्या अर्ध्या तासात बस सामसूम झाली आणि विराजस कानाला हेडफोन अडकवून गाणी ऐकत बसला. रात्री हवेत गारवा वाढला तश्या सगळ्यांच्या शाली, स्वेटर बाहेर येत

होते. मध्येच बस वाला बस थांबवायचा. सिगारेटचे एक दोन झुरके मारायचा आणि मग पुन्हा प्रवास सुरु व्हायचा.

जशी सकाळ झाली तसतशी एक एक करून सगळी मंडळी जागी झाली. विराजस जागाच होता. मध्येच त्याला एखाद डुलकी लागली असेल तेवढीच. रश्मी मात्र अजूनही विराजसच्या खांद्यावर डोकं ठेवून शांत झोपली होती. सगळे उठले तसे ड्रायव्हरने बस एका छोट्या हॉटेलपाशी थांबवली. विराजसने रश्मीला सुद्धा उठवलं आणि मग सगळे जण बाहेर पडले. फ्रेश होऊन सगळे चहा पीत बसले होते. तेवढ्यात ड्रायव्हरने सांगितलं की त्यांना कोडाइकनाल नंतर आथिरापल्ली धबधब्यावर जाता येणार नाही. कारण तिकडे जायचा रास्ता आधीच अरुंद. आणि रात्रीच्या वेळी जायचं म्हणजे आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास. त्यापेक्षा नकोच. दुसरा काही पर्याय मिळतो का बघू असं म्हणून त्यांनी ड्रायव्हरला बस आधी ठरल्याप्रमाणे कोडाइकनालला न्यायला सांगितली.

कोडाइकनालला त्यांच्या कॉटेजला पोहोचेपर्यंत अकरा वाजले होते. लांबचा प्रवास असल्यामुळे सगळ्यांना थकवा जाणवत होता. थोडा वेळ आराम करावा आणि मगच बाहेर पडावं असं सगळ्यांचं मत पडलं. तसही ट्रेकिंग काही होणार नव्हती. ती त्यांना दुसऱ्याच दिवशी करावी लागणार होती. संध्याकाळी त्यांना फार फार तर आजूबाजूचा काही परिसर पाहायला मिळाला असता. कारण तिकडे अंधार फार लवकर पडायचा. सगळ्यांना रूम मिळाल्यावर त्यांनी बिछान्यावर अक्षरशः स्वतःला झोकून दिलं. विराजस आणि त्याच्या ग्रुपला वरच्या दोन रूम आणि रश्मीच्या ग्रुपला त्याच बंगल्यात खाली दोन रूम मिळाल्या. थोडावेळ विश्रांती घेऊन विराजस आणि निखिल बंगल्याच्या बाहेर असलेल्या बागेत असलेल्या झोपाळ्यावर जाऊन बसले. दुपार असली तरी हवेत गारवा जाणवत होता. त्यांच्या मागोमाग हळूहळू सगळेच उठून तयार झाले. दुपारचं जेवण अजून तयार व्हायचं होतं. त्यासाठी अजून एक तास लागेल असं त्या कॉटेजच्या मालकाने सांगितल्यावर अजून एखाद तास इथे

बसण्यापेक्षा आपण पुढे जावं , थोडं फिरून घ्यावं आणि मग कॉटेजचा मालक जेवण ते जिथे असतील तिथे पोहोचवेल असं विराजसने ठरवलं. कारण सगळे जण तयार होते तर उगाच तिथे बसून एखाद तास वाया घालवणं विराजसला पटणारं नव्हतं.

यावेळेस सुद्धा विराजस आणि रश्मी एकत्रच होते. रश्मी बाहेरच्या सीटवर बसली होती आणि विराजस खिडकी जवळच्या. येणाऱ्या प्रत्येक वळणावर विराजस तिचा हात पकडून ती खाली पडणार नाही याची काळजी घ्यायचा. वळण संपलं की पुन्हा हात सोडून द्यायचा. पण त्यांच्या आयुष्यात ह्या वळणांचंच फार महत्व होतं. वळणं काही केल्या संपत नव्हती.

कोडाइकनालचं ट्रेकिंग सोडलं तर बाकी ठिकाणं लवकरच पाहुन होतात. पर्वतरांगांमध्ये असलेल्या गुहा, नैसर्गिकरित्या तयार झालेली विवरे असं सगळं बघून झाल्यावर त्यांनी त्या कॉटेजच्या मालकाला फोन केला आणि संध्याकाळी पाच वाजता त्यांनी दुपारचं जेवण केलं. थंडी

असल्यामुळे गरमागरम भाकरी आणि चिकन या अशा सध्या जेवणावरही सगळ्यांनी ताव मारला.

जेवण झाल्यानंतर त्यांना खरंतर फिरायचं होतं पण हवेत गारवा वाढल्यामुळे त्यांना मन मारून कॉटेजकडे परतावं लागलं. त्यात संध्याकाळी ट्रॅफिक असल्यामुळे त्यांना अजून उशीर झाला.

कॉटेजवर पोहोचले तेव्हा त्या मालकाने त्यांच्या रात्रीच्या पार्टीची सोय आधीच करून ठेवली होती. मस्त पैकी गरमागरम जेवण, शेकोटी आणि सोबत डीजे. या बरोबरच सगळ्याच ग्रुपने आपापली चहापाण्याची सोय केली होतीच. जसा डीजे चालू झाला तसे रूम मध्ये असलेले सगळेजण एक एक करून बाहेर आले आणि मग सगळ्यांनी एकच कल्ला केला. रश्मी मध्येच एखादं असं गाणं लावायची की विश्रांती घेत बसलेले सुद्धा पुन्हा उठून नाचायचे.

या सगळ्या गडबडीत दहा वाजून गेले. विराजस त्याच्या रूमच्या गॅलरीत सिगरेट ओढत उभा होता. खाली एका

वाजला रश्मी, मिथिला आणि अक्षय काहीतरी बोलत उभे होते. मध्येच त्यांच्यापैकी कोणाचा तरी आवाज वाढायचा. शेवटी मग सुजितने अक्षय आणि रश्मीला खालच्या खोलीत नेऊन बसवलं. इकडे विराजसच्या तळपायाची आग मस्तकात गेली. एक तर अक्षय आणि रश्मी दोघेही प्यायले होते. आणि विराजसचा अक्षयवर अजिबात विश्वास नव्हता. फक्त ते आधी पासून एकाच ग्रुप मध्ये आहेत म्हणून विराजस काही बोलायचा नाही. विराजसची सिगरेट पिऊन झाली तरी सुद्धा त्याची खाली जायची इच्छा नव्हती. दुसरी सिगरेट पेटवायला त्याने लायटर सुद्धा आणलं नव्हतं. त्याने खालीच उभ्या असलेल्या नमितला लायटर द्यायला सांगितलं. नमितने बरंच शोधलं पण लायटर काही सापडलं नाही. शेवटी नमितने निखिलकडून सिगारेट पेटवून घेतली आणि विराजसला आणून दिली. तसा विराजस प्रत्येक वेळी सर्वांच्या उपयोगी पडायचा म्हणून त्याचा ग्रुप वगळता त्याचे बरेच मित्र झाले होते.

बराच वेळ विराजस वरती एकटाच होता. शेवटी कार्तिक आणि मिथिलाने त्याला जबरदस्तीने खाली आणून बसवलं. त्याच्या चेहऱ्यावर त्याचा मूड खराब असल्याचं स्पष्ट दिसत होतं. त्याला बऱ्याच जणांनी विचारलं देखील पण त्याने हसत वेळ मारून नेली.

थोड्या वेळाने रश्मी त्याच्या बाजूला येऊन बसली. विराजसने तिच्याकडे पाहिलंही नाही. त्याने तिला सरळ सरळ इग्नोर केलं आणि तो उठून दुसरीकडे गेला. पण रश्मी थोडीच ऐकणार होती. ती पून्हा उठून त्याच्याजवळ जाऊन उभी राहिली. विराजस तिकडून निघणार तेवढ्यात तिने त्याचा हात धरला. विराजसच्या मनात असूनही तो हात सोडवू शकला नाही.

"विराजस. काय झालंय. ? एवढा का चिडला आहेस.. ?"

"कुठे काय. काही नाही. जरा डोकं दुखतंय म्हणून एकटाच बसलो होतो."

"हे झालं लोकांना सांगायला.."

“तू कोण आहेस मग. ?” रश्मीचं वाक्य मध्येच तोडत विराजस म्हणाला.

“ते तुला माहीत असायला हवं. मी कसं सांगणार..”

“मलाही नाही माहीत..”

“हो का. तुला नाही माहीत.. बरं ठीक आहे. मग तुझ्या रागालाच सांगू देत..”

“असो...जा ना तू मजा कर ना.. कशाला उगाच त्रास करून घेतेय..”

“आणि तुला त्रास होतोय त्याचं काय?"

“माझं मी बघून घेईन. त्याची काळजी तू नको करु.”

“एवढे दिवस तूच बघून घेतोय रे.. म्हणून आज मी आलीये..”

“यार रश्मी तुझा प्रॉब्लेम काय आहे.. ?"

“हाच की तू काही धड सांगत नाही..”

“काय सांगत नाही?"

“काहीच..”

“हे बघ रश्मी. मला आवडतेस तू.. पण मला माहीत नाही मी आज तुला जे बोललोय ते परत बोलेन की नाही. कारण यामध्ये मला काहीच बरोबर वाटत नाही.”

“बरोबर वाटत नाही म्हणजे.”

“म्हणजे बघ ना...मी ठरवलं होतं की काहीही झालं तरी आता कोणत्या मुलीशी जवळीक नाही वाढवायची. कारण एकदा जो त्रास झाला तो मला परत नाही करून घ्यायचाय. तरीही मला तुझ्यासोबत राहावंसं वाटतं, तुझ्यासोबत बोलावसं वाटतं. माझं आणि अक्षयचं कीती पटतं तुला माहितीये. मी तर त्याच्याशी बोलायला सुद्धा जात नाही पण तरीसुद्धा तू त्याच्याशी जास्त बोललीस की मला राग येतो. आमचं असं काही वैयक्तिक वैर नाहीये. पण तरी.. शिवाय तुझं आयुष्य. त्यात तू कुणाशी बोलावं कुणाशी नाही हा तुझा वैयक्तिक प्रश्न आहे. मी त्यात काय बोलणार. शिवाय आता

काही दिवस शिल्लक आहेत. त्यानंतर आपण भेटू न भेटू देव जाणे.”

“पण तू एवढा विचार का करतोय?"

“का करतोय म्हणजे... मला सवय आहे ही. कधीकधी तर असं होतं ना की समोरच्याने काही विचार करायच्या आधीच मी तो काय विचार करेल याचा विचार करून मोकळा होतो.”

“पण ह्यामुळे तुलाच त्रास होणार आहे ना.”

“त्रास तर होतो. पण काय करणार ?"

“हे बघ. आपण एखाद्या गोष्टीचा जितका जास्त विचार करू ना तितकी ती गोष्ट आपल्याला जास्त त्रास देते. तुला मी आवडते ठीक आहे. हे प्रेम आहे की आकर्षण ही वेगळी गोष्ट. मलाही आवडतोस तू. कारण आपण सतत एकत्र असतो. खूप बोलतो. सगळं शेअर करतो. त्यामुळे एक प्रकारचा कम्फर्ट निर्माण झालाय आपल्यात. भविष्याची चिंता करण्यापेक्षा आपण वर्तमानात जगावं. न जाणो आपलं

भविष्य या वर्तमानात घडणाऱ्या घटनांवरच अवलंबून असेल.”

“ते आहेच ग. पण..."

“हे बघ... आता थोडेच दिवस उरलेत. तुला हे दिवस सुद्धा तुला असा दूरचा विचार करून घालवायचे आहेत की आपल्या एकमेकांबद्दलच्या ज्या भावना आहेत त्यांना न्याय मिळवून द्यायचा आहे. कारण कसं आहे. भविष्य तर खूप लांब आहे पण भविष्याचा विचार करून मला वर्तमानातले हे दिवस झाकोळून नाही टाकायचे आहेत. मला माहितीये की आपले मार्ग वेगळे आहेत पण त्याचा विचार करण्याची ही वेळ नाही. जर पुढे भेट होणारच असेल तर वसईवरून काय किंवा पनवेलवरून काय. दिवा लागतंच..”

“काय काय.. काय म्हणालीस.. ?” विराजसने हसतच विचारलं.

“ए. लेखक कवी तू आहेस. मी नाही. मला असं शब्दात मांडता येत नाही. भावना पोचल्या ना. मग बस झालं..”

विराजस एकदम खोखो हसत सुटला. बरेच दिवस त्याच्या मनावर असलेलं दडपण दूर झालं आणि कोडाइकनालच्या त्या बोचऱ्या थंडीमध्ये रश्मी त्याच्या बाहुपाशात कधी विसावली त्याचं त्यालाही कळलं नाही.

****************************************

सकाळी नेहमीप्रमाणे विराजस लवकर उठला. सगळं आवरून झाल्यावर त्याने हळूहळू सगळ्यांना हाक मारायला सुरुवात केली. आजचा दिवस त्यांच्या ट्रिपचा महत्वाचा दिवस होता . कारण आज त्यांना ट्रेकिंगला जायचं होतं . कोडाईकनालला ट्रेकिंगचे तीन महत्वाचे स्पॉट आहेत. ट्रेकिंग जरी कमी अंतराच असलं तरी चढण बऱ्यापैकी उभी आहे. मध्ये थोडा वेळ आराम घ्यावाच लागतो. बसची पार्किंग सुद्धा लांब असल्यामुळे त्यांना पहिल्यापासूनच पायपीट करावी लागली. निघताना ते ग्रुप करून निघाले होते खरे पण जसजसं अंतर कमी होत गेलं तसे सगळे ग्रुप

वेगळे झाले. एकत्र राहिला तो विराजसचा ग्रुप आणि त्याच्या ग्रुपबरोबर मिथिला आणि रश्मी . सगळे एकत्र चालत असल्यामुळे वेळ कसा जात होता त्यांनाही कळत नव्हतं. थोड्याच वेळात पहिला स्पॉट आला.

थोडावेळ विश्रांती घ्यावी म्हणून सगळे तिथे थांबले . आजूबाजूला खाण्याचे बरेच स्टॉल दिसत होते पण सध्यातरी कुणाची काही खायची इच्छा नव्हती. पाणी पिऊन आणि दोन चार फोटो काढून सगळे पुढच्या प्रवासाला लागले. बराचवेळ चालल्यावर ते डॉल्फिन नोज जवळ पोचले. डॉल्फिन नोज म्हणजे डोंगराच्याकड्यापासून थोडासा पुढे आलेला एक निमुळता भाग . एकावेळी एकच माणूस टोकाला जाऊ आणि येऊ शकेल अशी अपुरी जागा . जरासा तोल गेला तर खाली खोल दरी . ज्यांना उंचीवरून खाली बघायची भीती वाटते त्यांनी तिथे जाण्याअगोदर किमान दहा वेळा तरी विचार करावा. पण आपली सगळी पात्र अगदीच डेअरिंगबाज . त्यामुळे सगळेच टोकाला जाऊन खाली दरीच दर्शन घेऊन आले. विराजस तर

तिकडेच बाजूला बसला. सगळ्यांचं फोटोसेशन चालू होतं. फोटो काढायला कड्याच्या टोकाला गेलेली रश्मी जेव्हा त्या डॉल्फिन नोजवरून धावत आली तसा विराजस ताडकन उठला आणि रश्मीवर बरसला . अर्थात रश्मीची चूक असल्याने ती काही बोलली नाही आणि निमूटपणे तिथून बाजूला झाली. थोडा वेळ तिथे थांबून सगळे डॉल्फिन नोजच्या पुढे असलेल्या अजून एका कड्यावर गेले. इकोपॉईंट. तसं लांब उभं राहिलं तरी प्रतिध्वनी ऐकू येतोच. पण आपले पठ्ठे ऐकतात कुठे. याठिकाणी सुद्धा ते अगदी टोकाला जाऊन आले. निखिलतर त्या कड्याच्या टोकाला असलेल्या दगडावर उभा राहून फोटो काढत होता. जेव्हा तो खाली उतरला तेव्हा कुठे विराजसच्या मनावरचं दडपण दूर झालं.

साधारण चार वाजता त्यांनी परतीच्या प्रवासाला सुरुवात केली. रिमझिम रिमझिम पाऊस येत होता . सगळ्यांना कडाडून भूकही लागली होती. पण मॅगी आणि ऑम्लेटशिवाय दुसरा काही पर्याय नव्हता . आणि ते ही

त्यांना बरंच अंतर पार केल्यावर मिळवणार होतं. मजल दरमजल करत ते वर पोहोचले तेव्हा बऱ्यापैकी अंधारून आलं होतं आणि उंचावरचं ठिकाण असल्यामुळे रस्त्यावर ढगांची इतकी गर्दी झाली होती कि त्यातून वाट काढणंही कठीण जात होतं. सोबतीला पाऊस होताच . काही वेळ गेल्यावर त्यांना रस्ताच दिसेनासा झाला. सगळेच गडबडून गेले. नेटवर्कसुद्धा नव्हतं त्यामुळे गूगलमावशीची मदत घेणंही शक्य नव्हतं. सकाळी आलो तो रस्ता आणि आताच रास्ता फारच वेगळा भासत होता. शेवटी त्यांनी उलट येणाऱ्या गाड्यांच्या दिशेने चालायला सुरुवात केली. जसजसे ते पुढे आले तसा विराजसला रस्ता ओळखीचा भासू लागला आणि बरंच अंतर चालल्यावर शेवटी ते त्या भूलभुलैयामधून बाहेर आले. बाहेर बसचाही काही पत्ता नव्हता . थोडंसं शोधल्यावर त्यांना दूरवर रस्त्याच्या एका कडेला उभी असलेली त्यांची बस दिसली आणि साऱ्यांचा जीव भांड्यात पडला. हवेत गारवाही बराच वाढला होता. त्यांच्या आधी फक्त पाच सहा जण येऊन बसमध्ये बसले

होते. बाकीचे येईपर्यंत त्यांना वाट पाहणं भाग होतं. नेटवर्क नसल्यामुळे कुणाचा फोनही लागत नव्हता. साधारण तासभर गेल्यावर हळूहळू एकेक ग्रुप यायला सुरुवात झाली . सगळे जमा व्हायला साडेसात झाले आणि शेवटी एकदाची त्यांची बस निघाली.

ते निघाले खरे पण तोपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. त्यात यांची दोन तीन हत्तींएवढी बस. त्यामुळे त्यांचा ट्रॅफिक मध्ये बराच वेळ गेला. दिवसभराच्या पायपीटीमुळे सगळ्यांच्या पोटात कावळे ओरडत होते पण त्या घाटामध्ये त्यांना एकही हॉटेल दिसत नव्हतं. त्यांच्यातल्या दोन तीन जणांना ताप चढला होता. बहुदा दिवसभराची वणवण त्यांना सहन झाली नसावी. बस थेट हॉस्टेलवर न्यायची की पुढल्या कोणत्या तरी ठिकाणी यावरून त्यांची थोडीशी बाचाबाचीही झाली. काही जणांना वाटत होतं की थेट हॉस्टेल वर जावं तर काहींचं म्हणणं होतं की दोन तीन जणांसाठी त्यांनी त्यांची ट्रिप का खराब करावी. शेवटी सगळ्यांचं एकमत झालं आणि एखाद्या हॉटेल वर

थांबून थोडंस खाऊन थेट हॉस्टेलवर जायचं ठरलं. विराजसच्या ग्रुपच्या चेहऱ्यावरची नाराजी अगदी स्पष्ट दिसत होती विराजसनेच या निर्णयाला मान्यता दिल्यामुळे तेही जास्त काही बोलू शकले नाही. डोंगरदऱ्यातून बाहेर आल्यावर दिसलेल्या पहिल्याच हॉटेलमध्ये त्यांनी बस थांबवली. रात्रीचे साडेदहा झाले होते. तशी खायची कोणाचीही इच्छा नव्हती पण रात्रभराचा प्रवास असल्याने सगळ्यांनी कसंबसं थोडं थोडं पोटात ढकललं आणि सगळे एक एक करून बस मध्ये येऊन बसले. विराजसने सुद्धा एकदा बसवाल्याशी बोलून घेतलं आणि तो त्याच्या जागेवर येऊन बसला. यावेळी क्लीनर असल्यामुळे त्यांना कोणाला जागायची गरज भासली नाही. त्यांचा रात्रभराचा पूर्ण प्रवास झोपेतच गेला. सकाळी एका छोट्या टपरीवर बस थांबवून सगळ्यांनी चहा घेतला आणि मग ते पुन्हा त्यांच्या मार्गाला लागले.

तसे ते आज हॉस्टेल वर लवकरच पोचले पण त्यांच्या अंगात अजिबात त्राण नव्हतं. दुपारी जेवायला जायलासुद्धा

त्यांना अगदी जीवावर आलं होतं. पण भूक सुद्धा प्रचंड लागली होती. कारण सकाळी त्यांनी फक्त चहा घेतला होता. साधारण दोन वाजता ते जेवायला खाली आले आणि खालच्या त्यांच्या नेहमीच्या नेपाळ्याकडून थोडंस खाऊन पुन्हा वर जाऊन त्यांनी बिछान्यावर स्वतःला झोकून दिलं

त्या दिवशी विराजस आणि रश्मीचं फार काही बोलणं झालं नाही. दोघंही थकले होते त्यामुळे त्यांनी आराम करणंच पसंत केलं. पण एक मात्र नक्की होतं की येणाऱ्या पुढल्या काही दिवसांसाठी ते फक्त मित्र मात्र नक्कीच नसणार होते.

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे दोघे ऑफिसमध्ये समोरासमोर आले. विराजसने तिला एक छान स्माईल दिली. तसा विराजस खूप कमी हसायचा. त्याच्या चेहऱ्यावर नेहमीच एक गंभीरता असायची. कारण त्याची सवय. तो कोणत्याही गोष्टीचा अतिविचार करायचा. अर्थात त्यामुळे होणारे दुष्परिणाम त्यालाही कळायचे पण त्यावरचं उत्तर अजूनही त्याला सापडलं नव्हतं. त्यामुळे विराजसच्या

चेहऱ्यावरची एवढी मोठी स्माईल बघून सगळ्यांना आश्चर्यच वाटलं. निखिल ने थोडं चिडवलं देखील. पण विराजसने त्याकडे फार लक्ष दिलं नाही.

हा आठवडा तसा विराजस साठी जरा आरामाचाच होता. कारण ट्रेनिंगचे दिवस संपत आले होते. आणि बरीच ठिकाणं फिरून झाल्यामुळे येणाऱ्या वीकेंड चा त्याचा काही प्लॅन सुद्धा नव्हता. हा आठवडा विराजस आणि रश्मीला बराच निवांत वेळ मिळणार होता. एक निनावी नातं नव्याने फुलू पाहत होतं. दोन जीव पुन्हा एकदा एकमेकांमध्ये गुंतत होते. अगदी येणाऱ्या काळाची चिंता न करता.

आजचा दिवस विराजससाठी जरा बोरिंग च होता. इतर वेळी त्याचा वेळ ट्रिपची जागा शोधण्यासून ते हॉटेल्स , बस यांचं बुकिंग करण्यातच निघून जायचा. थोडेफार ट्रेनिंगचे व्हिडिओ पाहून तो बाहेर पडला तर बाहेर रश्मी आणि अक्षय बोलत उभे होते. विराजसने त्यांना पाहूनच न

पाहिल्यासारखं केलं आणि तो बाहेर निघून गेला. त्याच हे वागणं तसं रश्मीसाठी काही नवीन नव्हतं. रश्मीला अक्षयसोबत पाहिलं किंवा रश्मीने त्याच्यासमोर अक्षयचा विषय जरी काढला तरी त्याचा मूड पटकन बदलून जायचा. तशी त्याची आणि अक्षयची काही दुश्मनी नव्हती. पण मतभेद बरेच होते. अगदी एक उत्तर ध्रुव तर दुसरा दक्षिण. दोघांनाही सांभाळण्यात रश्मीला तारेवरची कसरत करावी लागायची. कारण कितीही झालं तरी रश्मी अक्षयच्या ग्रुप मधली होती आणि विराजसच्या ग्रुपमध्ये ती फक्त विराजसचीच जास्त जवळ होती. इतर कोणाशी ती कधीतरीच बोलायची.

विराजस बाहेरून परत आला आणि त्यांच्याकडे न बघता तसाच आत गेला. यावरून पुढे काय वाढून ठेवलंय याची रश्मीला थोडीफार कल्पना आली. जेव्हा रश्मी अक्षय बरोबर मध्ये गेली तेव्हा विराजस त्याच्या जागेवर कानात हेडफोन अडकवून बसला होतो. रश्मी त्याच्या शेजारी बसली पण तरीही त्याच लक्ष गेलं नाही. मग रश्मीने काही

ना काही करून त्याला त्रास द्यायला सुरुवात केली. सुरुवातीला विराजसने दुर्लक्ष केलं पण मग त्याने वैतागून हेडफोन काढून बाजूला ठेवले. ठेवले म्हणण्यापेक्षा जवळजवळ आदळलेच. रश्मीला एकदम हसायलाच आलं.

"काय झालं हसायला?" विराजस तिच्याकडे न पाहता म्हणाला.

"कुठे काय? काही नाही.."

"उगाच कोण हसतं माहितीये ना.."

"हो. तुझ्या सारखी वेडी माणसं.."

"अच्छा. म्हणजे मी वेडा. आणि शहाणपणाचा ठेका फक्त तू एकटीनेच घेऊन ठेवलाय ना.."

"मी असं कुठे म्हणलं.."

"तू काय म्हणूच नकोस.. जा ना जरा. मला काम करू दे."

"कुठे जाऊ.."

“जा कुठेही. जा ना त्या अक्षय कडे. गुलुगुलु करून झालं वाटतं..”

“कसलं गुलुगुलु. भांडून झालं असं म्हटलं असतंस तर एक वेळ ठीक होतं..”

“तुमचं काय. चालूच असतं.”

“हो. आणि तुला ते माहीत असूनपण चिडतोस तू.”

“मी.. मी कुठे चिडलोय..”

“अच्छा.. मग तिकडून सरळ निघून का गेलास..”

“ते मला वाटलं की उगाच तुला डिस्टर्ब नको ना. म्हणून...”

“ओहोहो. आलास मोठा डिस्टर्ब करणारा... राग सरळ नाकावर दिसतो तुझ्या..”

"ओह हॅलो. मी अजिबात काही रागावलो वगैरे नाही.. ते जरा बोअर होत होतं म्हणून.”

“हो ना यार. या वेळी ट्रिप नाही ना. नाहीतर आपला वेळ कसा जायचा आपल्यालाच नाही कळायचं..”

"हम्म. संध्याकाळी काय प्लान..."

“काही नाही. तू बोल.”

“बघूया संध्याकाळी. जाऊया कुठे तरी..."

“ठीक आहे. इथे बाहेर ते कॅफे आहे ना. चांगला आहे असं ऐकलं मी..”

“अच्छा. मग जाऊया तिथेच. जवळ पण आहे. तुला हॉस्टेलवर जायला सोपं पडेल.”

“ओकेज.. चल आता मी पण जरा माझे सेशन पूर्ण करते. नाही तर गुरुवारी वाट लागेल.”

“हा. फ्रायडेला एक्सझाम आहे बहुतेक.. म्हणजे बाकीच्या बॅच ची आहे. आपली पण असेल.”

“तुला कसलं टेन्शन. टेन्शन आम्हांला.”रश्मी जाता जाता हसत म्हणाली.

संध्याकाळी रश्मी ऑफिसच्या बाहेर पडली तेव्हा विराजस बाहेरच उभा होता. रश्मीने मिथिलाच्या कानात काही तरी सांगितलं आणि ती विराजसकडे आली.

“काय झालं. ?"

“कुठे काय..”

“मिथिलाला काय सांगत होतीस..”

“आपण जातोय तेच सांगितलं.. तर मी दिसली नाही तर हॉस्टेलभर चर्चा होईल..”

“हो बाबा.. तुम्ही काय सेलेब्रिटी ना..”

“गप रे.. कसं जायचंय? चालत की ऑटो?"

“तुला घाई आहे का जायची?"

“नाही तर..”

“मग जाऊया चालतच..”

“चालेल..”

विराजसने निखिलला लांबूनच इशारा केला आणि ते बाहेर पडले. चालताना रश्मीने विराजसचा हात नकळत कधी पकडला तिलाही कळलं नाही.

“काय खाणार आहेस?” विराजसने मेनू बघता बघता विचारलं.

“व्हेज मधलं मागव काहीही..”

“अरे हो.. तुम्ही व्हेज वगैरे ना..” विराजस हसत म्हणाला.

“हसायला काय झालं? व्हेज खावं माणसाने.. तब्येतीला चांगलं असतं.”

“तू खातेस ना.. बस झालं. मी तर मस्त चिकन बर्गर खाणार.. तू खा व्हेज चिकन.. पनीर.”

“हो.. मागव आता तेच.. आणि मॉकटेल पण.”

विराजसने होकार दर्शवत त्यांना हवी ती ऑर्डर देऊन टाकली. तो कॅफे ऑफिसच्या जवळच असल्याने तिकडे ओळखीचीच लोकं जास्त होती. आजूबाजूने अगणित डोळे आपल्याला रोखून पाहत आहेत असा विराजसला भास झाला. पण ऑर्डर आल्यावर त्याने बाकी सगळ्याकडे दुर्लक्ष करत खाण्यावर लक्ष केंद्रित केलं.

“विराजस... एक विचारू” रश्मीने पनीर पकोडाचा एक घास घेता घेता विचारलं.

“विचार विचार.. परवानगी कसली मागतेय..”

“आपल्याकडे खरच खूप कमी वेळ शिल्लक राहिलाय का?"

“म्हणजे.. ?"

“म्हणजे आता हे ट्रेनिंग संपलं की आपली भेट नाही होणार?"

“तसं काही आताच नाही सांगू शकत ग मी... एकाच लोकेशनला असू तर भेट होत राहीलच.. लोकेशन बदललं की काही सांगता नाही येत.”

“हं..”

“जास्त विचार नाही करायचा गं. तूच म्हणालीस ना की वर्तमानात जगुया म्हणून..”

“हो ते ही आहेच म्हणा. मी आपलं सहज विचारलं.. बरं निघुया का? नऊ वाजले की गेट बंद होतो हॉस्टेलचा..”

“हो ठीक आहे...” विराजस वेटरला बिलसाठी इशारा करत म्हणाला.

विराजस रश्मीला तिच्या हॉस्टेलच्या गेटवर सोडायला गेला तर तिथे कार्तिक आणि मिथिलाला पाहून दोघांनाही धक्काच बसला. विराजसने कार्तिकच्या तिथे असण्यावर प्रश्न उपस्थित केला. त्या वेळेला दोघांनीही उडवाउडवीची उत्तर

दिली खरी पण आता आपली काही यातून सुटका नाही हे कार्तिकला पक्क ठाऊक होतं. रश्मी आणि मिथिला हॉस्टेलमध्ये गेल्यावर विराजस आणि कार्तिक सुदधा त्यांच्या हॉस्टेलकडे निघाले.

"काय.. ? कधी पासून?"

विराजस ऑटोला हात दाखवत म्हणाला.

“काय . ?”कार्तिक जणू आपल्याला काही माहितीच नाही असा आव आणत म्हणाला.

“हेच.. मिथिलापुराण..”

“हे.. खूप आधी पासून..” कार्तिक थोडासा लाजतच म्हणाला.

“लाज नाही वाटत... आमच्या पासून लपवून ठरवायला.. माझी एवढी उडवतोस रश्मी वरून.. कुठे फेडशील हे पाप..”

“याच जन्मात. आता तुला कळलंय म्हणजे रूमवर जाऊन काय होणार आहे याची कल्पना आहे मला..”कार्तिक हसत हसत म्हणाला.

त्या दिवसापासून मग विराजस, कार्तिक, रश्मी आणि मिथिला. चौघेजण ऑफिस सुटल्यावर एकत्रच जवळपास कुठे तरी फिरायला जायचे. कधी कॅफे, कधी हॉटेल कधी आईस्क्रीम पार्लर.. जसा शेवट जवळ आल्यावर वेळ भरभर निघून जाते तसाच ह्या आठवड्याचे दिवसही भरभर निघून गेले. शुक्रवारी त्यांची फायनल होती. प्रॅक्टिकल आणि लेखी सुद्धा.. या परीक्षे मध्ये कुणी नापास झालं तर त्याला पुढचे दोन आठवडे इथेच राहून ती परीक्षा पुन्हा द्यायला लागायची. तसे सगळे हुशारच होते त्यामुळे कुणाला त्या परीक्षेचं दडपण नव्हतं. परीक्षा संपता संपता संध्याकाळ कधी झाली त्यांना कळलंच नाही.

परीक्षा संपल्यावर संध्याकाळी सगळे जण एकत्र बाहेर जायचा विचार करत होते तितक्यात पाऊस आला आणि मग नाईलाजाने सर्वांना हॉस्टेल मध्ये जावं लागलं. तुम्ही जर केरळ मध्ये असाल तर बाहेर पडताना छत्री बाळगणं अनिवार्य आहे. कारण तिकडे कधीही पाऊस पडतो.

****************************************

“रश्मी.. आत येऊ का?” माधुरीने दरवाजा वाजवत विचारलं.

“अगं माधुरी. ये ना.. किती ती फॉर्मलिटी.. अशीच आली असतीस तरी काय ओरडले नसतो आम्ही तुला...”रश्मी मिथिला कडे पाहत म्हणाली.

“हो ते आहेच ग.. बरं मी काय म्हणतेय..”

“हा काय झालं?” रश्मीने एकदम उत्साहाने विचारलं. कारण माधुरी क्लासची सीआर होती आणि ती काहीतरी सांगायला आली आहे म्हणजे ते महत्वाच असणार हे रश्मीला माहीत होतं.

"सगळे म्हणत होते की आता शेवटचा विकेंड आहे तर सगळे मिळून जाऊया कुठेतरी फिरायला.”

"अगं पण कुठे जाणार आणि असं आयत्या वेळेला बुकिंग कसं होणार..”

"जवळच कुठेतरी जाऊ शकतो ना आपण.. स्टेसाठी तर जायचय.”

"कोण कोण यायला रेडी आहे. ?"

"बरीच मंडळी आहे.”

"ठीक आहे. विराजसला फोन करू का? तो काहीतरी सुचवू शकतो.” इतकं बोलून तिने विराजसला फोन लावला सुद्धा.

विराजस आणि बाकीची मंडळी नुकतीच डिनर करून वर आली होती. उद्या कुठे जायचं नव्हतं त्यामुळे त्यांना पॅकिंग वगैरेची काही चिंता नव्हती. विराजस त्याची खोली आवरत असताना त्याचा फोन वाजला.

“हॅलो..."

“हा विराजस. थांब फोन स्पीकर वर टाकते. माधुरी आहे सोबत.”

“माधुरी. काय झालं.”

“अरे आम्ही सगळे म्हणत होतो की शेवटचा विकेंड आहे तर सगळेजण मिळून जावूया कुठेतरी स्टेला.”

“जायला काही हरकत नव्हती पण एवढ्या आयत्या वेळेला कसं काय जमणार ना.”

“बघ ना. कुठे बुकींग मिळाल तर.”

“किती जण आहेत?"

“तुम्ही सहा जण आणि बाकी इथून आम्ही बारा मुली आहोत. बाकी मुलांच माहित नाही मला.”

"ठीक आहे. मी विचारतो आणि तसं सांगतो.”

"ओके. ठीक आहे. आम्ही वाट बघतोय सगळे.”

एवढ बोलून विराजसने फोन ठेवून दिला आणि बाकी मुलांना फोन करून कोण कोण येतय याची एक लिस्ट तयार केली. जवळजवळ वीस जण तयार होते. एवढ्या जणांसाठी आयत्यावेळेला बुकिंग होईल असा विराजसला वाटत नव्हतं पण तरी प्रयत्न म्हणून त्याने गुगल वरून हॉटेलची नाव काढून त्यांना फोन करायला सुरुवात केली. अपेक्षेप्रमाणे त्यांची सुरुवात नकार ऐकण्या पासूनच झाली. बराच वेळ नन्नाचा पाढा ऐकल्यानंतर शेवटी एका बंगल्यामध्ये त्यांना पाच रूम मिळाल्या. टोकन म्हणून जमा करायला वेळ नव्हता म्हणून विराजसने त्याच्याच अकाउंट मधून टोकन अमाऊंट देऊन टाकली आणि बुकिंग पक्क

केलं. त्याने तसं रश्मीला फोन करून कळवल आणि बाकी मुलांना सांगण्यासाठी तो खालच्या मजल्यावर गेला. तिथून परतायला त्याला जरा उशीर झाला. पण उद्या सुट्टी असल्यामुळे बाकीचे सर्व जागेच होते. दुसऱ्या दिवशी दुपारी जायचं असल्यामुळे त्यांना पॅकिंगची काही घाई नव्हती. मग सगळेजण रात्री उशिरापर्यंत फुटबॉल ची मॅच बघत बसले.

दुसऱ्या दिवशी विराजस जरा उशिराच उठला. रात्रभर जागरण होणार म्हणून आताच थोडा आराम करावा असा विचार केला असावा त्याने बहुदा. नऊ वाजले तसे बाकीचे सगळे एकेक करून उठले. निखिल फक्त झोपून होता. सगळ्यांचं आवडल्यावर नाश्ता करायला जाण्यासाठी कार्तिकने निखिलला हाक मारली .

"निखिल... नाश्ता करायला जायचंय ना?"

निखिलकडून काही उत्तर आलं नाही तसा कार्तिक त्याच्याजवळ गेला. निखिल अजून झोपेतच होता . कार्तिकने सहज त्याच्या कपाळाला हात लावला तर निखिल तापाने फणफणत होता. कार्तिकने लगेचच बाकीच्यांना हाक मारली आणि बघता बघता सगळेजण निखिलच्या रूममध्ये आले. सगळे आले तसा निखिलही त्याच्या बेडवर उठून बसला.

"काय रे. अचानक काय झालं ? काल रात्री तर बरा होतास ." रोहितने काळजीच्या स्वरात विचारलं.

"काही माहित नाही रे. सकाळीच जरा अंग जड झाल्यासारखं वाटत होतं. म्हणून म्हटलं थोडावेळ झोपतो म्हणजे बरं वाटेल."

"आजचं जायचं रद्द करायचं का?" विराजसने सगळ्यांकडे पाहत विचारलं.

"नाही त्याची काहीही गरज नाहीये . तुम्ही सगळे जा. मी राहतो रूमवरच."

“अरे पण तुला एकट्याला कसं सोडणार.”

“मी राहीन रे बरोबर. तसंही काही फार झालेलं नाहीये. फक्त ताप आला आहे.”

"तरी काळजी तर घ्यायला हवीच ना .”

“क्रोसीन घेतो म्हणजे बरं वाटेल .”

“मी थांबतो निखिल बरोबर. तुम्ही सगळे जा.” रोहित निर्णयाच्या सुरात म्हणाला.

"काही गरज नाही आहे. मी म्हणालो ना तुम्हाला कि तुम्ही सगळे जा म्हणून . मी राहीन नीट.”

“अरे पण..."

“आता पण नाही कि बिन नाही” निखिल विराजसचं वाक्य मध्येच तोंडात म्हणाला”आणि तसंही काही लागलाच तर खालच्या मजल्यावर अभिजित वगैरे आहेतच ना. तुम्ही झालं बिनधास्त”

निखिल कुणाचंही ऐकणार नाही हे समजून सर्वांनी त्याच्या बोलण्याला मूक संमती दर्शवली. सगळे जण खाली नाश्ता करायला गेले तसा निखिल उठला आणि ब्रश वगैरे करून पुन्हा बिछान्यावर पडून राहिला. नाश्ता करून सगळे परत आले. येताना त्यांनी निखिलसाठी नाश्ता पार्सल करून आणला होता . तो खाऊन आणि चहा घेऊन निखिलने क्रोसिन घेतली आणि तो पुन्हा झोपून गेला.

इकडे सगळे जण सामानाची बांधाबांध करून सर्व आवरून वर्कलाला जाण्यासाठो तयार झाले. तसे ते आधीही एकदा जाऊन आले होते पण आता आयत्या वेळेवर दुसरी कोणती जागा मिळाली नाही म्हणून विराजसने पुन्हा हीच जागा निवडली. त्यांच्या जवळच्या रेल्वे स्टेशन पासून वर्कलाचं स्टेशन दोन स्टेशनच्या अंतरावर होतं त्यामुळे ट्रेननेच जाणं सोयीस्कर होतं. ट्रेनसुद्धा बऱ्याच वेळेच्या

अंतरानंतर होती. त्यामुळे एक ट्रेन चुकली तर दुसरी सरळ सहा सात तासांनंतर. सगळे जण कसेबसे ट्रेनमध्ये चढले. विराजस वगैरेला तर ट्रेन प्रवासाची सवयच होती. त्यामुळे त्यांना फार विशेष असं काही वाटलं नाही. बाकीच्यांची मात्र थोडी दमछाक झाली. वर्कला स्टेशनवर उतरल्यावर ऑटो रिक्षाने ते सगळे बंगल्याकडे निघाले. बंगला तसा थोडा आड रस्त्यालाच होता. आजूबाजूला कोणतंही दुकान दिसत नव्हतं. लोकवस्ती होती पण काही सामान आणायचं असल्यास मुख्य मार्केटला जाण्याशिवाय पर्याय नव्हता. बंगल्यावर पोहोचल्यावर विराजस मालकाला भेटून फॉर्मॅलिटी करण्यात गुंतला तर बाकी सगळे जण केअरटेकर सोबत रूम बघायला निघून गेले. बंगला तसा खूप ऐसपैस होता. मागे बरीच मोकळी जागा होती तिथे एका बाजूला स्टेज सारखं बांधकाम केलेलं होतं. दोन झोपाळे बांधलेले होते आणि बसण्यासाठी बाकांची सोय केलेली होती. त्या जागेवर उभं राहून समोर पाहिलं कि अथांग सागराचं दर्शन व्हायचं. बंगला बीचला लागूनच होता त्यामुळे

समुद्राच्या गार वाऱ्याचा स्पर्श अंगावर शहरे आणायचा. एका बाजूला एक झोपडीवजा घर करून त्यात डीजे ची सोया केलेली होती. दोन्ही बाजूला लाईट्स लावलेले होते. एकंदरीत त्यांची आजची पार्टी एकदम मस्त होणार होती.

थोडावेळ आराम करून सगळेजण फिरायला बाहेर पडले. त्यांच्या बंगल्याच्या मागच्या बाजूनेच एक जिना वजा रस्ता होता जो थेट किनाऱ्यावर पोहोचत होता. एकेक करून सगळेजण किनाऱ्यावर आले. सूर्यास्त व्हायला अजून बराच अवकाश होता. आकाशात रंगीबिरंगी रंगांची उधळण झाली होती. एक चांगली जागा बघून सगळेजण क्रिकेट खेळायला सरसावले. ग्रुप मधल्या काही मुली ओठांचे चंबू करून सेल्फी काढण्यात मग्न झाल्या. तर काहीजण फेरफटका मारण्यासाठी किनाऱ्याच्या बाजूने चालत निघाले. जसजसा वेळ निघून जात होता तसतसा अंधाराचा रंग अजून गडद होत होता. आजूबाजूला दिवे नव्हते त्यामुळे क्रिकेट थांबवून सगळेजण तिथे ठाण मांडून बसले. निखिल

आणि इतर मुले समुद्राच्या पाण्यात जाऊन डुंबत होते. साधारण साडेसात आठ वाजता विरजसने सगळ्यांना हाक मारली व सगळेजण बंगल्याकडे जाण्यासाठी निघाले. परत जाताना रश्मीने नकळतपणे विरजसचा हात हातात घेतला. रात्रीच्या शीतल चांदण्यात थांबण्याची तिची खूप इच्छा होती पण एकटदुकटं तिथे थांबणं धोक्याचं होतं म्हणून मग नाईलाजाने तिला विराजसबरोबर निघावं लागलं.

ते बंगल्यावर पोहोचले तर तिथे त्यांच्या जेवणाची आणि पार्टीची सोय आधीच करण्यात आली होती. नॉन व्हेज खाणाऱ्यांसाठी मस्त चिकन रस्सा, चपाती आणि सोबत स्टार्टर म्हणून चिकन तंदूरी आणि व्हेज वाल्यांसाठी पनीर चिली, छोले, आईस्क्रीम, गुलाबजाम असा मस्त बेत होता. बीचवर खेळून सगळ्यांचेच कपडे, हातपाय खराब झाले होते त्यामुळे पटापट अंघोळ करून सगळेजण बाहेर आले आणि सगळ्यांनी त्या जेवणावर यथेच्छ ताव मारला. जेवण झाल्यावर अक्षय आणि एक दोन जण जवळच असलेल्या

एका पब मध्ये गेले तर बाकीच्यांनी बाहेर असलेल्या लॉनमध्ये डीजे च्या तालावर थिरकायला सुरुवात केली. प्रत्येक ग्रुपने एक एक टेबल पकडून त्यावर त्यांच्या ग्रुपची खाण्यापिण्याची सोय केली आणि एक जण त्या टेबलवर बसवला.

कार्तिकची तब्येत थोडी बरोबर नसल्याने त्याने टेबलवरच बसणं पसंत केलं आणि त्याला कंपनी म्हणून मिथिला सुद्धा तिथेच बसली. हळू हळू जशी रात्र वाढत होती तशी सगळ्यांमधली झिंग सुद्धा वाढत होती. त्यातच त्यांच्या बॅचचा एक अजून ग्रुप तिथे आला आणि मग धांगडधिंगा सुरू झाला. दुसऱ्याच कोणत्या तरी बॅच चा ग्रुप त्यांचं हॉटेल सोडून आपल्या सोबत येऊन बसलाय हे काही विराजसला पटलं नाही. तो ते बोलून दाखवणारच होता पण कार्तिकने त्याला थांबवलं. उगाच वाद वगैरे काही नको म्हणून कार्तिक त्याला घेऊन परत त्या जिन्याच्या मार्गाने बीचवर गेला.

रात्रीचे साधारण साडेसहा वाजल्याने बीचवर बऱ्यापैकी काळोख होता. फक्त चंद्राचा प्रकाश काय तो सोबत.

बीचवर पोचल्यावर त्यांनी मोबाईलची टॉर्च सुद्धा बंद केली आणि सिगारेट पेटवून त्या शीतल चांदण्याच मनमोहक दृश्य पाहत राहिले. हळूहळू सिद्धेश, गौरव, रोहित हे सुद्धा तिथे पोहोचले. आणि मग बराच वेळ ते तिथेच गप्पा मारत बसले.

इकडे मिथिला आणि रश्मी त्यांना शोधून शोधून दमल्या. सगळा बंगला पालथा घालून झाल्यावर रश्मीने विराजसला फोन केला. पण बीचवर नेटवर्क नसल्याने त्यांच काही बोलणं झालं नाही. बराच वेळ झाला तरी कुणी येत नाही म्हणून मग शेवटी रश्मीने बाकीच्यांना सांगितलं आणि शोधाशोध सुरू झाली. बराच वेळ ते आजूबाजूला शोधत होते. त्यांनी अक्षयला सुद्धा फोन करून तव पब मध्ये आलेत का हे विचारलं. बराच वेळ शोधाशोध सुरू होती आणि मग अचानक ते जिन्याच्या मार्गाने वर येताना सगळ्यांना दिसले.

“काय झालं?” सगळे जण आपल्याकडे रोखून बघतायेत हे कळल्यामुळे विराजसने विचारलं.

“कुठे गेला होतात?” रश्मीने रागातच विचारलं.

“तुम्ही बिझी होतात ना नाचगाण्यात. म्हणून आम्ही फेरफटका मारायला गेलो होतो.”

“इतका वेळ???"

“आता झाला वेळ. सगळे जण होतो तर थांबलो. त्यात काय झालं एवढं?"

“आम्ही कधी पासून शोधतोय माहितीये..."

“पण आम्ही काय मुद्दामहून लपलो होतो का? तुम्ही नाचत होतात सगळे आणि आम्हाला कंटाळा आला होता म्हणून बाहेर गेलो.”

“सांगून तरी जायचं ना..” रश्मी शेवटचं अस्त्र वापरत म्हणाली.

“सांगून जायला तुम्ही जागेवर असायला हवं ना. तू नाचण्यात मग्न.”

“आणि मिथिला रूम मध्ये होती.” कार्तिक विराजसचं वाक्य पूर्ण केलं.

"बरं.” रश्मी तोंड पाडत म्हणाली.

आता विराजसचा मूड सुधारणं रश्मीची जास्त महत्वाचं होतं. कारण एकदा का तो चिडला कि काहीही झालं तरी स्वतःहून बोलायला येणार नाही हे रश्मीला पक्क ठाऊक होतं. आणि तिला उरलेले थोडे दिवस रुसव्याफुगव्यात अजिबात वाया घालवायचे नव्हते. त्यामुळे विराजस आल्यावर ती कुठेही न जाता त्याच्या बाजूलाच बसून होती. कधी विराजसला गुदगुल्या करून तर कधी हळूच चिमटा काढून ती विराजसला बोलतं करण्याचा प्रयत्न करत होती. हळूहळू विराजसचा राग कमी झाला तसा तो सुद्धा तिची

खोडी काढू लागला. आणि मग हसण्या खिदळण्यात त्यांचा वेळ कसा गेला त्यांचं त्यांनाच कळलं नाही.

पहाटे विराजस नेहमीप्रमाणे लवकर उठला. सहज बाहेर एक फेरफटका मारावा म्हणून तो रूमच्या बाहेर येऊन बाल्कनीतून खाली बघत उभा राहीला. त्याच्या बॅचचा तो दुसरा खालीच खुर्च्यांमध्ये झोपी गेला होता. त्यांना घेऊन आलेल्या रिक्षावाल्याने त्यांना टांग दिल्याने रात्री त्यांनी तिथेच मुक्काम केला. बंगल्याचा मालक चांगला असल्यामुळे त्याने त्यांना तिथे राहण्यास परवानगी दिली होती. त्या सगळ्यांवर सहज एक नजर टाकून विराजस बाहेर पडला.

थंडीचे दिवस असल्याने हवेत गारवा जाणवत होता. किनाऱ्यावर गार वारा सुटला होता. तसा तो बीच निर्मनुष्यच होता. त्यामुळे एवढ्या पहाटे तिथे कुणी यायचा प्रश्नच नव्हता. त्या गार वातावरणात विराजसला सिगारेट

ओढायचा मोह आवरला नाही आणि नकळतच त्याने एक सिगारेट काढून ओठांना लावली.

विराजस परत आला तेव्हा जवळपास सगळेच जागे झाले होते. येताना विराजस जाण्याच्या मार्गाचीही चौकशी करून आला होता. ट्रेनने जाण्यापेक्षा बस ने जाणं जास्त सोयीस्कर होतं. सगळे उठले आणि आवरून नाश्ता करण्यासाठी व्हरांड्यात जमा झाले. विराजसने त्यांना परत जाण्याचा प्लॅन सांगितला आणि नाश्ता करून झाल्यावर बॅगा वगैरे घेऊन सगळे जण बाहेर पडले. बराच वेळ वाट पाहूनही त्यांना रिक्षा मिळेना. शेवटी त्या बंगल्याच्या मालकाने एका वेळी पाच जणांना अश्या चार पाच फेऱ्या मारून बसस्टोप पर्यंत सोडलं. तिथून त्यांना मुख्य शहरापर्यंत बस मिळाली आणि मग पुढे मुख्य शहरापासून त्यांच्या होस्टेलपर्यंत. मुलींचं हॉस्टेल रस्त्यालगतच होतं त्यामुळे त्यांना तिथेच उतरवून बाकी सगळे पुढच्या नाक्यावर उतरले. तिथून रिक्षा करून ते आपापल्या ग्रुपबरोबर होस्टेलवर पोहोचले. खालच्या

नेपाळ्याकडे लंच करून सगळे जण आपापल्या रूमकडे वळाले.

****************************************

त्यांचं ट्रेनिंग संपायला आता एकच आठवडा शिल्लक राहिला होता. ह्या तीन महिन्याच्या काळात अनेक नाती तुटली होती, अनेक नवीन जुळली होती. जे आतापर्यंत कधीच घरापासून लांब राहिले नव्हते त्यांच्यासाठी हा एक वेगळा अनुभव होता. बंधनमुक्त जीवन त्यांनी पहिल्यांदाच अनुभवलं होतं. अनेक आठवणींची शिदोरी त्यांना ह्या तीन महिन्याच्या काळात मिळाली होती. अनेक नवीन मित्र मिळाले होते. सगळ्यांच्या मनात आता ट्रेनिंग संपणार हाच विचार घोळत होता. रश्मी आणि विराजसही त्याला अपवाद नव्हते. ते शक्य तितका वेळ एकत्र राहण्याचा प्रयत्न करत. सकाळी ऑफिसला आल्यापासून ते रात्री हॉस्टेलला पोहोचेपर्यंत एक एकत्रच असायचे. ऑफिस नंतर रश्मी,

विराजस, कार्तिक आणि मिथिला चौघे जण कुठे ना कुठे वेळ घालवायचे. कधी कॅफे, कधी हॉटेल कधी आईसक्रीम पार्लर.

आजही ते एका कॅफेमध्ये आले होते. तो कॅफे त्याच्या ऑफिसपासून थोडा दूरच होता. पण किती वेळा त्याच त्याच ठिकाणी जायचं म्हणून मग विराजसने हा नवीन कॅफे शोधून काढला होता. साधारण साडेआठ वाजले असतील कार्तिकचा फोन वाजला.

“हॅलो.”

“हॅलो कार्तिक.” पलीकडून निखिलचा आवाज आला.

“हा बोल निखिल. काय झालं?"

“ड्रॉवरची चावी कुठे ठेवलीये?"

"माझ्याकडे आहे. का काय झालं?"

“एक झोल झालाय. आपल्या होस्टेलच्या खाली कुणालातरी गांजा पिताना पकडलं पोलिसांनी. आणि कंप्लेंट केलीये आपल्या वॉर्डनला. सगळ्यांच्या रूम चेक होतायेत.”

"हा मग. करू देत ना चेक. आपल्याकडे थोडीच आहे काही.”

"अरे आपण ती व्हिस्कीची बॉटल नाही का आणलेली कोडाईकनाल वरून. ती आहे तुझ्या ड्रॉवरमध्ये.”

“अरे शीट. लक्षातच नाही राहीलं.”

“कुठे आहेत तुम्ही?"

“अरे एका कॅफे मध्ये आलोय.”

“निघा ताबोडतोब. बाटलीची विल्हेवाट लावावी लागेल.”

“हो निघतो लगेच .”"विराजस चल. निघावं लागेल.”

“काय झालं. एवढ्या घाईत का?"

“थोडा प्रॉब्लेम झालाय. रस्त्यात सांगतो.”एवढं म्हणून त्याने वेटरला बिल आणायला सांगितलं.

रश्मी आणि मिथिलासुद्धा बुचकळ्यात पडल्या पण कार्तिक त्यांना काही सांगण्याच्या भानगडीत पडला नाही. त्यांना रिक्षा पकडून देऊन कार्तिक आणि विराजस हॉस्टेलच्या दिशेने निघाले. थोड्याच वेळात दोघे हॉस्टेलवर पोहोचले आणि रूमवर जाऊन त्यांनी ती बाटली मागच्या जंगलात फेकून दिली. कुठे लपवूनही उपयोग नव्हता कारण जर सापडली असती तर त्यांना त्यांची नोकरी गमवावी लागली असती. बाटली फेकून दिल्यावर त्यांच्या जीवात जीव आला. पण त्यांच्या सारख्या अनेकांनी अशाच बाटल्या मागच्या जंगलात फेकल्या होत्या. तात्पुरता डोक्यावर ओझं हलकं झाल्याने सगळे निश्चित झाले. दुसऱ्या दिवशी जेव्हा रश्मी आणि मिथिलाला खरं कारण कळलं तेव्हा दोघींची हसता हसता पुरेवाट झाली. कारण कुणी त्यांच्या रूमची झडती घ्यायला आलच नव्हतं.

उरलेले शेवटचे दिवस भुर्रकन उडून जात होते. असंच बसल्या बसल्या विचार करताना विराजसला लक्षात आलं कि आपली संपूर्ण बॅच कधी एकत्र आलीच नाहीये. म्हणजे क्लास मध्ये ते एकत्र असायचे पण ते तेवढ्यापुरता. क्लास संपला कि ते परत आपापल्या ग्रुप ने बाहेर पडायचे. ट्रीपमध्ये सुद्धा पूर्ण बॅच कधीच सामील झाली नाही. त्यामुळे शेवटी का होईना एक छोटीशी गेट टुगेदर पार्टी करावी असा प्रस्ताव विराजसने सगळ्यांसमोर मांडला. अर्थात त्याच्या आणि रश्मीच्या ग्रुपचा त्याला पाठिंबा होताच. प्रश्न होता बाकी ग्रुपचा. कधी दुसऱ्यांमध्ये न मिसळल्यामुळे ते येतील कि नाही याबाबत जरा शंकाच होती. त्यांना सामील करून घ्यायची जबाबदारीसुद्धा विराजसने उचलली. कारण विराजस आणि निखिल दोघांचे इतर मंडळींबरोबर संबंध चांगले होते. कुणाला कोर्स पूर्ण करताना काही अडचणी आल्या तर ते दोघे नेहमीच त्यांची मदत करायचे. विराजस आणि निखिलने प्रत्येकाजवळ जाऊन ह्या पार्टीला येण्याची

विनंती केली आणि त्यांच्या प्रयत्नांना यशही मिळालं. कधी नव्हे ते आडमुठेपणा न करता सगळेच जण तयार झाले.

सगळे तयार झालेत म्हटल्यावर विराजसने बाकीची पाऊल भराभर उचलली. संध्याकाळी सुटल्यावर त्याने आजूबाजूच्या बऱ्याच ढाब्यांवर जाऊन चौकशी केली. हॉटेलमध्ये जावं तर तिकडे थोडी बंधनं येणार त्या पेक्षा ढाबा बरा हा विचार करून त्याने हॉटेलचा पर्याय विचारात घेतलाच नाही. बरंच फिरल्यावर त्याला एक मनपसंत ढाबा मिळाला. मेनू, रेट आणि बाकी डीजे वगैरेचं बोलून फायनल केल्यावर त्याने टोकन अमाऊंट देऊनही टाकली. कारण इतर कोणत्या बॅचने हा ढाबा बुक केला असता तर पंचाईत झाली असती.

शेवट अगदी एक दोन दिवसांवर येऊन ठेपल्यामुळे सगळेजण बॅगा भरायच्या, विमानाचं किंवा रेल्वेचं तिकीट पक्क करण्यात बिझी होते. रश्मीच्या परतीचं विमानाचं तिकीट तिच्या ऑफिसने आधीच बुक करून ठेवलं होतं. बाकीच्यांना त्यांच्या ऑफिसमधून त्यांच्या प्रवासाचं भाडं

मिळणार होतं. जाताना सगळे एक दोन दिवस मजा करत जाऊ असा विचार करून विराजसने आणि त्याच्या ग्रुपने ट्रेनचं तिकीट काढलं होतं. सीट पक्की नसली तरी नशिबाने त्यांना एकाच डब्यात समोरासमोर जागा मिळाली होती. यात पुन्हा एकटी पडली होती ती रश्मी. तिला एकटीलाच जावं लागणार होतं. उगाच राजने तिचं तिकीट बुक केलं असं तिला राहून राहून वाटत होतं. विमानाचं तिकीट तसंच ठेवून सगळ्यांसोबत ट्रेनने जावं असा विचार तिच्या मनात अनेकदा येऊन गेला. पण उगाच ऑफिसचे पैसे वाया जायला नको म्हणून तिने शेवटी तो विचार रद्द केला.

आणि शेवटी तो दिवस उजाडला. सगळ्या परीक्षा, कोर्स पूर्ण करून सगळे जण आपापल्या शहरात परतणार होते. जे परीक्षांमध्ये नापास झाले होते त्यांना अजून एक दोन आठवडे तिथेच राहून परीक्षा पास होणं बंधनकारक होतं. शेवटचा दिवस सगळ्या फॉर्मॅलिटी वगैरे पूर्ण करण्यात गेला. सुपरवायझरच्या सह्या , एचआर च्या सह्या , क्लीअरन्स फॉर्म

पूर्ण करण्यात सगळ्यांची धावाधाव होतं होती. मध्येच कुणी एचआरकडे जाऊन थोडं इमोशनल होऊन लोकेशन बदलून देण्यासाठी गयावया करत होतं. कुणी ट्रेनिंग संपल्याच्या आनंदात होतं तर कुणी आता परत घरी जावं लागणार म्हणून दुखी होतं. आठवडाभर मज्जा आणि प्रत्येक शनिवार रविवार ट्रिप हे जीवन आता पुन्हा थोडंच जगायला मिळणार होतं.

संध्याकाळी ते नेहमीपेक्षा जरा लवकरच मोकळे झाले. मग काय. पार्टीसाठी मुलींचा नट्टापट्टा सुरु झाला. बाकी मुलं कधी नव्हे ती जिमखान्यात जाऊन बसली. विराजस आणि निखिल थेट त्यांनी ठरवलेल्या धाब्यावर गेले आणि तिकडचं लोकेशन त्यांनी त्यांच्या बॅचच्या ग्रुप वर टाकून दिलं. आजूबाजूला फिरून त्यांनी स्टेज, डीजे, सेल्फी पॉईंट आणि जेवणाची वगैरे सोय पाहून घेतली. काही बदल आवश्यक होते ते केले आणि मग तोंड वगैरे धुवून ते इतरांची वाट पाहत बसले. थोड्या वेळाने एक एक ग्रुप येऊ लागला. विराजसने सगळ्यांना बाहेरच उभं केलं. सगळे जण

आल्यावर त्याने त्या ढाब्यावाल्याला पंजाबचा प्रसिद्ध ढोल वाजवायला सांगितला आणि ढोल सुरु होताच सगळ्यांनी त्या तालावर ठेका धरला. कुणी थांबायला बघत नाही म्हटल्यावर विराजसने त्या ढोलवाल्यालाच थांबायला सांगितलं.

“काय झालं ?” एकदम ढोल बंद झाल्याने अक्षयने गोंधळून विचारलं.

“अरे इथेच नाचणार आहेत का? डीजेची सुद्धा सोया केलेली आहे.” विराजस सगळ्यांना आत जाण्यासाठी हातवारे करत म्हणाला.

"डीजेवर काय नेहमीच नाचतो. असं ढोलावर नेहमी नाचायला थोडंच मिळतं.”

"हो बरोबर आहे तुझं पण इथेच नाचत बसलो तर उशीर होईल ना. मग बाकी कार्यक्रम कसा होणार.”

अक्षय काही बोलणार तेवढ्यात निकेतने त्याला जवळजवळ ओढतच मध्ये नेलं. विराजस आणि अक्षयमध्ये

वाद झाले नाही याचं का कोण जाणे रश्मीने देवाचे आभार मानले. सगळी मुलं मध्ये जाऊन बसली तर मुली नाचल्यामुळे त्यांचा उतरलेला मेकअप पुन्हा करण्यासाठी गेल्या.

विराजसने पुन्हा एकदा जाऊन सगळी व्यवस्था नीट आहे कि नाही ते तपासून पाहिलं आणि तो येऊन खुर्चीवर बसला. आणि बसता बसता त्याची नजर मागून येणाऱ्या रश्मीवर पडली आणि तो पाहतच राहिला. गडद निळ्या रंगाच्या गाऊनमधे रश्मी खूप सुंदर दिसत होती. त्याच्या गव्हाळ रंगावर तो गडद निळा रंग आणखीनच खुलून दिसत होता. तिने केस स्ट्रेटनिंग करून मोकळे सोडले होते. कानात आणि गळ्यात घातलेली हलकी नीलवर्णी रंगाची ज्वेलरी अंधारात चमकून निघत होती. डोळ्यांना काळपट निळसर आयलायनर लावून स्मोकी आयच्या मेकअपमुळे तिचे डोळे तिच्या चेहऱ्यावर आखीव रेखीव भासत होते. ओठांची फिकट गुलाबी रंगाची लिपस्टिक तिचं रूप

आणखीनच खुलवत होती. काहीक्षण आजूबाजूचं सारं विसरून विराजस तिच्याकडे पाहतच राहिला. अँकरिंगची सवय असल्याने तिच्या चेहऱ्यावर आणि हावभावात एक आत्मविश्वास झळकत होता. तिने स्टेजवर विराजसचं नाव घेताच तो भानावर आला. स्टेजवर जाऊन त्यांने ह्या पार्टीला उपस्थित राहिल्याबद्दल सर्वांचे आभार मानून त्याने पुन्हा रश्मीकडे कार्यक्रमाची सूत्रे सोपवली. रश्मी एकेकाला स्टेजवर बोलवून त्याच्या टोपणनावाची चिठ्ठी लावलेलं एक छोटंसं गिफ्ट त्यांना देत होती. मध्येच कुणी स्टेजवर जाऊन त्यांचं मनोगत बोलत होता. कुणी मिमिक्री किंवा स्टॅन्ड अप कॉमेडी करून त्या उत्साहाच्या वातावरणात रंग भरण्याचं काम करत होता. पण विराजसचं मात्र या सगळ्याकडे लक्षच नव्हतं. तो त्याच्याच विश्वात रमला होता आणि त्याची रश्मीवरची नजर तसूभरही हलत नव्हती. सर्वांचे गिफ्ट आणि मनोगत झाल्यावर डीजे सुरु करायच्या आधी त्यांनी दहा मिनिटे ब्रेक घेतला.

“हुश्श . झाली बाबा एकदाची पार्टी” रश्मी विराजसच्या बाजूला बसत म्हणाली.

“झाली कुठे. अजून अर्ध्याहून जास्त बाकी आहे” विराजस तिच्या नजरेला नजर देत म्हणाला.

“हो ते आहेच. पण तुझी नजर हटत नव्हती माझ्यावरून.” रश्मी हसतचं म्हणाली.

“असं काही नाही.” चोरी पकडली गेली म्हटल्यावर उगाच नजर चोरत म्हणाला.

“काही गरज नाही इकडे तिकडे बघायची आता. आम्हा मुलींना देवाची देण आहे ही. कुणीही कुठूनही बघत असलं कि आम्हाला ते बरोबर कळतं.”

"अच्छा. चांगलंय चांगलंय. आम्हाला सुद्धा मिळाली पाहिजे अशी काही देण” विराजस हसू आवरत म्हणाला.

“मिळालीये ना. पण तुम्हाला किंमत नाही ना त्याची.”

“काय?”

“असं चोरून मुलींकडे बघण्याची”रश्मी हसतचं म्हणाली.

“पण चोरी पकडली जाते तर काय उपयोग?"

“असं बिनदिक्कतपणे चोरी केली तर पकडलं जाणारच ना.”

“असू दे.”

“बाय द वे. काय बघत होतास इतकं माझ्याकडे टक लावून”

“नाही ते रोजचं माकड आज जरा वेगळं दिसत होतं ना म्हणून बघत होतो.”

“ए माकड काय? देईन ना एक ठेवून.”

“हाहा. सॉरी. छान दिसतेय तू आज .”

“का. रोज नाही दिसत का?”

“नाही.”विराजस खांदे उडवत म्हणाला.

“अच्छा. म्हणून तू ही पार्टी ठेवलीस का? मला नटलेलं बघता यावं म्हणून?”

“ह्या. मला अजिबात कल्पना नव्हती कि तू अशी नट्टापट्टा करून येणार म्हणून”

“शेवटचा दिवस आहे ना.” रश्मी विराजसच्या डोळ्यांत बघत म्हणाली.

“प्लिज तो विषय नको काढूस आता. त्या विषयावर न बोलताच विषय संपलेला चांगला.”

“हम्म. पण आपला एकत्र प्रवास संपतोय ना इथेच.”

“कदाचित. पण याची कल्पना होतीच ना आपल्याला आधीपासून”

“कल्पना होती रे पण जड तर जाईलच.”

“हो. वेळ हेच औषध. दुसरं काही नाही.”

“बोलायला किती सोपं आहे ना हे.”

“पण त्याशिवाय दुसरा पर्याय सुद्धा नाही ना.”

“कारण आपण दुसरा कोणता पर्याय विचारात घेतलाच नाही ना. प्रवासात चालत राहिलो आपण फक्त. सहप्रवासी बनून.”

“असो. होईल हळू हळू सगळं नीट.” एवढं बोलून विराजसने सिगरेटच्या बॉक्समधून एक सिगरेट बाहेर काढली.

“सोड आता ती सिगरेट”असं म्हणून रश्मीने तीच सिगरेट त्याच्या तोंडातून काढून पुन्हा त्याच्या हातात दिली.

विराजसनेसुद्धा वाद न घालता बॉक्स खिशात ठेवून दिलं.

“आता पुढे काय?” रश्मी सहज विचारलं.

“बघू. जॉब तर आहेच सोबतीला. कारण जॉब सोडून इतर काही करायची धमक तर राहिली नाहीये माझ्यात. म्हणजे लिखाण सुरूच ठेवेन. पण साईड बाय साईड”

“पण.” रश्मी काही बोलणार तेवढ्यातच त्याच्या बॅच रिप्रेझेन्टेटिव्हने तिला हाक मारली. त्यांच्या वॉर्डनने त्यांनी केलेली एक्सट्रा वेळेची मागणी नाकारली होती. त्यांना रोजच्याच वेळेला हॉस्टेलमध्ये बोलावलं होतं. त्यांचा वॉर्डन थोडा खडूस असल्याने कितीही गयावया केल्या तरी तो ऐकणार याची कल्पना असल्यामुळे सगळ्या मुलींनी भराभर आवरायला घेतलं. एकीकडे मुलं डीजेच्या तालावर बेभान होऊन नाचत होती तर मुली प्लेट्स घेऊन रांगेत उभ्या होत्या. कसतरी घास दोन घास खाऊन सगळ्या मुली जायला निघाल्या. जेव्हा त्या निघाल्या तेव्हा मुलांनी नाचायचं थांबवून त्यांना निरोप दिला. तीन महिन्यांचा त्यांचा प्रवास आज संपत होता. किती तरी भांडणं , मतभेद , शिव्याशाप होऊनसुद्धा आज शेवटच्या दिवशी सगळ्यांच्या डोळ्यात पाणी होतं. रश्मीने न राहवून विराजसला मिठी मारली.

“ अवर जर्नी एन्ड्स हिअर. अवर प्लांनिंग फॉर द ट्रिप्स एन्ड्स हिअर. थँक यू सो मच फॉर धिस वंडरफूल जर्नी.”

विराजसला सुद्धा गहिवरून आलं होतं त्यामुळे काही न बोलणंच पसंत केलं. त्याने फक्त तिच्यासमोर खिशातलं सिगरेटचं पाकीट आणि लायटर काढून बाजूच्या कचराकुंडीत फेकून दिलं. त्याच्या ह्या कृतीमुळं रश्मीच्या चेहऱ्यावर जे समाधान होतं ते पाहूनच तो भरून पावला आणि त्याने पुन्हा एकदा रश्मीला आपल्या मिठीत घेतलं.

# ४

केरळवरून आल्यावर दुसऱ्याच दिवशी रश्मीला तिच्या ऑफिसमध्ये रिपोर्ट करायचं होतं. राजने तिला मेसेज करून तसं कळवलं होतं. त्यामुळे सुट्टी घ्यायचा मूड असूनसुद्धा ती निमूटपणे ऑफिसला गेली. जवळजवळ साडेतीन महिन्यांनी ती ऑफिसमध्ये पाऊल ठेवत होती. ऑफिसचा बराच कायापालट झाला होता. अनेक नवे चेहरे दिसत होते. ऑफिसच्या कॉन्फरन्स रूममध्ये कसलीतरी तयारी सुरु होती. मधला दिवस असूनही सर्व जण कामात व्यस्त दिसत होते. आणि या सर्व गोंधळात रश्मीची नजर मात्र एका व्यक्तीला शोधत होती. 'अविनाश'. रश्मी केरळला गेल्यावर सुरुवातीला दोघे संपर्कात मध्ये होते. पण मग नंतर दोघेही त्यांच्या खासगी आयुष्यात व्यस्त झाल्यामुळे त्यांच्यातील संपर्क तुटला होता. जुने बरेच लोकं दिसले पण अविनाश दिसत नव्हता. रश्मीच्या जुन्या

डेस्कवर सुद्धा आता कुणा दुसऱ्याच्या नावाची पाटी होती. ते पाहून रश्मी थेट राजच्या केबिनमध्ये गेली.

"राज. आत येऊ का?"

"अरे रश्मी. ये ना? कसा झाला प्रवास. सॉरी तुला लगेचच ऑफिसमध्ये बोलावून घेतलं. पण कामच एवढं महत्वाचं होतं कि माझा नाईलाज झाला."

पण रश्मीचं त्याच्या बोलण्याकडे लक्ष कुठे होतं. तिची नजर राजच्या समोर बसलेल्या अविनाशवर खिळली होती.

"रश्मी." राजने पुन्हा हाक मारताच रश्मी भानावर आली.

"हा राज. सॉरी. काय म्हणत होतात तुम्ही."

"मी विचारत होतो कि कसा झाला प्रवास? तुला लगेचच ऑफिसमध्ये बोलावून घेतलं. पण कामच एवढं महत्वाचं होतं कि माझा नाईलाज झाला."

"प्रवास छान झाला. ट्रेनिंगसुद्धा छान पार पाडलं"

“अरे वाह. मस्तच. बरं तुला यासाठी बोलावून घेतलं कारण आज अविनाशचा आपल्या ऑफिस मधला शेवटचा दिवस आहे.”

“काय? का? आय मिन कुठे चाललास तू?” रश्मीने गोंधळून अविनाशकडे पाहत विचारलं.

“अरे बापरे. म्हणजे तुला माहित नाही कि काय? साहेबांनी नवीन स्टार्ट अप सुरु केलंय. अवि तू बोलला नाहीस रश्मीला ??” राजने आश्चर्याने विचारलं.

“अरे नाही. बरेच दिवसांत बोलणं नाही झालं आमचं. त्यामुळे माहित नसेल तिला.”अविनाश सारवासारव करत म्हणाला.

“अच्छा. तर रश्मी. आपल्याकडे एक खूप मोठा क्लायंट आला आहे. त्याचे सगळे इव्हेंट्स आपणच मॅनेज करतोय. इतके दिवस अविनाश सांभाळत होता. आता तो जाणार म्हटल्यावर त्याच्या तोडीच्या कुणीतरी त्याच्या जागा घ्यायला

हवी म्हणून तुला लगेच बोलवून घेतलं. त्याच्याकडून सगळ्या डिटेल्स घे आणि नीट स्टडी कर. आज गेल्यानंतरही जर तुला काही मदत लागली या कामात तर तो मदत करेल तुला. तसं सांगितलंय त्याने . चलो मला एक मिटिंग आहे. मी जातो. तुम्ही इथेच बसलात तरी चालेल. बाय. संध्याकाळी अविनाशच्या फेअरवेलमध्ये भेटू."एवढं बोलून राज तिथून निघून गेला.

"कसा आहेस?" रश्मीने उगाच बोलायचं म्हणून विषय काढला.

"मी मस्त. तू कशी आहेस? मला वाटलं शेवटची तरी भेट होते कि नाही आपली"

"सॉरी अवि. तिथे गेल्यावर इतकी गुंतून गेले ना कि.."

"रश्मी रश्मी. थांब जरा. झालं गेलं होऊन गेलं. मी तुला म्हणालो होतो ना. येणाऱ्या काळात आपल्याला बऱ्याच गोष्टी

समजतील. स्वतःबद्दलच्या, आपल्याबद्दलच्या. आणि त्या समजल्याही.”

“म्हणजे”

“प्रत्येक वेळी समोरच्याच्या मनातलं ओळखता येईल इतके मनकवडे तर आपण नक्कीच नाही. आपण सगळेच कोणत्या ना कोणत्या कामात व्यस्त असतो, आपल्या काही प्रायोरिटी असतात. पण हे सगळं सांभाळत असताना आपला आपल्या माणसाशी संवाद खुंटत चाललंय का ह्याकडेही आपणच लक्ष द्यायचं असतं ना”

“हम्म”

“कारण कसं असतं. कोणतंही नातं टिकायला सहवास महत्वाचा असतो. सहवास कमी झाला कि समोरच्या व्यक्तीची जागा दुसऱ्या व्यक्तीला नकळत दिली जाते. कारण माणसाला एकटेपणा जाणवला कि तो सोबत शोधतो. निसर्गाचा नियमच आहे तो. त्यामुळे झालं गेलं विसरून जाऊया. मी मोठ्या कष्टाने या सगळ्यातून बाहेर

आलोय. आता पुन्हा त्यात अडकवू नकोस. आज अगदी प्रसन्न मनाने आणि हसऱ्या चेहऱ्याने मला निरोप दे. आलोच मी ह्या क्लायंटची फाईल घेऊन."

इतकं म्हणून अविनाश केबिनमधून बाहेर पडला. रश्मी गोंधळलेल्या अवस्थेत त्याच्याकडे पाहत होती. कोण बरोबर कोण चूक हा प्रश्न आता कधीच मागे पडला होता. समोर जे काही आहे ते स्वीकारण्यावाचून रश्मीकडे दुसरा कोणताही मार्ग नव्हता. पण अगदी मोजक्याच दिवसात आयुष्यातली दोन महत्वाची माणसं गमावल्याची खंत मात्र तिला नक्कीच होती.

# समाप्त

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे तेरावं वर्षं. प्रतिक म्हात्रेंचं ई साहित्यवरचं हे तिसरं  पुस्तक.**

यापुर्वीची त्यांची दोनही पुस्तके वाचकांना आवडली. प्रतिक म्हात्रे हे नावाप्रमाणेच लेखकांच्या नव्या पिढीचंच प्रतिक म्हणता येईल. नव्या पिडीतील वाचकांची नस त्यांनी ओळखली आहे. त्यांच्या कथांछे हळुवार स्पंदन या नव्या पिढीच्या हृदयाच्या तारांना नेमके छेडते. त्यामुळे त्यांना असंक्य प्रतिसाद मिळत असतात. वाचकांकडून येणाऱ्या प्रतिसादांच्या आधारे ते अत्यंत मेहनतीने आपल्या लेखनाचा कस वाढवत नेत आहेत. त्यांची गणना मराठीतील प्रमुख लेखकांमध्ये होईल असा आम्हाला विश्वास आहे. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत. नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक

आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?

सुनीळ सामंत

टीम ई साहित्य प्रतिष्ठान